# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

निष्काम जन सेवाय समर्पिता

## दिनांक ११.०७.२०१८ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.

बुधवार दिनांक ११.०७.२०१८ रोजी (दिनांक ०६.०७.२०१८ रोजीची पुढे ढकलण्यात आलेली सभा का.प.क्र.१६) मा.महापौर श्री.नंदकुमार राधाकिसन घोडेले यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा मुख्य कार्यालयातील प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह येथे सकाळी ११.३० वा वंदेमातरम् या गीताने सुरू झाली. सभेला मा.आयुक्त, श्री.निपुण विनायक, नगर सचिव श्री.डी.डी.सुर्यवंशी व संबंधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

| | |
|---|---|
| १. | स.स. श्री.विजय साईनाथ औताडे |
| २. | स.स. श्री.वैद्य रेणुकादास (राजु) दत्तोपंत |
| ३. | स.स. श्री.विकास रतनलाल जैन |
| ४. | स.स. श्री.खान फेरोज मोईनुद्दीन |
| ५. | स.स. श्री.बमणे पुनमचंद सोनाजी |
| ६. | स.स. श्री.जाधव बन्सी ग्यानू |
| ७. | स.स. श्री.वाघमारे रुपचंद लक्ष्मण |
| ८. | स.स. श्रीमती ज्योती जयेश अभंग |
| ९. | स.स. श्री.राजगौरव हरिदास वानखेडे |
| १०. | स.स. श्रीमती रोजतकर पुष्पा उत्तमराव |
| ११. | स.स. श्री.सुरे सीताराम इसराम |
| १२. | स.स. श्रीमती स्वाती किशोर नागरे |
| १३. | स.स. श्री.मोहन धन्नुलाल मेघावाले |
| १४. | स.स. श्री.खान अय्युब म.हुसेन खान |
| १५. | स.स. श्री.सचिन सुर्यकांत खैरे |
| १६. | स.स. श्रीमती निकाळजे आशा विजय |
| १७. | स.स. श्री.शेजवळ सुभाष सयाजी |
| १८. | स.स. श्रीमती लोखंडे मनिषा विनोद |
| १९. | स.स. श्री.कादरी जमीर अहेमद रहीम अहेमद |
| २०. | स.स. श्री.सय्यद मतीन रशीद |
| २१. | स.स. श्रीमती तसनीम बेगम अ.रऊफ |
| २२. | स.स. श्रीमती खान सायरा बानो अजमल |
| २३. | स.स. श्रीमती सय्यद सरवत बेगम आरेफ हुसैनी |
| २४. | स.स. श्री.सिद्दीकी नासेर तकीउद्दीन |
| २५. | स.स. श्रीमती शेख नरगीस सलिम |
| २६. | स.स. श्री.खान जहांगीर मुलानी |
| २७. | स.स. श्रीमती खरात सिमा गणपत |
| २८. | स.स. श्रीमती शोभा नारायणराव वळसे |
| २९. | स.स. श्री.चित्ते नितीन रमन |
| ३०. | स.स. श्रीमती ज्योती सुभाष पिंजरकर |

| | |
|---|---|
| ३१. | स.स. श्रीमती सोनवणे भारती महेंद्र |
| ३२. | स.स. श्रीमती शबनम बेगम कलीम कुरेशी |
| ३३. | स.स. श्रीमती संगिता सुभाष वाघुले |
| ३४. | स.स. श्री.मलके गोकुलसिंग संपतसिंग |
| ३५. | स.स. श्रीमती सुरेखा बाळासाहेब सानप |
| ३६. | स.स. श्रीमती वैशाली कारभारी जाधव |
| ३७. | स.स. श्री.शिंदे राजु रामराव |
| ३८. | स.स. श्रीमती खरात सुरेखा गौतम |
| ३९. | स.स. श्री.मकरंद माधवराव कुलकर्णी |
| ४०. | स.स. श्री.खान इरशाद इब्राहिम |
| ४१. | स.स. श्रीमती नसीम बी सांडु खॉ |
| ४२. | स.स. श्री.अजीम अहेमद रफीक |
| ४३. | स.स. श्रीमती साजेदा फारुखी सईद फारुखी |
| ४४. | स.स. श्रीमती खतीजा कुरैशी छोटू कुरैशी |
| ४५. | स.स. कु.यशश्री लक्ष्मीनारायन बाखरीया |
| ४६. | स.स. श्री.तनवाणी राजु लेखराज |
| ४७. | स.स. श्री.ढगे गंगाधर नामदेव |
| ४८. | स.स. श्रीमती किर्ती महेंद्र शिंदे |
| ४९. | स.स. श्री.एडके विकास प्रकाश |
| ५०. | स.स. श्री.भादवे रामेश्वर बाबुराव |
| ५१. | स.स. श्री.बल्लाळ मनोज आसाराम |
| ५२. | स.स. श्रीमती मलेका बेगम हबीब कुरैशी |
| ५३. | स.स. श्रीमती शेख समिना शेख इलियास |
| ५४. | स.स. श्रीमती पठाण अस्मा फिरदोस रफीक पठाण |
| ५५. | स.स. श्री.जायभाय रमेश भानुदास |
| ५६. | स.स. श्री.शेख जफर अखतर |
| ५७. | स.स. श्री.जागीरदार मोहम्मद अय्युब गुलाम जिलानी |
| ५८. | स.स. श्रीमती भालेराव आशा नरेश |
| ५९. | स.स. श्रीमती जोहरा बी नासेर खान |
| ६०. | स.स. श्री.खैरे ऋषिकेश चंद्रकांत |
| ६१. | स.स. श्रीमती रेशमा अशफाक कुरेशी |
| ६२. | स.स. श्री.गजानन रामकिसन बारवाल |
| ६३. | स.स. श्रीमती बोर्डे सरीता अरुण |
| ६४. | स.स. श्रीमती वाडकर शिल्पाराणी सागर |
| ६५. | स.स. श्रीमती बनकर विजया संजय |
| ६६. | स.स. श्री.साळवी नितीन दशरथ |
| ६७. | स.स. श्री.त्र्यंबक गणपतराव तुपे |
| ६८. | स.स. श्रीमती विधाते अंकिता अनिल |
| ६९. | स.स. श्रीमती कुलकर्णी जयश्री सुरेंद्र |

| | |
|---|---|
| ७०. | स.स. श्री.मनगटे गजानन भानुदास |
| ७१. | स.स. श्रीमती देशमुख माधुरी मिलींद |
| ७२. | स.स. श्रीमती सत्यभामा दामुअण्णा शिंदे |
| ७३. | स.स. श्री.जगताप भाऊसाहेब उत्तमराव |
| ७४. | स.स. श्रीमती नरोटे कमल रामचंद्र |
| ७५. | स.स. श्री.जगताप कमलाकर शामराव |
| ७६. | स.स. श्रीमती चव्हाण सुनिता रामराव |
| ७७. | स.स. श्री.भगवान (बापु) देविदास घडमोडे |
| ७८. | स.स. श्री.गांगवे मनोज बन्सीलाल |
| ७९. | स.स. श्री.सोहेल शकील शेख |
| ८०. | स.स. श्रीमती ज्योती सुनिल नाडे |
| ८१. | स.स. श्रीमती मुंढे मनिषा बाळासाहेब |
| ८२. | स.स. श्री.प्रमोद प्रल्हाद राठोड |
| ८३. | स.स. श्रीमती मिना रामदास गायके |
| ८४. | स.स. श्री.पवार आत्माराम माणिकराव |
| ८५. | स.स. श्रीमती मोरे ज्योती राजाराम |
| ८६. | स.स. श्रीमती विमल गोविंद केंद्रे |
| ८७. | स.स. श्रीमती चक्रनारायण सीमा काहानुलाल |
| ८८. | स.स. श्री.थोरात दिलीप गंगाधर |
| ८९. | स.स. श्रीमती अर्चना शैलेंद्र निळकंठ |
| ९०. | स.स. श्रीमती निकाळजे लता मगन |
| ९१. | स.स. श्री.सोनवणे राहुल पंढरीनाथ |
| ९२. | स.स. श्री.सिद्धांत संजय शिरसाट |
| ९३. | स.स. श्री.अब्दुल मं.नाविद अब्दुल रशीद |
| ९४. | स.स. श्रीमती मुल्ला सलीमा बेगम खाजोददीन |
| ९५. | स.स. श्रीमती शोभा गरुलिंगअप्पा बुरांडे |
| ९६. | स.स. श्रीमती स्मिता दिगंबर घोगरे |
| ९७. | स.स. श्रीमती सलीमा बाबुभाई कुरेशी |
| ९८. | स.स. श्री.जंजाळ राजेंद्र हिम्मतराव |
| ९९. | स.स. श्री.अप्पासाहेब विनायक हिवाळे |
| १००. | स.स. कु.जमादार सायली भागवत |

**नामनिर्देशित पालिका सदस्यांची नावे**

१. श्री.घोडके कचरु छगनराव
२. श्रीमती आऊलवार सुनिता तुकाराम
३. श्री.चंदु किशनचंद तनवाणी

**चर्चा:-**

मा.महापौर :गणपुर्ती अभावी सभा १० मिनिटासाठी तहकूब करण्यात येते. (वेळ ११-३० वा पुन्हा सभा ११-४५ वाजेला सुरू)

श्री.भाऊसाहेब जगताप :एन-५ येथीन निवृत्त नायब तहसीलदार श्री.विष्णू लोखंडे यांनी वयाच्या ६१ व्या वर्षी त्यांनी १२ तास सतत पोहण्याचा विक्रम केला. त्यांचे अभिनंदन करावे.

श्री.भगवान घडमोडे :भारतीय जनता पार्टीचे कार्यकर्ते हनुमंत शिवंगीकर यांचे, मनपाचे कर्मचारी श्री.मोकासे यांचे वडील वंसतराव मोकासे तसेच उपअभियंता श्री.पंडीत यांचे मातोश्री दरूबाई पंडीत यांचे निधन झाले श्रध्दांजली अर्पण करावी.

यास स.विकास जैन, स.प्रमोद राठोड स.गजानन बारवाल यांनी अनुमोदन दिले.

मा.महापौर :ठिक आहे सर्वांनी श्रध्दांजली अर्पण करण्यासाठी उभे रहावे.

या वेळी स्व.वसंतराव मोकासे, स्व.दरूबाई पंडीत, स्व.हनुमंतराव शिवंगीकर यांचे निधन झाल्याने त्यांना श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.

श्रीमती सुरेखा सानप :मनपा शाळा नारेगांव येथे भारतीय विमान प्राधिकरणाच्या माध्यमातून रु.११ लक्षची एक डीजीटल लॅब देण्यात आली. त्यास चालविण्यासाठी प्रशिक्षणही मनपाच्या शाळेतील शिक्षकांना देणार आहे. तसेच मुलींसाठी दोन शौचालयही बांधून दिले. करीता विशेष अभिनंदन करण्यात यावे.

मा.महापौर :श्री.विष्णु लोखंडे यांनी त्यांच्या वाढदिवसानिमित्त १२ तास पोहण्याचा विक्रम केला. त्यांचे तसेच विमान प्राधिकरणाचे अभिनंदन करण्यात येते. या प्राधिकरणाने चांगले काम केले. इतरही अनेक खाजगी कंपनी असेल त्या सीएसआरच्या माध्यमातून खर्च करतात. अशा कंपनीकडे अपील विनंती केली तर मनपाच्या इमारतींचे, शहरातील इतर विकास कामासाठी मदत होऊ शकते. त्यासाठी एक विनंती पत्र मा.पदाधिकारी, मा.आयुक्त यांच्या माध्यमातून पाठवून कार्यवाही करावी. केंद्र व राज्य शासनाचे माध्यमातून महापालिकेस काय मदत होईल? त्यासाठी कार्यवाही करावी. भारतीय विमान प्राधिकरण यांना या सभागृहाचे धन्यवाद व अभिनंदनाचे पत्र प्रशासनाने द्यावे.

श्री.नासेर सिद्दिकी :रात्री १२ वाजेला कर्मचारी घरी आले व विषय क्रमांक-५५१ क्रमांकाचा प्रस्ताव दिला. त्यावर अभ्यास झाला नाही. तो विषय परत देत आहे.

मा.महापौर :तो विषय समोर आला नाही. सिरीयल विषय येतील त्यावेळेस बोलावे.

श्री.भगवान घडमोडे :हा विषय नंतर येणार आहे. नागरीकांसाठी काही करायचे असेल तर त्यावर बोलले पाहिजे. कचऱ्याचा महत्वाचा विषय आहे तो घ्यावा.

या वेळी डायस समोर विषय पत्रिका ठेवतात.

मा.महापौर :ही विषय पत्रिका सील करावी.

श्रीमती शिल्पाराणी वाडकर:नोव्हेंबर पासून प्रश्न प्रलंबीत आहे. रमानगर भागात कचरा डम्प करतो, उचलत नाही.

मा.महापौर :प्रश्न ज्या सभेत आहे. ती तहकूब केली आहे. या सभेतील प्रश्न घेता येईल.

श्री.प्रमोद राठोड :प्रशासना मार्फत काय? कार्यवाही कचऱ्याबाबत होत आहे.

या वेळी शासनाकडून आलेले श्रीमती मुथा, श्री.भोंबे,श्री.दराडे यांनी त्याचा परीचय करून दिला.

मा.महापौर :घनकचरा व्यवस्थापन बाबत कचऱ्याची जी परीस्थिती निर्माण झाली. ती व केलेले प्रयत्न तसेच निविदा प्रक्रियेसाठी काय प्रयत्न केले? माहिती द्यावी.

श्री.राजेंद्र जंजाळ :नवीन अधिकारी आले. त्यांनी चार्ज घेऊन किती दिवस झाले? व प्रत्येक वार्डात कचऱ्याची समस्या काय आहे? कचरा मशीन खरेदी करावयाची प्रोसेसचे काय झाले? मशीन खरेदी करणे. संदर्भात पेपरला वेगळ्या बातम्या येत आहे. आपण कचरा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करीत आहे. ६७-३ सी मध्ये काम

करावे. सांगितले होते. कार्यवाही होत नाही. किती टेंडर आले? माहिती नुसार एकच टेंडर आले टेंडर भरताना वेबसाईट हँग झाली होती. दुसऱ्यांना भरता आले नाही. सत्य परिस्थिती काय आहे ते सांगावे?

श्री.रामेश्वर भादवे :झोन-९ साठी ९ टेंडर काढणार होते. ते रद्द केले. नंतर २ ठिकाणी प्रोसेसींग करणार होतो. ती निविदा काढली. कार्यवाही झाली नाही. विशेष बाब म्हणून काम करावे. ६७-३ सी मध्ये काम का करण्यात येत नाही? दोन वेळेस निविदा येऊनही कार्यवाही होत नाही. वेळ जात आहे. वेबसाईटवर टेंडर आलेले आहे त्यात ५०० रिक्षा घेणार असे म्हटले. ते कशासाठी? काम एजन्सीला देणार असेल तर रिक्षा कशासाठी घेत आहोत? जे चार महिन्यापासून काम करीत आहे. त्यांचेकडून खुलासा घ्यावा. वार्डात कचरा टाकणेसाठी खड्डे केले ते कचऱ्याने भरले. आता कुठे कचरा टाकणार आहे? खर्चाचे अंदाजपत्रक वाढत आहे काम काहीच होत नाही.

घन कचरा-व्यवस्थापक :कलेक्शन, ट्रान्सपोर्टेशनसाठी टेंडर काढले. त्यात ५०० रिक्षाचे समावेश केला होता. त्यानंतर २६ तारखेला मिटींग झाली. भारतातील महापालिकेत काम करणारे ७-८ एजन्सीज् समोर आल्या आहेत. त्यांचेकडून जे सादर झाले पर हाऊसचा विचार करून ३०० रिक्षा फायनल केल्या आहे. पुन्हा ३०० घेणार असे करेक्शन केले. कलेक्शन आणि ट्रान्सपोर्टेशनचे टेंडरची ओपनींग २६ तारखेला आहे. झोन-९ साठी २७ मशीन घेण्याचे टेंडर तीन वेळेस केले. आता २ निविदा आलेल्या आहे. टेक्नीकली स्कुटनी चालू आहे .

श्री.रामेश्वर भादवे :चार महिन्यापासून कार्यवाहीच होत आहे. वार्डात कचरा पडलेला आहे. मा.महापौरही प्रयत्न करीत आहे इतर लोक काम करीत नाही. आऊटपुट काहीच निघत नाही. शहागंज, औरंगपुरा माझे वार्डातही मोठा कचरा साचलेला आहे. निविदा आलेल्या आहेत. त्यावर तात्काळ निर्णय घ्यावा.

श्रीमती मनीषा मुंढे :माझे वार्डात ४ दिवसापासून दुर्गंधी सुटली म्हणून कचरा टाकू देत नाही. दुसरे वार्डात कचरा टाकू देत नाही. आता यापूढे जमा होणारा कचरा कुठे टाकायचा? वार्डात एलईडी लाईट बंद आहे.

श्री.प्रमोद राठोड :९ वार्डासाठी मशीन खरेदीचे टेंडर काढले ते रद्द केले. पुन्हा टेंडर काढले पुर्वीच्या टेंडर का रद्द केले. आता नवीन टेंडर व पुर्वीचे झालेले टेंडरमध्ये या दोघांमधला फरक काय? ६ महिन्यांपासून प्रेसेसच ठरवित आहोत. कार्यवाही होत नाही.

घनकचरा व्यवस्थापक :चिकलठाणा हर्सुल व पडेगाव या तीन सेन्ट्रलाईज साईट आहेत. येथे प्रोसेसिंग युनिट साठी सिव्हील कन्स्ट्रक्शनचे टेंडर काढले. त्याची प्री-बी १९ जुनला झाली. त्याची ओपनींग ही १९ जुलैला आहे.

श्री.राजगौरव वानखेडे :हर्सुलच्या जागेचा वाद होता. तो मिटला का? तेथील जागेच्या सहीत टेंडर काढले का?

श्रीमती शिल्पाराणी वाडकर:रमानगर मध्ये कचरा डम्प करतो आता पीट भरून तेथे ओला कचरा जमा झाला उचलत नाही. आता लोकांचे सहकार्य मिळत नाही. नागरी वस्तीमध्ये न टाकता शहराच्या बाहेर कचरा टाकावा.

श्री.गजानन बारवाल :शहरात कचरा उचलला जात नाही. अनेक ठिकाणी कचरा पसरलेला आहे. नागरीकांनी आतापर्यंत सहकार्य केले. आता करीत नाही. ओला-सुका कचरा वेगळा होत नाही. पदमपूरा भागातही कचरा पडून आहे.

मा.महापौर :जे प्रश्न सदस्यांनी उपस्थित केले माहिती द्यावी.

घनकचरा व्यवस्थापक :प्रत्येक झोनसाठी ३ मशिनचे टेंडर काढले होते. पहिल्या व दुसऱ्यांदा कमी निविदा आल्या. त्यानंतर तिसऱ्यांदा निविदा काढली. दोन निविदा आल्या. टेक्नीकल ओपनींग झालेले. नंतर Financial लचा निर्णय होईल. त्यानंतर कलेक्शन ट्रान्सपोर्टेशनचे टेंडर झाले. प्री बी मिटींग झाली. त्याची १९ जुलै रोजी ओपनींग झाली. तिसरे टेंडर सेन्ट्रलाईज प्रोसेसिंग विन्डो कम्पोस्टींग पध्दतीने तसेच वेस्ट मटेरियल रि-कव्हरी फॅसिलिटी असे दोन टेंडर झाले पडेगाव व मिटमिटा येथे करणेसाठी १५० डीपीडीचे झालेले आहे. त्याची प्री बी मिटींग दिनांक २६ जुन झाली. त्याची ओपनींग तारीख २७ जुलै आहे. हर्सुल येथे सेन्ट्रलाईज प्रोसेसिंग साठी ओपन टेक्नॉलॉजी चे टेंडर काढले. त्याची प्री बी मिटींग १७ जुलै झाली आहे. दिनांक ८ ऑगस्टला ओपनींग आहे. त्यानंतर डी-सेन्ट्रलाईज प्रोसेसींग करणेसाठी त्या-त्या झोन मध्ये झोन ७, ९ मध्ये देशमुखनगर व रमानगर भागात प्रोसेसिंग करणेसाठी टेंडर झाले. आज टेंडरची ओपनींग आहे. एक्सप्रेशन ऑफ इन्ट्रेस मागविले जो की, साचलेला कचरा आहे. त्याची विल्हेवाट लावण्यासाठी त्याचे टेक्नीकल ओपनींग करतो आहे. सध्या ४-५ टेंडर ची कार्यवाही चालू आहे.

श्री.राजगौरव वानखेडे :हर्सुल येथे कचरा प्रोसेसींग करणेसाठी टेंडर काढले, तेथील जागेचा प्रश्न सुटला का? तेथील गट नंबर फायनल केले का?

घनकचरा व्यवस्थापनक :गट नंबर १४ मध्ये कचरा टाकतो आहे.

श्री.वानखेडे राजगौरव :ही जागा खाजगी आहे जी गायरान जागा होती हर्सुल तलावाकडे त्याचे बाबतीत काय झाले?

घनकचरा व्यवस्थापक :ज्या जागेचा वाद झाला होता. तेथे मा.आयुक्त व मा.महापौर यांनी पाहणी केली होती. आता टेंडर काढले आहे. जागा गट नं १४ तील आहे कचरा सुध्दा तेथेच टाकतो आहे.

श्री.राजगौरव वानखेडे :जागेचे व्हेरीफिकेशन करावे. टेंडर काढून पुन्हा तेथील जागेला विरोध होऊ नये.

मा.महापौर :जागेचे व्हेरीफिकेशन करून घ्यावे. योग्य ती कार्यवाही करावी.

श्री.जंजाळ राजेंद्र :देशमुखनगरला प्रोसेस युनीट बसविणार सांगितले. यापूर्वी तेथे कचरा टाकणेसाठी नागरीकांची संमती करून दिली होती. तेथे बाजूलाच पाण्याची टाकी आहे. कोणते युनीट उभारणार आहे? डोअर टू डोअर कलेक्शन साठी एजन्सी नेमतो आहे. टेंडर काढले असे सांगितले जाते परंतु यापुर्वी रॅमकी नावाची कंपनी होती ती मनपाच्या विरोधात कोर्टात गेली व मनपाच्या विरोधात निकाल दिला व रु.२४ कोटी मनपाला त्या एजन्सीला द्यावे असे पेपरला आले त्या प्रमाणे ही एजन्सी आहे. ज्या एजन्सीला काम देणार आहे तर हा कचरा पर केजी नुसार काम देणार आहे. एजन्सी कोणता कचरा आणून टाकते हे कोण तपासणार आहे? तसा याचा टेंडरमध्ये उल्लेख आहे का? **टीपीन चॅजेस**वर एजन्सी नेमणार आहे तर डोअर टू डोअर कलेक्शन करणार आहे तर

डिस्पोजल साईटवर मटेरियल नेऊन टाकणार आहे. तर मनपाचे कर्मचारी यांचे काम काय राहणार आहे? सध्या प्राधान्य कशाला देणार आहे? कचरा डिस्पोजल कसा करायचा? हा प्रश्न असतांना अशा प्रकारचे टेंडर काढण्याचा उद्देश काय? डोअर टू डोअर कलेक्शन करणार. ओला-सुका कचरा वेगळा करणार, परंतु साईटवर कचरा एकत्र आणला तर त्यांचे काय करणार आहे? अशा प्रकारचे टेंडर करत असतांना शहराचा भौगोलिक इतिहास बघणे आवश्यक आहे. रॅमकी कंपनीने दावा ठोकला, भुमिगत एजन्सी येते कर्ज घ्यावे लागते, समांतर एजन्सी आली. मनपाच्या विरोधात कोर्टात गेली. एएमटी बसेसचे प्रकरण मनपाच्या मानगुटीवर बसले. हा सर्व इतिहास माहित असतांना अशा प्रकारचे कचऱ्याचे टेंडर का काढले? कलेक्शनच्या टेंडरची सर्व माहिती द्यावी. मनपाकडे किती मॅन पावर आहे? कचरा किती जमा होतो? किती मॅन पावर पाहिजे? त्याचा खर्च किती लागतो? याची सर्व माहिती द्यावी.

श्री.सचिन खैरे :बेगमपूरा स्मशानभुमीमध्ये कचरा टाकला जातो तेथे कचरा टाकू नये. दुर्गंधी पसरलेली आहे. औरंगपूरा भाजी मंडई येथील कचरा उचलावा.

श्रीमती वाडकर शिल्पाराणी:रमानगर भागात कचरा टाकतो. तेथे नेमके काय करणार आहे? नागरी वसाहतीतील लोकांना त्रास होणार नाही. याची दखल काय घेणार आहे?

श्री.राजेंद्र जंजाळ :देशमुखनगर भागात नेमके कचऱ्यासाठी काय करणार आहे?

घनकचरा प्रमुख :देशमुखनगर व रमानगर येथे शेड आहे. त्या अनुषंगाने निविदा काढल्या आहे प्रोसेसिंग युनीट बसविणार आहे. त्या कम्पोस्टिंग व मटेरियल रिकव्हरी फॅसिलिटी त्यामध्ये जे सेलेबल ड्राय मटेरीयल असेल त्यासाठी बेलिंग मशीन बसविणार आहे.

श्री.राजेंद्र जंजाळ :तेथे सेग्रीकेशन पीट कम्पोस्टिंग पीट ऑलरेडी तयार केले. शेड केले या व्यतिरिक्त काय करणार? सेलेबल असलेला कचरा तेथे येत नाही. तेथे इतर काही करणेसाठी जागा कुठे आहे.

श्रीमती शिल्पाराणी वाडकर:कोणते मशीनरी बसविणार आहे? त्याचा त्रास नागरीकांना होणार आहे का?

घनकचरा प्रमुख :कम्पोस्टिंग पीट असेल, शेड असेल तेथे मशीनरी बसवून प्रोसेसिंग करणार आहे.

श्री.राजेंद्र जंजाळ :शेड केले, कप्पे तयार केले, तेथे बाजूला जागा नाही. कोणते युनीट बसविणार आहे? तेथे नेमके काय करता येईल? अधिकारी यांनी प्रत्यक्ष साईट बघितली नाही.

घनकचरा प्रमुख :प्रोसेसिंग साईटवर सिव्हील कन्स्ट्रक्शन आणखी करणे गरजेचे असेल तर त्या प्रोसेसने करावे. अशा निविदा आहे.

श्री.राजेंद्र जंजाळ :मशीन बसविणार त्यासाठी शेड नाही. शेड साठी अगोदर व मशीनरीसाठी नंतर टेंडर काढायला पाहिजे होते. मशीन बसविण्याच्या लायकीचे स्ट्रक्चर तेथे नाही. एक्झीस्टींग स्ट्रक्चर तेथे शेड आहे त्यामध्ये कप्पे केले तेथे आता मशीन बसविण्यास जागा नाही. कचऱ्याचा प्रश्न गंभीर आहे. मशीन बसविण्यास जागा व शेड आहे का? ते अगोदर करावे त्यानंतर मशीनरी खरेदी कराव्यात.

श्री.भगवान घडमोडे :पीट बुजविणार आहे का?

मा.महापौर :ते वापरात घेतले जातील. असे प्रशासनाने म्हटले आहे.

श्री.त्र्यंबक तुपे :रमानगर व इतर भाग असेल तेथे आता कचरा टाकू देत नाही. कचरा डम्प होतो उचलत नाही. तो सडत आहे. टिळकनगर भागातही कचरा डम्प होत होता. त्या पीटची परिस्थिती वाईट आहे. नागरीकांचा आता रोष वाढतो आहे. पीट क्रॉस झाले मोडकळीस आले. बाजूला कचरा डम्प होतो. प्रोसेस करणार की नाही? रमानगर भागात कचरा टाकण्यास नागरीक विरोध करीत आहे. जो आहे तो उचलावा असे म्हणणे आहे. बाजूला नाला आहे. त्यात कचरा पडतो भविष्यात नाला बंद होऊ शकतो. असे करणे योग्य नाही. ठोस निर्णय घेण्यात यावा. मा.आयुक्तांचा खुलासा करावा.

श्री.आत्माराम पवार :सहा महिन्यापासून कचरा प्रश्न आहे. कचराची दुर्गंधी सुटली. नाल्यांसाठी रु.३ कोटी खर्च होते तर कचऱ्यासाठी रु.७७ लक्ष खर्च करू शकत नाही का? आमच्या वार्डात कामे होत नाही. वार्डात पाण्याचा, कचरा व लाईटचे प्रश्न आहेत. ते सोडवावेत.

श्रीमती शिल्पाराणी वाडकर:रमागनर भागात कचऱ्यामूळे मोकाट कुत्र्यांचा सुळसुळाट आहे. अंत्यविधीला जात असतांना कुत्रे मागे लागतात.

श्रीमती मनीषा लोखंडे :पडेगाव येथे कचऱ्यावर प्रक्रिया होत नाही. त्यामूळे माझे वार्डातील नागरीकांना त्रास सहन करावा लागतो. नागरीकांचा आता विरोध होत आहे. यावर विचार करावा.

श्रीमती मुल्ला सलीमा :रेल्वेब्रीज खाली कचरा आणून टाकतात तसेच वार्डात दोन ठिकाणी चेंबर उघडे आहे. लहान मुले पडण्याची भिंती आहे. फोन केला तर अधिकारी फोन घेत नाही.

श्रीमती समीना शेख :वार्ड ५७ मध्ये ९५ टक्के कचरा सेग्रीगेशन होतो.त्यामुळे कर्मचाऱ्यांचे अभिनंदन करते. सुट्टीच्या दिवशी कचरा जमा करणेसाठी गाडी सुरू केली होती, ती बंद केली. ती चालू करावी. तसेच सेन्ट्रल नाका येथील जमा कचऱ्याचे खत होत आहे. जे खत कोणी घेऊ इच्छित असेल त्यांचेशी संपर्क करावा.

घनकचरा प्रमुख :१०० टन खत होते. श्री.रमजानी यांचे शेतात कचरा पाठविला होता. २-३ शेतकऱ्यांना खत पाठविले होते. आता तेथे खत नाही तयार झाले तर नंतर पुन्हा दिले जाईल.

श्रीमती माधुरी देशमुख :शहरात कचरा साचला, माशाची संख्या वाढली, फवारणी होत नाही. तीन दिवसानंतर पाणी येते, लोक पाणी साठवितात, त्यामुळे अळ्या होतात. फोन केला असता, कचऱ्याच्या ठिकाणी फवारणी चालू आहे असे सांगतात. हे योग्य नाही. नेमकी कुठे फवारणी होत आहे? जे ग्रीन वेस्ट आहे. त्याचे नियोजन काय आहे? शाळा, कॉलेज समोर कचरा टाकला जातो. ते होऊ नये. दुपारी १ वाजेनंतर सर्वांचे फोन बंद असतात.

श्रीमती सत्यभामा शिंदे :माझे वार्डात ग्राऊंड आहे तेथे कचरा डम्पीग केला. खत झाले आता कचऱ्या पासून दुर्गंधी सुटली. नागरीकांना त्रास होतो. रु.३५ लक्षचा प्रोजेक्ट तयार केला, त्यात हौद करणार. त्यात कचरा टाकणार. जेणे की, दुर्गंधी सुटणार नाही. त्या प्रोजेक्टचे टेंडर काढले. त्यास मंजूरी द्यावी. आता ज्या एजन्सीला कचऱ्याचे टेंडर दिले जाणार आहे ती एजन्सी सक्षम आहे का? कचऱ्याचा प्रश्न कायम सुटावा.

श्रीमती किर्ती शिंदे :बांधकाम साहित्य, झाडांच्या छाटलेल्या फांद्या इतर साहित्य रस्त्यावर पडलेले असते ते उचलावे. तसेच आरोग्य विभाग सक्षम करावा व सर्व भागात डोअर टू डोअर आरोग्याची काळजी घेणेसाठी नागरीकांना प्रबोधन करावे.

श्रीमती सुनिता आऊलवार:कर्मचारी काही ठिकाणचा कचरा उचलत नाही. कर्मचारी कामास वेळेवर येत नाही. घंटा गाड्यांची वेळ निश्चित नाही. कचरा जमा करण्यासाठी डस्टबीन देण्यात यावेत. फवारणी करावी. प्रतापनगर भागात कचरा डम्प होतो. अळया होत आहेत. डास उत्पत्ती होते. याकडे लक्ष द्यावे.

श्रीमती सिमा खरात :मा.आयुक्तांनी झोन-वाईज कचऱ्या बाबत बैठक घेतली होती. माझे वार्डात दोन वार्डाचा कचरा डम्पीग होतो. सुका कचरा शेतकऱ्यांना देतो. कचरा नेतांना त्यावर ताडपत्री जे की, तो झाकलेला असावा. अशा पध्दतीने लिफ्ट करावा.

श्रीमती अर्चना निळकंठ :अनेक भागात कचरा साचतो पाणी दुषीत होत आहे. फवारणी होत नाही. पीट बांधले कचरा मोठा साचला. आता तेथे फवारणी आवश्यक आहे.

श्रीमती कमल नरोटे :माझ्या वार्डात कचरा डम्प होतो, तो सडतो, खत होते. तेथे जंतुनाशक पावडर टाकावी. कॉलनीतील लोकांना त्रास होतो.

श्रीमती विमल केंद्रे :माझे वार्डात संत गाडगेबाबा उद्यान भागात कचरा डम्प होतो. तेथे चार कप्पे केले औषध फवारणी होत नाही. तेथे शाळा आहे. आरोग्य धोक्यात येऊ शकते. पाण्याचा व ड्रेनेजचा प्रश्न सुटत नाही. नागरीकाचा रोष माझ्यावर येतो. महिलांच्या वार्डातील प्रश्नच का सॉल्व्ह होत नाहीत. मा.आयुक्तांकडे संचिका मान्यतेसाठी आहे. कामे होत नसेल तर माझा राजीनामा घ्यावा.

श्रीमती ज्योती मोरे :वार्ड ९५ मध्ये कारगीर, जयदुर्गा हौसींग सोसायटी समोर मोठा कचरा पडलेला आहे. बाजूला दाट वस्ती आहे. दुर्गंधी पसरली असून आरोग्य धोक्यात आहे. फवारणी करावी. कचरा उचलावा.

श्रीमती शोभा बुरांडे :छोट्या गल्ल्या आहेत. घंटा गाडी जाऊ शकत नाही. नागरीक रस्त्यांवर कचरा टाकतात. दोन वेळेस कचरा गाडी यावी. रविवारी गाडी द्यावी. वार्डात पाणी येत नाही. सुचना केली असता कोणीही येत नाही.

श्रीमती सरिता बोर्डे :वार्ड क्र ७१ मध्ये गूरूटेक बहादूर शाळेजवळ, चुन्नीलाल पेट्रोल पंप, चेलीपुरा शाळेजवळ कचरा पडलेला आहे तो ताबडतोब उचलावा.

श्रीमती ज्योती पिजंरकर:रात्रीचे वेळी कर्मचारी सोबत घेऊन कचरा उचलला जातो. परंतु तीन दिवसांपासून कचरा पडून आहे. कर्मचारी यांचा पगार नाही म्हणून कचरा उचलत नाही असे ते सांगतात.

श्रीमती संगिता वाघुले :माझे वार्डात विहिर आहे. त्यात कचरा टाकत होते. ती भरली. ओला कचरा उदयनगरी भागात टाकत होते आता तेथेही विरोध होत आहे. आता कचरा कुठे टाकायचा प्रश्न पडला आहे?

श्री.राजू शिंदे :सर्वांचा प्रश्न सारखाच आहे. मा.महापौर, मा.आयुक्त चांगले काम करीत आहेत. खालचे अधिकारी काम करतात की नाही? हे कोणीही बघत नाही. मा.आयुक्त येतात बदलतात, नवीन अधिकारी येतात. काम करीत असतांना त्यांची बदली होते. ज्यांना समजते त्यांना कचरा संदर्भात कामे द्यावे. डीपीआर कुणी केला? पीट बांधले माहित नाही. ५०० रिक्षा घेणार होतो आता ३०० घेणार सांगतात. जी कार्यवाही करतो त्याची माहिती मिडीयापर्यंत गेली पाहिजे. टेंडर प्रोसेस झाली की नाही? नेमकी कोणती कार्यवाही होत आहे? माहिती

मिळत नाही. बदल का होत आहे? वार्ड अधिकारी यांना जबाबदारी दिली होती. त्यांनी स.सदस्यांशी काय समन्वय ठेवला? अधिकारी यांनी समन्वय ठेवून काम केले पाहिजे. नेमकी माहिती कोण देणार आहे? कोणकोणती कार्यवाही करीत आहोत? आत सांगतात की, मशीनरी फिट करणार आहे. गरवारे येथे इतर वार्डाचा कचरा टाकला जात आहे. तेथे आता मोठा १७-१८ वार्डाचा कचरा टाकला जातो आहे. हे योग्य नाही. डम्पींग कचऱ्याची आता दुर्गंधी येत आहे. पावडर मारले जाते का? हे काम कोण करीत आहे? आऊटपुट मिळत नाही. शॉर्ट टेंडर करावे. ते का करीत नाही? वेळ न लावता काम तातडीने करावे. रु.३-४ कोटीचे पॅचवर्कचे काम करतो. कचऱ्यासाठी मशीनरी ६७-३-सी मध्ये खरेदी का होत नाहीत? भविष्यात रोगराई पसरली तर अवघड होईल. सदस्यांचे सहकार्य मिळत आहे. तरी कार्यवाही होत नाही. सर्वांनी मिळून काम केले तर हे सक्सेस होईल. जी-जी कार्यवाही केली ती नागरीकांपर्यंत मिडीयाच्या माध्यमातून जावी. रिक्षा घेतो ती कुणाची तरी सोय करतो आहे असा माझा आरोप आहे. आज आवश्यकता कशाची आहे? त्यास प्राधान्य द्यावे. शहरातील ४०-४५ वार्डाचा कचरा त्या त्या वार्डात संपवू शकतो. इतर खर्च वाचवू शकतो. कचऱ्याच्या कामासाठी सक्षम अधिकारी नेमावे. अधिकारी यांचेवर जबाबदारी फिक्स करावी. योग्य ते नियोजन करून कार्यवाही व्हावी.

श्री.अय्युब जहागीरदार :कचरा प्रश्नावर एमआयएम सदस्यांनी उपोषण सुरू केले होते. कचऱ्याचा प्रश्न वाढत जात आहे. शहागंज भाजीमंडई भागात मोठा कचरा पडून आहे दुर्गंधी सुटली. यापुर्वी कचऱ्यावर योग्य ते नियोजन करणेसाठी चीन दौरा केला. इंदौर दौरा केला. काही अधिकारी नवी मुंबई, नांदेड येथे गेले होते तरीही प्रश्न सुटला नाही. मा.महापौर कचरा संदर्भात चांगली मेहनत घेत आहेत. चांगले काम करीत आहे. अधिकारी, पदाधिकारी यांनी मिळून काम केले तर हा प्रश्न लवकरच सुटेल. सक्षम अधिकारी यांची बैठक बोलवावी जसे प्रशासनातील तीन अधिकारी मा.जिल्हाधिकारी, मा.आयुक्त, मा.पोलीस आयुक्त यांनी जसे होडींग बाबत निर्णय घेतला त्याप्रमाणे कचऱ्यावर निर्णय घ्यावा. कचरा डम्प होणार नाही. यांची दखल घ्यावी तरच प्रश्न सुटेल. जेथे कचरा साचला तो उचलावा. शासनाचे अधिकारी तीन वर्षापर्यंत असावे. मा.कोर्टात या प्रकरणासाठी रु.६० लक्ष खर्च केले तेवढे पैसे कचऱ्यावर खर्च केले असते तर काही प्रमाणात प्रश्न सुटला असता. आपण सर्वांनी मिळून काम करावे लागेल तर हा प्रश्न योग्य वेळी सुटणार आहे.

श्रीमती अंकिता विधाते :ओपन प्लॉटवर कचरा टाकतात. डम्पींग स्पॉट तयार होत आहे. मराठा दरबार हॉटेल जवळ कचरा पडून आहे तो उचलावा. नसता पावसाच्या पाण्याने वाहून लोकांच्या घरात कचरा जाईल.

श्री.भाऊसाहेब जगताप :अनेक वेळा यावर चर्चा केली. चीन, इंदौर दौरा झाला. त्या नुसार जे जे आदेश दिले त्यानुसार अंमलबजावणी केली जात नाही. जवळपास ८० वार्डात ओला सुका कचरा वेगळा होतो. खुल्या जागेवर कचरा टाकला जातो. मा.आमदार श्री.झांबड साहेबांच्या घरासमोर कचरा टाकत होते. तेथे आता कचरा टाकणे बंद केले. प्रशासनाची मानसिकता बदलली पाहिजे. एन-३-४ वार्डापासून चिकलठाणा पर्यंत वार्डात कचरा ओला सुका वेगळा होतो. मशीनरी

खरेदीची निविदा तात्काळ करावी. जेथे पीट केले ते भरले, पाणी साचले. जेथे खत झाले ते उचलून शेतकऱ्यांना द्यावे. गाडी उपलब्ध करून द्याव्यात.

श्री.नासेर सिद्दीकी :नगरसेवक निधीतून डस्टबीन्स् देण्यात यावे.

श्री.ईरशाद खान :वार्ड ४१ मध्ये पीट हे शाळेच्या बाजूला केलेले आहे. तेथील कचरा पेटवून दिला जातो विद्यार्थ्यांना त्रास होतो ते पीट हटविण्यात यावे.

श्री.जमीर कादरी :नुसती यावर चर्चा होते निर्णय होत नाही. सर्वांनी मिळून काम करावे तातडीने निर्णय व्हावेत.

श्री.भगवान घडमोडे :प्रोसेस युनीट अगोदर करावे. कलेक्शन ट्रान्सपोर्टचे काम नंतर करता येईल.

मा.महापौर :कचरा साचून असेल त्यावर फवारणी करण्याची गरज आहे. या कामासाठी टेक्नीकल अधिकारी नियुक्त करावे किमान ते अधिकारी तीन वर्ष काम करेल अशा पध्दतीने काम द्यावे. पीट तयार केले. तेथे कम्पोस्ट खत तयार होईल याची काळजी घ्यावी. प्रत्येक वार्डात स्वेच्छानिधीतून डस्टबीन्स् देणे बाबत योग्य ती कार्यवाही करावी.

मा.आयुक्त. :सदस्यांनी ज्या सुचना केल्या त्याची नोंद घेतली आहे. देशामध्ये ३० टक्के कचरा प्रोसेसींग होते. ७० टक्के कचरा डम्प केला जातो. १४०० शहर असे की, तेथे आजही प्रोसेसींग होत नाही. शहरी भागात नियमानुसार कचरा डम्प करायला नको जे की स्थानिक नागरीकांना त्याचा त्रास होतो. यापूर्वी नारेगाव येथे कचरा नेत होतो. तेथील डम्पींग ग्राऊड बंद केला. डम्पींग करणे शहरासाठी चांगले नाही. ४५० टन कचरा कोठे नेणार? असा प्रश्न समोर आला. कचरा मिक्स होतोत्यामुळे आणखी प्रॉब्लेम येत आहे. झोन क्र.१,२,३,९ मध्ये सेग्रीगेशन होण्याचे प्रमाण कमी आहे. इतर झोन मध्ये चांगले प्रतिसाद मिळतो तेथे अडचणी कमी आहे. हा कचरा कुठे न्यायचा? असा प्रश्न पडतो अनेक सदस्य कचरा विल्हेवाट लावणेसाठी मदत करीत आहेत. मा.आयुक्तांची समिती आहे त्यांनी हर्सुल पडेगाव चिकलठाणा तसेच कांचनवाडी या चार जागा निश्चित केल्या होत्या. एमपीसीडीचे सदस्य त्यात असल्यामूळे त्यांनी स्पॉट पाहणी करून निश्चीत केले आता प्रोसेसींगकडे वळतो आहे. प्रोसेसींगचे ३ ठिकाणी युनीट करणार आहोत. १५० मॅट्रीक टन कचरा प्रोसेसचे टेंडर काढले आहे. कांचनवाडी येथे बायोमेट्रीक प्लॅन करणार आहोत. यात दोन प्रकारचे एक सीव्हील वर्क टेंडर आहे. प्रोसेसींग सुरू होण्यात वेळ लागणार आहे. तोपर्यंत तेथे काही व्यवस्था असावी. तेही पहावे लागणार आहे. या कामासाठी रितसर प्रोसेसींग करण्याचा काम सुरू केले आहे. मशीन टेक्नीकल टेंडर ओपन केले. कचरा व्यवस्थीत संकलन होईल व विल्हेवाट लागेल याची काळजी घेत आहोत. कुठेही आता ओपन गाडी जे की, उघडा कचरा ठेवून वाहतूक करता येणार नाही. एक हजार घरामागे एक गाडी असावे, अशा प्रकारचा आराखडा तयार करण्यात आला आहे. प्रत्येक वार्डात एक सुपरवायझर आहे. आणखी सदस्यांशी चर्चा करून निर्णय घेता येईल. ६८ ॲटो टिप्पर आहे. ३०० ॲटो लागतील. डोअर टू डोअर कलेक्शन करू शकत नाही तोपर्यंत कचरा कलेक्ट होणार नाही. रॅमकीने काय केले? अभ्यास करतो आहे. गाडी अधिक त्यांचे लेबर अशी मागणी केली आहे. मनपाचे १४०० लेबर आहे त्यातील अनुभवी आहे त्यांना सुपरवायझर म्हणून इतर ठिकाणी देणार आहे. रोडची स्वच्छता व इतर

कचराचे कामासाठी कर्मचारी कमी पडतात. यात प्लॅन बनवावे लागतील. सुक्ष्म नियोजन करून सदस्यांचे मार्गदर्शन घेतले जातील. इनपुट घेऊन अंतीम करू आजही रु.६५ कोटी कचऱ्यावर खर्च होतो. रु.४२ कोटी पगारावर खर्च होतो, इतर खर्च गाड्या, पेट्रोल, डिझेल वर होतो. किती कचरा त्यांनी बाहेर नेला? याची किंमत जोडू शकलो तर कचरा राहणार नाही. शहराच्या बाहेर कचरा नेला तर त्याप्रमाणे त्यास पैसे मिळतील. प्रत्येक सिस्टमचे फायदे तोटे असतांना त्यांनी दगड-माती टाकून वजन वाढवू नये. हे पहावे लागणार आहे. रॅमकी सारखे होऊ नये ते पहावे लागेल. शहरा बाहेर कचरा नेला नाही. दंड करता येईल. अपुर्ण गाड्या मॅन-पावर असल्यामूळे योग्य पध्दतीने काम होऊ शकत नाही. इंदौरला जाऊन आलो. १०० टक्के सेग्रीगेशन होते. त्यांचा घरबसल्या कचरा उचलला जात असेल तर १ ते २ रूपये देण्यास प्रॉब्लेम नाही. तेथे मोठमोठ्या मनपातर्फे उचलला जातो. तेथे युजर चार्जेस नाही. ते सभागृहासमोर ठेवतो आहे. ही सेवा प्रोफेशनल पध्दतीने दिली गेली तर उत्पन्न व खर्च बॅलेन्स असेल तर सेवा दिली जाते व उत्पन्न येते. या शहरात खूप वार्ड स्वतःच्या वार्डातच कचऱ्याची विल्हेवाट लावली जाते. शेवटी विकेंद्रीत पध्दतीने स्वतःचा कचरा स्वतः मॅनेज करू सेग्रीगेशन करून कलेक्ट करून विल्हेवाट लावणे आवश्यकता आहे. १९ क्र. वार्डात सॅनीटेशन पार्क करणेचा पुढाकार घेतला आहे. मागे जावे लागणार आहे. जे जे पुढाकार घेतील १०० टक्के सेग्रीगेशन करायला लावतील. तसे प्रकारचे पायलट करण्याची प्रशासनाची तयारी आहे. मनपावर कामाचा बोजा पडणार नाही. काही कॉम्पीटेशन जाहीर केले पाहिजे. जे जे चांगले काम करतील कचरा विल्हेवाट लावण्यास सक्षम आहे त्यांनी तसे काम करावे. स्मशानभुमी, कब्रस्तान, शाळा येथील कचरा विल्हेवाट लावली पाहिजे. हळू हळू बायोमॅट्रीक पध्दतीने काम केले जाईल. ओपन जागेवर कचरा पडणार नाही याची काळजी घेतली जाईल. सर्वांना वाटेल की, बाजूला कचरा टाकू नये अशी मानसिकता निर्माण करावी लागेल. घरातून कचरा प्रोसेसिंग साईट वर पहिला नेला पाहिजे. पर्याय नव्हता म्हणून कचरा टाकला गेला असेल. ३-४ ठिकाणी यशस्वी काम केल्यानंतर त्यास इतर वार्डामध्ये विकेंद्रीत पध्दतीने काम करता येईल.

श्री.त्र्यंबक तुपे :शहरात ४५० मॅ.टन पर-डे कचरा निघतो शहरात चार ठिकाणी कचरा प्रोसेसिंग करणार होतो. एक हजार घराच्या साठी एक व्हिकल असावी.नारेगाव येथे कचरा टाकत होतो मनपाचीच यंत्रणा होती. तेव्हा शहरात कुठेही कचरा साचलेला राहत नव्हता. त्यावेळची यंत्रणा होती. त्याचा अभ्यास करणे आवश्यक आहे. आता मोठ्या संख्येने कर्मचारी असतांना शहरात कचरा पडून दिसतो. जोपर्यत प्रोसेसिंग युनीट चालू होत नाही तोपर्यत हा प्रश्न सुटणार नाही. पीट केले. आता तेथे कचरा साचला. नागरीकांचा आता विरोध होतो आहे. युनीट चालू झाले तर विरोध होणार नाही. यंत्रणा दिसून येत नाही म्हणून नागरीक विरोध करीत आहे. ३०० व्हेइकल घेण्याची गरज आहे का? अभ्यास करावा. त्यावर चालक इतर कर्मचारी लागणार आहे. आता किती खर्च आहे? खर्चाचा ताळमेळ बसला पाहिजे सर्व विचार करावा. कर्मचारी अधिकारी यांची मानसिकता काम करण्याची बदलली पाहिजे शासनाचे अधिकारी येतात इतर

ठिकाणी व महापालिकेत काम करण्याची पध्दत वेगळी असते. काम पुर्ण होईपर्यंत ते अधिकारी त्या कामात असावे. भाड्याने रिक्षा घेतल्या, नागरीकांची ही मानसिकता बदलली पाहिजे त्यांचीही जबाबदारी तितकीच आहे. तशा सुचना दिल्या जाव्यात. प्रत्येक ठिकाणी कचरा जमा करण्याची वेळ निश्चित केली पाहिजे. हॉटेल, मंगल कार्यालय विषय मांडला होता. याचा कचरा मोठा असतो तो उचलण्यासाठी नियोजन असावे. वेगळ्या व्हेइकलच्या माध्यमातून जमा करता येईल का? ते पाहावे. प्रोसेस युनीट केव्हा बसविणार आहे? चालू केव्हा होणार आहे? तीन ठिकाणी प्रोसेस युनीट चालू केले तर ही समस्या लवकर सुटेल.

श्री.राजू शिंदे :प्रोसेस युनीट केव्हा बसविणार आहे? ती यंत्रणा कार्यान्वीत करावी. पुढचा मार्ग मोकळा होईल.

श्री.भगवान घडमोडे :रॅमकीला काम दिले होते काम सोडून गेले त्या बाबतीत महापालिकेला पैसे भरावे लागले. एकाच कंपनीला काम देऊ नये. कारण एकाच कंपनीची अडचण निर्माण झाली. सर्व शहराला वेठीस धरले जाते. २-३ कंपनीला काम द्यावे.

श्री.राजेंद्र जंजाळ :देशमुखनगर, रमानगर भागात कोणते प्रोसेसींग करणार आहे? एजन्सीला पर टिपींग चार्जेस पेड करणार असे दिले. कचरा डिस्पोजल करण्याचे युनीट जोपर्यंत लागत नाही तोपर्यंत समस्या सुटणार नाही. १४०० कर्मचारी असून रु.६५ कोटी खर्च करतो असे असून सुध्दा कचरा उचलू शकत नाही तर या टेंडर मध्ये टीपींग चार्जेस लावून काम देणार आहे. या टेंडरची मांडणी करावी. अटी शर्ती टाकल्या. ५१४ टीपींग चार्जेस पकडले तर रु.६० कोटी होतात. रु.६५ कोटीचे काम रु.६० कोटीत होत असेल तर योग्यच आहे. बाहेर जनरल चार्जेस रू.१८०० आहे. बाहेरची एजन्सी ज्या इतर शहरात काम करीत आहे त्यांना दिले तर रु.२६ कोटीत रु.६५ कोटीचे काम होईल. महापालिकेचे पैसे वाचणार आहे. रॅमकी सारखी परीस्थिती निर्माण होऊ नये याची काळजी घ्यावी.

मा.महापौर :अर्ध्या तासासाठी सभा तहकूब करण्यात येते. (वेळ दु.२-३० वाजता पुन्हा दु.३-२० वाजता सभेला सुरूवात.)

श्री सिताराम सुरे :दुषित पाणी येते. आमच्या वार्डात एसी लाईन आहे खराब झाल्या. तेथे लाईन टाकणेसाठी संचिका वाटाघाटीसाठी आहे. किती दिवस लागणार आहे? तसेच लाईटची कामे होत नाही. पिसादेवी रोड पासून पुर्वेस लाईट बंद आहेत. माझे वार्डात ५० टक्के लाईट बंद आहेत.

श्री.दिलीप थोरात :पाणीपुरवठ्याच्या संचिका मंजूर का होत नाही? किती टक्केपर्यंत आगाऊ द्यायचे निश्चित करावे? प्रत्येक संचिका पाठविण्याची गरज नाही.

मा.महापौर :सर्व संचिका एकत्रित कराव्यात कार्यवाही करावी.

श्री.गजानन मनगटे :किती पाणी लागते? मोजावे, अधिकृत अनधिकृत नळ कनेक्शन किती? असे संचिकेवर लिहीतात. हे योग्य नाही. तीन महिन्यापासून संचिका पडून आहे मंजूर करीत नाही. श्री.चहल यांना परत त्यांचे विभागाकडे पाठवावे.

मा.महापौर :अंदाजपत्रक झालेल्या वाटाघाटीसाठी असलेले टेंडर झालेल्या वर्क ऑर्डर झालेल्या सर्व संचिका मंजूर कराव्यात.

श्री.सचिनखैरे :लिकिजेस व दुषीत पाण्याची कामे सुध्दा होत नाही.

श्रीमती ज्योती अभंग :दलित वस्ती मधील संचिका मंजूर होत नाही तोपर्यंत मी डायस समोरून उठणार नाही.

श्रीमती मनीषा मुंढे :पाणी पुरवठ्याची संचिका मंजूर होत नाही. ३५० घरांना पाणी दुषीत येते. २५ घरांना पाणी मिळत नाही. जुन्या लाईन झाल्या त्या बदलाव्यात.

या वेळी श्रीमती अभंग डायस समोर येऊन बसतात.

मा.महापौर :जागेवर बसावे सभागृहाची शिस्त पाळावी लागेल. वारंवार विनंती करूनही आपण ऐकत नाही तर आपले एक दिवसासाठी सभासदत्व रद्द करण्यात येते.

श्री.भगवान घडमोडे :श्रीमती अभंग यांचे वार्डात काम होत नाही. त्या त्याचे जागेवर बसतील त्यांचे निलंबन मागे घ्यावे.

मा.महापौर :ठिक आहे त्यांचे निलंबन मागे घेण्यात येते.

श्री.सिताराम सुरे :वार्डात लाईट बंद आहे. श्री.रईस नावाचे ठेकेदार काम करीत नाही. काम केले तरी लाईट लगेच बंद होतात. बील देऊ नये.

कार्य.अभियंता :उद्या सकाळी पाहणी करतो.

श्रीमती मुल्ला सलीमा :एलईडीचे ५० टक्के लाईट बंद आहेत. अधिकारी फोन घेत नाही.

श्रीमती स्वाती नागरे :माझे ही वार्डात लाईट बंद आहे.

मा.महापौर :डी.पी.कुलकर्णी यांनी या वार्डात पाहणी करावी. सर्व संचिका मंजूर कराव्यात.

श्रीमती समीना शेख :कब्रस्तान, स्मशानभुमी मध्ये लाईट बंद आहेत. व्हेइकलचे लाईट लावून दफनविधी करावा लागतो. हे योग्य नाही.

मा.महापौर :सर्व संचिका मंजूर कराव्यात, अधिकारी यांनी फोन घेत जावे.

श्री सचीन खैरे :मकईगेट, बीबीका मकबरा भागात एलईडी लाईट बंद होतात. उजेड कमी पडतो.

श्री सुभाष शेजवळ :वार्डात लाईट लावले नाही, पाणी पुरवठ्याची कामे होत नाही.

श्री.राजू शिंदे :सातारा देवळाई भागात एलईडी लाइट का लावले जात नाही? ४० हजार दिवे लावणार त्यातून १००० एलईडी लाईट सातारा देवळाईसाठी लावावे.

मा.महापौर :सातारा देवळाई भागात १००० लाईट लावावे. ॲक्शन प्लॅन तयार करावा. लाईट बाबत महपौर दालनात परवा बैठक घेऊ.

श्री गजानन मनगटे :नवीन लाईट व पोलच्या संचिका मंजूर करीत नाही. ५-१० वर्षात वार्डात नवीन पोल आले नाही. पोल साठी तरतूद करावी कामे करावीत.

श्री आत्माराम पवार :माझ्या बाजूच्या वार्डात एलईडी लावले माझ्या वार्डात लाईट लावले नाहीत. ठेकेदार काम करतात की नाही? यावर कुणाचे नियंत्रण आहे?

श्रीमती मिना गायके :माझ्या वार्डात पाणी येत नाही. काम मंजूर आहे काम घेण्यास कोणी येत नाही. संचिका मंजूर होत नाही.

श्री.राजेंद्र जंजाळ :शहराचा सर्वे करून ४० हजार लाईट बसविणार होते. ते लाईट व पोल बसविणार की नाही? लाईटचे विभाग प्रमुख श्रीमती गायकवाड यांना बोलवावे. मेन रस्त्यावरील एलईडी लावावे. गल्ली बोळात लाईट लावले. काही ठिकाणी मुख्य रस्त्यावर नाही. भेदभाव का होतो आहे? काही लाईट चालू-बंद होतात.

श्री.विकास जैन :प्रत्येक वार्डात १००,५० लाईट बंद आहे. कोणत्या वार्डात किती लाईट लावणार आहे? नियोजन करावे. एलईडी लाईट लावण्याचे आदेश कोण देत असतात?

श्री.रेणुकादास वैद्य :ठेकेदार मनमानी पणे काम करीत आहे. काही वार्डात काहीच लाईट नाही जेथे सदस्य सजेस्ट करतील तेथे लाईट लावावे. तसे ठेकेदाराला बील देऊ नये. नियोजन करावे. केलेल्या कामाची तपासणी केली पाहिजे.

श्री.राजू शिंदे :काही वार्डात लाईट बदलण्याची गरज नाही.

श्रीमती सुरेखा सानप :नारेगाव शाळेत वर्ग खोल्या कमी आहे विद्यार्थी संख्या जास्त आहे.

श्रीमती सीमा चक्रनारायण:माझ्या वार्डात नाले सफाई झाली नाही नाल्यावर स्थानिक लोकांनी अतिक्रमण केले नाल्यावर ढापे टाकले जात नाही अतिक्रमण झालेले काढावे.

श्री मनोज गांगवे :मुकूंदवाडी शाळेच्या चांगले वर्ग खोल्या तोडून बांधले जात आहे. नवीन वर्ग खोल्या का बांधत नाही? शासनाचा निधी आहे सांगतात.

शिक्षणाधिकारी :त्या वर्ग खोल्या पडायला आलेल्या आहेत. तेथे वर्ग खोल्या बांधणे आवश्यक आहे. माध्यमिक शाळेसाठीचा प्रकल्प आहे निधी आहे.

श्री.राजू शिंदे :ते पडायला आले टेक्नीकल ऑडीट झाले का?

मा.महापौर :शाळा, इमारत, दवाखाना इमारत बांधकाम व इतर कामे यासाठी टेक्नीकल सेक्शन इंजिनिअर नियुक्त करावे.

श्री.राजू शिंदे :माझ्या वार्डात १० वी पर्यत शाळा आहे. २५-३० विद्यार्थी असून एकही शिक्षक आले नाही. ८ वी साठी शिक्षक नाही. भरती करावी लागेल सांगतात. बदली शिक्षक तेथे येत नाही. त्यासाठी काय करणार आहे?

श्रीमती माधुरी देशमुख :महिला व बाल कल्याण समितीच्या माध्यमातून वस्तू वाटप असेल किंवा प्रशिक्षण असेल या संबंधी महिला विचारणा करीत असतात. महिला व बाल कल्याण समिती ही नेहमी उपेक्षित राहिलेली आहे. या समितीची बैठक घेणे बाबत पत्र दिले असता नगर सचिव यांनी असे कळविले की, सभेचे आयोजन करणेसाठी या विभागाकडे प्रस्ताव नाही. प्रस्ताव असल्यास नगर सचिव विभागाकडे पाठवावे जे की, सभेचे आयोजन करणे सोयीस्कर होईल. असे कळविले व मला ही प्रत दिली. मागिल दोन वर्षात प्रशासकीय प्रस्ताव पाहिजे तसे आले नाही किमान दोनच सभा झाल्या. प्रशासनाने प्रस्ताव पाठविले नाही तर आम्ही कामकाज कसे करायचे. प्रश्न पडतो. ज्या संचिका प्रलंबीत असेल तर त्या तात्काळ समितीकडे याव्यात. शिलाई मशीन व यासाठी दोन वर्ष संचिका या त्या विभागाकडे फिरवली जात होती. आता शासनाचे असे निर्देश आले की, टेंडर करणेची गरज नाही. लाभार्थीच्या खात्यामध्ये पैसे जमा करायचे आहे असे असतांना सुध्दा शिलाई मशीन देणे बाबत कार्यवाही होत नाही. या समितीच्या जे जे योजना असतील त्या प्राधान्याने हाती घेणे बाबत सुचना देण्यात याव्यात.

मा.महापौर :महिला व बाल कल्याण समितीच्या माध्यमातून जे उपक्रम घेतले जाते त्याची कार्यवाही प्रशासनाने तातडीने करावी. प्रत्येक वर्षी तरतूद असते खर्च होत नसेल तर योग्य नाही. ज्या योजना असतील त्याचे धोरण निश्चित करावे मा.आयुक्ताची मंजूरी घेऊन समिती समोर प्रस्ताव द्यावेत. उपआयुक्त यांनी निर्णय घ्यावा.

मा.आयुक्त :या समितीचे कक्ष प्रमुख म्हणून मेडीकल ऑफिसर यांचेकडे चार्ज देत आहोत. त्यांचे इनचार्ज उपआयुक्त असतील. पुर्ण अधिकार त्यांना दिले आहे. काही

प्रकारच्या ट्रेनिंग, मुलीचे खेळ, सॅनेटरी नॅपकीन, बचतगट, वाचनालय, महिला शौचालय ही सर्व कामे हाती घेतली जातील.

श्री.जफर खान :माझ्या वार्डात फिश मार्केट आहे. तेथील लोकांचा कुणाला त्रास नाही. परंतु मनपाचे कर्मचारी २-५ दिवसाला जाऊन त्यांचे साहित्य उचलून आणतात. साहित्य लवकर देत नाही. त्यामुळे त्याची मच्छी वेस्ट होते. शहरात अनेक ठिकाणी जागेवर, नाल्यावर अतिक्रमण झालेले तेथे अधिकारी जाऊन कार्यवाही करीत नाही. गरीब लोकांवर कार्यवाही होते हे योग्य नाही. त्यांना पर्यायी जागा द्यावी.

मा.महापौर :सेन्ट्रल नाका येथे कचऱ्याचा प्रश्न चालू आहे. ते लोक बाहेर उघड्यावर विक्री करीत असेल तर योग्य नाही. त्यामुळे माशा होतात.

श्री.जहागीर खान :शहागंज भागात मच्छी मार्केट तयार केले चालू करीत नाही. ओपनींग होत नाही.

मा.महापौर :संबंधीत अधिकारी यांनी तेथे जाऊन पाहणी करावी. योग्य कार्यवाही करावी. मी सुध्दा पाहणीसाठी राहिल.

श्री.दिलीप थोरात :इस्कॉन खिचडी एजन्सीला दर महिन्याला पेमेंन्ट दिले जात नाही. यात कोण दोषी आहे? त्यांचेवर कार्यवाही करावी.

मा.महापौर :प्रत्येक महिन्याला त्यांना पेमेंन्ट द्यावे.

श्रीमती समीना शेख :मच्छी मार्केट असेल, हातगाड्या असतील, अतिक्रमण म्हणून हटविले जाते परंतु महापालिकेच्या अनेक अशा जागा जसे विवेकानंद कॉलेजला २२ हजार स्वे.मीटर जागा दिली होती. करारनामा महापालिकेकडे नाही. भाडे देत नाही तरी जागा ते वापरतात. ते अतिक्रमण नाही का? तापडीया डायग्नोस्टीक सेंन्टर दोन वर्षापासून भाडे न घेता चालू आहे. त्याचा प्रस्ताव आजपर्यत प्रलंबीत आहे.

मा.महापौर :लेखी माहिती सदस्यांना या बाबत द्यावी.

श्रीमती संगिता वाघुले :माझ्या वार्डात पुलाचे काम होत नाही. तेथून शाळेतील मूले ये-जा करतात. अपघात होऊ शकतो.शौचालयाचे लाभार्थीना हप्त्याची रक्कम मिळत नाही.

मा.महापौर :डी.पी.कुलकर्णी यांनी पाहणी करावी. कार्यवाही करावी. वैयक्तिक शौचालयाचे पेमेंन्ट मनपा फंडातून करावे. श्री.भोंबे यांनी संचिका घेऊन पात्र व अपात्र लाभार्थीचा विषय आहे तो हाताळावा.

श्रीमती सुरेखा सानप :ब्रीजवाडी भागातील ६५ लोकांना दुसरे हप्ता दिला नाही. नाल्यात पाईप लहान काढून मोठा पाईप टाकला शाळेकडे प्रवाह का केला?

वार्ड अभियंता :वैयक्तिक शौचालयाचा अहवाल वार्ड अधिकारी यांना दिला. त्यांनी निर्णय घ्यायचा आहे. पुलाचे कामाचे एजन्सी फिक्सींगला आहे.

मा.महापौर :श्रीमती वाघुले, श्रीमती सानप यांचे वार्डातील वैयक्तिक शौचालयाचा जो प्रश्न आहे तो सोडवावा.

श्री.प्रमोद राठोड :गुंठेवारी कक्ष बंद केला आहे. नवीन नियमावली शासनाकडून आली आहे. त्यानुसार काय करणार आहे? अनधिकृत बांधकाम संबंधी जीआर आहे. त्यांचे बांधकाम नियमीतीकरण करणार आहे का?

श्री.भगवान घडमोडे :जे घरे नियमित करायचे आहे. त्या बाबतीत काय निर्णय घेणार आहे?

मा.महापौर :संबंधीत अधिकारी उपस्थित नाही. आता विषय पत्रिका घेण्यात येते.

**विषय क्रमांक ५१०:-** **(शहर अभियंता)**

महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे परिपत्रक क्रमांक स्वमअ-२०१५/ प्र.क्र.२४९/नवि-३४,दिनांक १९.११.२०१५ नुसार स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) च्या अंमलबजावणीचा आढावा घेणे.

श्री.गोकुळसिंग मलके :माझे वार्डात शौचालय अर्धवट राहिले तेथे भांडे बसविले नाही. मनपाच्या फंडातून काम करावे. आदेशीत केले होते. कार्यवाही केली नाही.

कार्य.अभियंता-ड्रेनेज :निधी अभावी काम झाले नाही. बजेट मध्ये तरतूद केली आहे. बजेट झाल्यानंतर कार्यवाही करता येईल.

मा.महापौर :तातडीने कार्यवाही करावी विषय मंजूर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे परिपत्रक क्रमांक स्वमअ-२०१५/ प्र.क्र.२४९/नवि-३४,दिनांक १९.११.२०१५ नुसार स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) च्या अंमलबजावणीच्या आढाव्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**चर्चा :-**

श्री.भगवान घडमोडे :गुंठेवारी कक्ष बंद केला आहे का, शासनाचे अध्यादेश काय आहे? त्यानुसार काय कार्यवाही करणार आहे? सन-२०१५ पर्यंतचे जे अनधिकृत आहे ते घरे कशी लिगल करायचे आहे? ते सांगावे.

उपअभियंता-न.र :३१ डिसेंबर २०१५ पर्यत जे अनधिकृत घरे आहे ते प्रशमित संरचना म्हणून घोषीत करणेसाठी शासनाने नवीन आदेश पारीत केले आहे. त्यानुसार कार्यवाही सुरू केली. पेपरला जाहिर प्रगटन दिले. झोनला दुय्यम अवेक्षक यांची नेमणुक केली आहे. याचा मोठा प्रचार करणेसाठी उद्या पासून मोहिम सुरू करतो आहे.

श्री.सिताराम सुरे :झोन कार्यालयात अनेक संचिका प्रलंबीत आहे. अधिकारी तेथे नाही. गुंठेवारी संदर्भात अनेक संचिका आहे. त्या केव्हा मार्गी लावणार आहे? झोन अधिकारी काम करीत नाही. जे नागरीक गुंठेवारी करून घेण्यात तयार आहे ती गुंठेवारी करून घ्यावी. जे करीत नाही. त्यांचेवर कार्यवाही करावी.

श्री.भगवान घडमोडे :जाहीरात कधी दिली? सन-२०१७ पासून तो अध्यादेश आला आहे. ज्या संचिका गुंठेवारीच्या सन-२००६ पासून प्रलंबीत आहे त्या का मंजूर केल्या नाहीत? अनेक नागरीक त्या विभागात चकरा मारतात.

मा.महापौर :ज्या प्रलंबीत संचिका गुंठेवारीच्या आहे त्याचा निपटारा लावावा लागणार आहे. आता शासनाचा अध्यादेश आला त्यात अटी या जाचक आहेत. दर जास्त आहे एकही घर बसणार नाही. त्यामूळे प्रतिसाद कमी आहे. कुठे तरी नागरीकांना रिलॅक्शेसन मिळेल. या दृष्टीने मा.आयुक्तांच्या संमतीने मॉडीफाय करणे आवश्यक आहे. जी भौगोलिक परिस्थिती आहे. त्यानुसार त्या बाबत निर्णय घ्यायला लागणार आहे. सभागृहासमोर ठेवावे. प्रॅक्टिकली काय अडचणी आहेत? ते समोर ठेवावे. सातारा देवळाई भाग समोर ठेवून तो जीआर आहे. तेथील १२-१५ संचिकाच आलेल्या आहे.

श्री.भगवान घडमोडे :जनजागृती झाली नाही. सभागृहाला माहिती नाही. जुन्या संचिका गुंठेवारीच्या आहे. त्या निकाली काढाव्यात. त्या विभागात कुणी नसते. वयोवृध्द व्यक्ती आहे अनेक चकरा त्यांनी मारल्या त्या व्यक्तीने पैसे घेऊन नियमितीकरण केले जात नाही. अनधिकृत वस्ती होणार नाही याची काळजी घ्यावी.

मा.महापौर :गुंठेवारीच्या ज्या संचिका आहेत त्या निकाली काढाव्यात. शासनाचा जीआर आहे तो सभागृहा समोर ठेवावा. जास्तीत जास्त प्रॉपर्टी नियमित करून कसे जास्तीत जास्त उत्पन्न वाढविता येईल? ते करावे. अटी/शर्ती शिथील करता येत असेल तर तसे प्रस्तावित करावे.

श्री.नासेर सिध्दीकी :स्वेच्छा निधीतून डस्टबीन्स् देण्यात यावे.

मा.महापौर :योग्य ती कार्यवाही करावी.

**विषय क्रमांक ५५१ (समांतर जल वाहिनी पुनरूज्जीवन करणे बाबत विषय)**

चर्चा:-

मा.महापौर :चार तारखेला हा विषय मा.सर्वोच्च न्यायालयामध्ये होता. कंपनीने पुनरूज्जीवन करता प्रस्ताव दिला आहे. रद्द केलेला करारनामा त्याला पुर्नजीवन असे म्हणतात. तो प्रस्ताव प्रशासनाकडे आहे. प्रशासनाकडून प्रस्ताव आलेला आहे. मा.आयुक्त हे सुध्दा तेथे हजर होते लगेचच हे प्रकरण पुन्हा १३ तारखेला बोर्डावर आहे. त्या प्रस्तावाच्या अनुषंगाने प्रशासनाचे मत असलेला प्रस्ताव समोर आला आहे. मा.न्यायालयात काय स्थिती आहे. याची माहितीही घेऊ.

श्री.राजू शिंदे :ज्या मा.आयुक्तांनी समांतर रद्द केले होते ते या शहरात आहे. शासनाच्या सेवेत आहे त्यांनीच मा.कोर्टात मत मांडावे. जो फरक येतो तो त्याची भरपाई कशी करायची त्यांचेकडे जबाबदारी फिक्स करावी.

मा.महापौर :कंपनीचा प्रस्ताव व प्रशासनाने पर्याय ठेवले आहे प्रशासनाचा प्रस्ताव आहे सर्वांना माहिती दिली आहे.

श्री.प्रमोद राठोड :उशीरा प्रत मिळाली महत्वाच्या विषय आहे. पुढचे २५ वर्ष पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी हा विषय आहे. यावर सखोल चर्चा करून विविध तज्ञाची मते जाणून घ्यावीत. त्यानंतर निर्णय होणे अपेक्षीत आहे. यावर अभ्यास करणेसाठी वेळ मिळाला नाही. यासाठी विशेष सभा लावावी.

श्री.सिताराम सुरे :रात्री आठ वाजता या प्रस्तावाची प्रत मिळाली. यामध्ये आर्थीक व कायदेशीर तसेच तांत्रिक बाबी महत्वाच्या आहेत. या विषयासाठी चर्चेला पुरेसा वेळ द्यावा शहरातील जनतेचे मत मागवावे. त्यानंतरच ही सभा घ्यावी. अनेक पक्षाचे नेत्यांनी जनतेचे मत जाणून घ्यावे असे म्हटले आहे.

श्री.राजेंद्र जंजाळ :प्रशासनाने प्रस्ताव दिला. यात कंपनीने पत्र दिले त्याची प्रत आहे. जेव्हा सभागृहाने समांतरचा करार रद्द केला होता त्या भावना काय होत्या? तो सुध्दा ठराव प्रशासनाचाच होता. त्यावेळी प्रशासनाला समांतरच्या करारामध्ये काय काय त्रृटी आढळल्या होत्या? त्या त्रृटी समोर ठेवून हा करार रद्द केला पाहिजे म्हणून प्रस्ताव दिला. आता पुनरुज्जीवन करायचा ठराव येतो तर त्यावेळी प्रशासनाला ज्या अटी शर्ती बाधक वाटल्या होत्या त्या जनतेच्या विरोधातल्या वाटल्या होत्या. त्या सर्व अटी व नियम यात बदलणार आहेत का? जे कंपनीचे व राज्य शासनाचे जे म्हणणे आहे शासनाचा पैसा तिजोरीमध्ये पडून आहे. मागे ठराव घेतला होता की, जायकवाडी ते नक्षत्रवाडी लाईन बदलली पाहिजे. आता ठराव देतांना कंपनी सांगते की, याचे टेक्नीकल लाईफ संपलेले आहे. परंतु कंपनीने जेव्हा सुरूवातीला काम सुरू केले तेव्हा का लक्षात आले नाही? माईलस्टोन ठरविले असतांना जायकवाडी ते नक्षत्रवाडी पर्यंतची लाईन टाकणे आवश्यक होते ते केले नाही. ते त्यानुसार काम का केले नाही? प्रशासनाने

सुध्दा हा ठराव अभ्यास करून सदस्यांना योग्य तो वेळ देऊन यासाठी स्पेशल सभा लावण्यात यावी.

श्री.नासेर सिद्दीकी :प्रशासनाने डिटेल दिले. परंतु हा प्रस्ताव १० वाजता मिळाला तर ११ वाजता त्यावर चर्चा करू शकत नाही.

श्री.दिलीप थोरात :अभ्यास करण्यासाठी वेळ द्यावा. विशेष सभा लावावी. माझ्या माहिती प्रमाणे १२०० लाईन टाकली होती आणि जायकवाडी मध्ये मुख्य वर्क केले होते. तेथे १०० एमएलडीचे पाणीपुरवठ्याची योजना कार्यान्वित केली होती. त्या हेडवर्क मध्ये आणखी ॲडीशनल व्यवस्था केली होती की, १०० एमएलडी पाणी त्याच हेड वर्क मधून उपलब्ध करू शकतो. ही लाईन किती दिवस चालू शकते? यावर अभ्यास करण्याची गरज आहे. तज्ञ लोकांकडून माहिती घ्यावी. ते घेतल्यानंतर ते सभेपूढे ठेवावे. त्या सोबत फारोळा येथे १०० एमएलडीचे जलशुध्दीकरण केले आहे. त्यामध्येच वेगळे १०० एमएलडीसाठी वेगळी प्रोव्हीजन करून ठेवली आहे. पंप हाऊस मध्ये १०० एमएलडी सोबत आणखी मशीनरी लावली तर २०० एमएलडी पाणी आहे. त्याच एक्झीटींग लाईन वरून घेऊ शकतो. याची माहिती ही पुढील जेव्हा या विषयावर सभा होईल त्यावेळी ठेवावी. नक्षत्रवाडी येथे जो पम्प केला आहे तो वापरात नाही. ते बायपास करून प्रेशरनेच पाणी इथपर्यंत आणतो. ही माहिती ठेवावी. १०० एमएलडी पाणी आणू शकलो तर पुढील १० वर्ष आणखी चांगले प्रकारे पाणी पुरवठा करू शकतो.

श्री.राजू शिंदे :कचऱ्याची समस्या तशीच पाण्याची समस्या आहे. समांतर झाली तर प्रश्न सुटेल असे मा.आयुक्तांना वाटले असेल म्हणून प्रस्ताव ठेवला.

मा.महापौर :परवा या विषया संदर्भात मा.न्यायालयात तारीख आहे. हा विषय प्रलंबीत नको म्हणून ठेवला. सदस्यांनी मत मांडावे.

श्री.राजू शिंदे :दि.३०-६-२०१६ ला ठराव रद्द केला. त्यावेळी मा.आयुक्तांनी जे त्यावेळी सांगितले होते ते दाखवावे. मी एकटा त्यावेळी विरोध करीत होतो की, ही योजना रद्द करू नका. त्यावेळी माझे असे म्हणणे होते की, जायकवाडी ते शहरापर्यंत लाईन कम्प्लीट करून घ्यावी. त्या सभेत मा.आयुक्तांनी मोठमोठे रिजन दिले. ठराव रद्द केला. या प्रोजेक्ट वर १० आयएएस अधिकारी यांनी काम केले. असे असतांना एक एकतर्फी निर्णय श्री.बकोरीया साहेबांनी घेतला त्याचे मत येथे घ्यावे. मा.आयुक्तांचे मत घ्यावे. मा.न्यायालयात काय दाखल करायचे? अधिकारी यांनी निर्णय घ्यावा. नागरीक विरोध करीत आहे. अधिकारी समांतर आल्याशिवाय पाणी मिळणार नाही असे सांगता. श्री.बकोरीया यांनाही सभागृहात माहिती देणेसाठी बोलविण्यात यावे.

श्री.नासेर सिद्दीकी :यावर चर्चा होऊ नये विशेष सभा घ्यावी.

श्री.भाऊसाहेब जगताप :विशेष सभा घ्यावी.

श्री.विकास जैन :जे काही आजपर्यंत घडले ते समोर यावे. महत्वाचा विषय आहे. ७० पाने एकूण आहे. यावर अभ्यास झालेला नसेल यासाठी विशेष सभा घ्यावी.

मा.उपमहापौर :विशेष सभा आयोजित १०-१५ दिवसांनी आयोजित करावी.

मा.महापौर :कंपनीने सादर केलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने प्रशासनाने त्यांचे तांत्रिक बाबींसह विचार करून प्रस्ताव ठेवला. हा विषय महत्वाचा व जिव्हाळ्याचा विषय आहे. करारनामा रद्द करण्याचा निर्णय घेतला होता. प्रकरण मा.न्यायालयात

आहे. यावर अभ्यास करून विचार मांडावे लागेल. प्रस्ताव उशीरा सदस्यांना मिळाला असेल. औपचारीकता म्हणून सदस्यांना प्रस्ताव दिला. सर्व सदस्यांच्या सुचना व भावनेचा आदर करून या विषयावर विशेष सभा घेण्यात येईल. प्रशासनाने सर्व तयारी निशी यावे. मा.न्यायालयात या प्रकरणाची काय स्थिती आहे? जेव्हा सभा होईल त्यावेळी संपुर्ण सभेच्या कामकाजाची व्हिडीओ शुटिंग करावे.

**मा.महापौर** **:विषय क्रमांक ५११ ते ५५० व ५५२ ते ५६५ व इतर सर्व विषय मंजूर.**

श्रीमती रेशमा कुरेशी :शनिमंदीरजवळ मोठा कचरा साचला आहे. तो उचलावा.

श्री.जमीर कादरी :बेगमपूरा स्मशानभुमी मध्ये कचरा टाकलेला आहे तो उचलावा.

कु.सायली जमादार :विषय क्रमांक ५५० मध्ये निधीची तफावत आहे. दोन्ही वार्डात समान निधी द्यावा.

मा.महापौर :आमदार रोड कॉंक्रीट केला तर निधी वाढणारच आहे. तसेच मा.आयुक्तांनी घनकचरा संकलन व वाहतुकीच्या कामामध्ये सुसूत्रीकरण बाबत तो मंजूर दिला आहे. तसेच एक एजन्सीला काम न देता तीन-तीन झोन करून तीन एजन्सीला काम द्यावे.

श्री.राजू शिंदे :जी चांगली एजन्सी असेल तिला काम द्यावे. एका एजन्सीला दिले तरी हरकत नाही.

मा.महापौर :योग्य त्या एजन्सीला काम द्यावे. मा.आयुक्तांना अधिकार देण्यात येतात. लाईट व पाण्याच्या संदर्भात ज्या संचिका प्रलंबीत असेल त्यावर मा.आयुक्तांच्या सह्यस घेऊन कार्यवाही करावी.

## <u>स.पालिका सदस्यांकडून आलेले प्रस्ताव</u>

**<u>विषय क्रमांक ५११:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.३५, गल्ली नं.७, नारेगाव मार्ग व चौकास परिसरातील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते “प्रकाश नानाभाऊ गोंडे” यांचे नाव देण्यात यावे. अशी नागरीकांची मागणी असल्याने सदरील मार्गास व चौकास त्यांचे नाव देण्यात यावे.

करीता, प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.गोकुळसिंग संपतसिंग मलके **अनुमोदक:-**श्री.राजु रामराव शिंदे

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.३५, गल्ली नं.७, नारेगाव मार्ग व चौकास परिसरातील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते “प्रकाश नानाभाऊ गोंडे” यांचे नाव देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ५१२:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सन २०१८-१९ च्या अर्थसंकल्पातील खालील कामे रद्द करून प्रभागात आवश्यक असणारी दुसरी विकास कामे करणे बाबत लेखाशिर्ष बदलाचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

| अ.क्र. | रद्द करावयाचे कामांचे नाव | करावयाचे कामांचे नाव |
|---|---|---|
| १. | सन २०१८-१९ च्या अर्थसंकल्पात एस.सी.आर.झोन क्र.०४, पान क्र.१५ | १. प्रभाग क्र.३०, पवननगर अंतर्गत विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणे व दुरुस्त करणे |

| | | |
|---|---|---|
| | वरील अ.क्र.३६ वर प्रभाग क्र.३०, पवननगर प्रभागांतर्गत मधूकर सोसायटी मध्ये ट्रिमिक्स सिमेंट कॉंक्रीट रस्ता तयार करणे, र.रु.२०.०० लक्ष. | र.रु.१०.०० लक्ष.<br>२. प्रभाग क्र.३०, पवननगर अंतर्गत एन-९,एन-२ संत ज्ञानेश्वर नगर येथे खुल्या जागेत पेव्हर ब्लॉक बसविणे र.रु.०३.०० लक्ष. |
| २. | सन २०१८-१९ च्या अर्थसंकल्पात एस.सी.आर.झोन क्र.०४, पान क्र.१७ वरील अ.क्र.०५ वर प्रभाग क्र.३०, पवननगर प्रभागांतर्गत विविध ठिकाणी जी.आय. व डी.आय. जलवाहिनी टाकणे. र.रु.४०.०० लक्ष. | प्रभाग क्र.३०, पवननगर अंतर्गत विविध ठिकाणी सिमेंट कॉंक्रीट रस्ता तयार करणे. र.रु.१५.०० लक्ष |
| ३. | सन २०१८-१९ च्या अर्थसंकल्पात एस. सी.आर.झोन क्र.०४, पान क्र.१५ वरील अ.क्र.०५ वर प्रभाग क्र.३०, पवननगर प्रभागांतर्गत विविध ठिकाणी पोल व पथदिवे लावणे व दुरुस्त करणे. र.रु.२०.०० लक्ष. | १. वॉर्ड क्र.३०, पवननगर अंतर्गत विविध ठिकाणी सिमेंट कॉंक्रीट रस्ते तयार करणे. र.रु.१०.०० लक्ष.<br>२. वॉर्ड क्र.३०, पवननगर अंतर्गत विविध ठिकाणी नविन ड्रेनेज लाईन टाकणे व दुरुस्त करणे. र.रु.०५.०० लक्ष.<br>३. वॉर्ड क्र.३०, पवननगर अंतर्गत पावसाचे पाणी वाहून जाण्यासाठी भुमिगत गटार व कॅचपीट बांधणे. र.रु.०५.०० लक्ष. |

**सुचक:-**श्री.नितीन रमन चित्ते **अनुमोदक:-**श्री. मोहन धन्नुलाल मेघावाले

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन २०१८-१९ च्या अर्थसंकल्पातील खालील कामे रद्द करून प्रभागात आवश्यक असणारी दुसरी विकास कामे करणे बाबत लेखाशिर्ष बदलाचा प्रस्तावास मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र. | रद्द करावयाचे कामांचे नाव | करावयाचे कामांचे नाव |
|---|---|---|
| १. | सन २०१८-१९ च्या अर्थसंकल्पात एस.सी.आर.झोन क्र.०४, पान क्र.१५ वरील अ.क्र.३६ वर प्रभाग क्र.३०, पवननगर प्रभागांतर्गत मधूकर सोसायटी मध्ये ट्रिमिक्स सिमेंट कॉंक्रीट रस्ता तयार करणे, र.रु.२०.०० लक्ष. | १. प्रभाग क्र.३०, पवननगर अंतर्गत विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणे व दुरुस्त करणे र.रु.१०.०० लक्ष.<br>२. प्रभाग क्र.३०, पवननगर अंतर्गत एन-९,एन-२ संत ज्ञानेश्वर नगर येथे खुल्या जागेत पेव्हर ब्लॉक बसविणे र.रु.०३.०० लक्ष. |
| २. | सन २०१८-१९ च्या अर्थसंकल्पात एस.सी.आर.झोन क्र.०४, पान क्र.१७ वरील अ.क्र.०५ वर प्रभाग क्र.३०, पवननगर प्रभागांतर्गत विविध ठिकाणी जी.आय. व डी.आय. जलवाहिनी टाकणे. र.रु.४०.०० लक्ष. | प्रभाग क्र.३०, पवननगर अंतर्गत विविध ठिकाणी सिमेंट कॉंक्रीट रस्ता तयार करणे. र.रु.१५.०० लक्ष |
| ३. | सन २०१८-१९ च्या अर्थसंकल्पात एस. सी.आर.झोन क्र.०४, पान क्र.१५ | १. वॉर्ड क्र.३०, पवननगर अंतर्गत विविध ठिकाणी सिमेंट कॉंक्रीट रस्ते तयार करणे. र.रु.१०.०० |

| | | |
|---|---|---|
| | वरील अ.क्र.०५ वर प्रभाग क्र.३०, पवननगर प्रभागांतर्गत विविध ठिकाणी पोल व पथदिवे लावणे व दुरुस्त करणे. र.रु.२०.०० लक्ष. | लक्ष.<br>२. वॉर्ड क्र.३०, पवननगर अंतर्गत विविध ठिकाणी नविन ड्रेनेज लाईन टाकणे व दुरुस्त करणे. र.रु.०५.०० लक्ष.<br>३. वॉर्ड क्र.३०, पवननगर अंतर्गत पावसाचे पाणी वाहून जाण्यासाठी भुमिगत गटार व कॅचपीट बांधणे. र.रु.०५.०० लक्ष. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ५१३:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम १०३ व कलम १०४ अन्वये सन २०१७-१८ चे सुधारीत व कलम ९६ नुसार स्थायी समितीने पारीत केलेले सन २०१८-१९ चे मुळ अंदाज पत्रक (अ-क) मध्ये दर्शविलेल्या कामाचे लेखाशिर्ष बदलण्या बाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

| अ.क्र. | जुने कामांचे नाव | नवीन कामांचे नाव |
|---|---|---|
| १ | वॉर्ड क्र.११५, सातारा अंतर्गत जनसेवा प्लॉटींग सेंटर ते रसिका पार्लर पर्यंतच्या रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे. तरतुद रु.१०.०० लक्ष.<br>पान.क्र.Ward-8-Spill-218, अ.क्र.26 | वॉर्ड क्र.११५, सातारा अंतर्गत विविध ठिकाणी रस्त्याचे खडीकरण करणे. या कामासाठी र.रु.१० लक्ष वळती करण्यात यावे. |
| २ | वॉर्ड क्र.११५, पोलीस स्टेशन ते श्री.पांडव यांच्या घरापर्यंत डांबरीकरण करणे. तरतुद रु.२५.०० लक्ष.<br>पान.क्र.Zone-8-Spill-205, अ.क्र.52 | वॉर्ड क्र.११५, सातारा अंतर्गत विविध ठिकाणी पेव्हर ब्लॉक बसविणे. तरतुद रु.२५.०० लक्ष. |

**सुचक:-**कु.सायली भागवत जमादार **अनुमोदक:-**श्रीमती मनिषा विनोद लोखंडे

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.११५ येथे खालील कामाचे लेखाशिर्ष बदलण्यास मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र. | जुने कामांचे नाव | नवीन कामांचे नाव |
|---|---|---|
| १ | वॉर्ड क्र.११५, सातारा अंतर्गत जनसेवा प्लॉटींग सेंटर ते रसिका पार्लर पर्यंतच्या रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे. तरतुद रु.१०.०० लक्ष.<br>पान.क्र.Ward-8-Spill-218, अ.क्र.26 | वॉर्ड क्र.११५, सातारा अंतर्गत विविध ठिकाणी रस्त्याचे खडीकरण करणे. या कामासाठी र.रु.१० लक्ष वळती करण्यात यावे. |
| २ | वॉर्ड क्र.११५, पोलीस स्टेशन ते श्री.पांडव यांच्या घरापर्यंत डांबरीकरण करणे. तरतुद रु.२५.०० लक्ष.<br>पान.क्र.Zone-8-Spill-205, अ.क्र.52 | वॉर्ड क्र.११५, सातारा अंतर्गत विविध ठिकाणी पेव्हर ब्लॉक बसविणे. तरतुद रु.२५.०० लक्ष. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ५१४:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.१६, भावसिंगपुरा, भिमनगर या भागात मोठ्या प्रमाणात दलित वस्ती असून अनेक वर्षापासून मुलभूत सुविधा पासून वंचित असलेली वस्ती

भावसिंगपुरा, भिमनगर या भागांतर्गत असलेल्या स्लम वस्त्या, गावठाण, गीतानगर, कोयनानगर, पंडीत कॉलनी, साठेनगर, मुक्ताईनगर, बॉबीनगर, दिपनगर, नवयुग कॉलनी, कानिफनाथ कॉलनी, प्रभातनगर, साईनगर या सर्व वसाहतीमध्ये अनेक वर्षापासून पिण्याचे पाणी, सिमेंट कॉंक्रीट रस्ते, ड्रेनेज लाईन, दिवा बत्ती, नाल्याचे संरक्षण भिंती, पुल बांधणे, वाचनालये उभारणे, स्मशानभुमी, आर.सी.सी. शेड उभारणे, सामाजिक सभागृह उभारणे, व्यायाम शाळा उभारणे गरजेचे असून वरील सर्व सुविधांपासून भावसिंगपूरा, भिमनगर या भागातील नागरीक या सुविधांपासून बऱ्याच वर्षापासून वंचित असून वॉर्डातील भावसिंगपुरा, भिमनगर या भागातील नागरिकांची कळकळीची विनंती असून मा.सर्वसाधारण सभेमध्ये सन २०१८-१९ या वर्षाच्या दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत निधी मिळण्याकरीता प्रस्ताव मंजुर करून शासनाकडे पाठविण्यास्तव प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती मनिषा विनोद लोखंडे **अनुमोदक:-**श्री.सिताराम इसराम सुरे

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.१६, भावसिंगपुरा, भिमनगर या भागांतर्गत असलेल्या स्लम वस्त्या, गावठाण, गीतानगर, कोयनानगर, पंडीत कॉलनी, साठेनगर, मुक्ताईनगर, बॉबीनगर, दिपनगर, नवयुग कॉलनी, कानिफनाथ कॉलनी, प्रभातनगर, साईनगर या सर्व वसाहतीमध्ये दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत विविध नागरी विकास कामे करण्यासाठी निधी मिळण्याकरीता प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ५१५:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.२०, आनंदनगर येथे असलेल्या उद्यानास “शिफा गार्डन” असे नाव देण्याकरीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.सय्यद मतीन रशीद **अनुमोदक:-**श्री.गंगाधर नामदेव ढगे

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.२०, आनंदनगर येथे असलेल्या उद्यानास “शिफा गार्डन” असे नाव देण्यास मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ५१६:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, दिनांक २१ जुलै-२०१८ रोजी रात्री १२ वाजता बजरंग चौक, एन-६ येथे पावसामुळे साचलेल्या पाण्यामुळे नाल्यामध्ये पडून या परिसरातील युवक चेतन रत्नाकर चोपडे, रा.एन-६, सिडको यांचा दुर्दैवी मृत्यु झाला. त्यांच्या अकाली मृत्युमुळे त्यांचे कुटूंबीय संकटात सापडले असून त्यांना महानगरपालिकेतर्फे रक्कम रुपये ०५.०० लक्ष व कुटूंबातील एका सदस्यास महानगरपालिकेत नोकरी देण्यात यावी, करीता, प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.विजय साईनाथ औताडे, श्री.वैद्य रेणुकादास (राजु) दत्तोपंत, श्री.शिवाजी भाऊसाहेब दांडगे, श्री.मकरंद माधवराव कुलकर्णी.

**अनुमोदक:-**श्री.प्रमोद प्रल्हाद राठोड, श्री.विकास रतनलाल जैन, श्री.राजगौरव हरिदास वानखेडे, श्री.भगवान देविदास घडमोडे, श्री.राजु रामराव शिंदे

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, दिनांक २१ जुलै-२०१८ रोजी बजरंग चौक, एन-६ येथे पावसामुळे साचलेल्या पाण्यामुळे नाल्यात पडून मयत झालेले युवक चेतन रत्नाकर चोपडे, रा.एन-६, सिडको यांची

पत्नी नामे श्रीमती राणी चेतन चोपडे यांच्या नावे र.रु.२ लक्ष व मुलगी कु.सई चेतन चोपडे, वय वर्षे ३ हिच्या नावे र.रु.३ लक्ष राष्ट्रीयकृत/शेड्युल बँकेमध्ये एक वर्षाच्या कालावधीसाठी फिक्स डिपॉझीट करण्यात यावेत. असे एकूण र.रु.५ लक्ष महानगरपालिकेतर्फे आर्थिक मदत करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ५१७:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, अर्थसंकल्प सन २०१८-१९ मध्ये वॉर्ड क्र.३५ नारेगाव अंतर्गत असलेल्या विकास कामांचे लेखाशिर्ष खालीलप्रमाणे बदलणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | अर्थसंकल्प सन २०१८-१९ मधील लेखाशिर्ष | नवीन कामाचे लेखाशिर्ष |
|---|---|---|
| ०१ | वॉर्ड क्र.३५, नारेगाव मध्ये विविध भागात डांबरीकरण करणे. र.रु.२५.०० लक्ष.<br>पान क्र.एससीआर-झोन 05-No-18 अ.क्र.२ | वॉर्ड क्र.३५ नारेगाव अंतर्गत विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणे.र.रु.२५.०० लक्ष. |

करीता, प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.गोकुळसिंग संपतसिंग मलके **अनुमोदक:-**श्री.राजेंद्र हिम्मतराव जंजाळ

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.३५ नारेगाव अंतर्गत असलेल्या विकास कामांचे लेखाशिर्ष खालीलप्रमाणे बदलण्यास मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र. | अर्थसंकल्प सन २०१८-१९ मधील लेखाशिर्ष | नवीन कामाचे लेखाशिर्ष |
|---|---|---|
| ०१ | वॉर्ड क्र.३५, नारेगाव मध्ये विविध भागात डांबरीकरण करणे. र.रु.२५.०० लक्ष.<br>पान क्र.एससीआर-झोन 05-No-18 अ.क्र.२ | वॉर्ड क्र.३५ नारेगाव अंतर्गत विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणे.र.रु.२५.०० लक्ष. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ५१८:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्रमांक-१०८ हमालवाडा, रेल्वेस्टेशन अंतर्गत महानगरपालिका मार्फत हजरत शाहशोक्ता मियाँ (रहे.) उर्दु प्राथमिक शाळा सुरु करण्यात आलेली आहे. या उर्दु प्राथमिक शाळेत इयत्ता ८ वी मधील उत्तीर्ण झालेल्या गरीब मुले व मुलींची संख्या ही जास्त असल्यामुळे गोरगरीब मुले व मुली हे शिक्षणापासुन वंचित राहु नये,

करिता सदरील शाळेत इयत्ता ९ वी पर्यंतच्या वर्गाची व्यवस्था करण्यासाठीचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती मुल्ला सलीमा बेगम खाजोद्दीन **अनुमोदक:-**श्री.सिद्दीकी नासेर तकिउद्दीन

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्रमांक-१०८ हमालवाडा, रेल्वेस्टेशन अंतर्गत महानगरपालिका मार्फत हजरत शाहशोक्ता मियाँ (रहे.) उर्दु प्राथमिक शाळेत इयत्ता ९ वी पर्यंतच्या वर्गाची व्यवस्था करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ५१९:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, क्रांतीचौक प्रभागातील क्रांतीचौक येथील झाशीची राणी उद्यानामध्ये स्वामी रामानंदतीर्थ व तात्या टोपे यांचा पुतळा उभारण्यात यावा.

करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती शिल्पाराणी सागर वाडकर **अनुमोदक:-**श्री.वैद्य रेणुकादास (राजु) दत्तोपंत

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, क्रांतीचौक प्रभागातील क्रांतीचौक येथील झाशीची राणी उद्यानामध्ये स्वामी रामानंदतीर्थ व तात्या टोपे यांचा पुतळा उभारण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ५२०:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.१९, अंतर्गत आरेफ कॉलनी या ठिकाणी औरंगाबाद महानगरपालिकेमार्फत NHUM योजनेतून दवाखाना उभारण्यात येत आहे. या दवाखान्यास “रहीम अहेमद कादरी” असे नाव देण्यात यावे.

करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.जमीर अहेमद कादरी **अनुमोदक:-**श्री.गंगाधर नामदेव ढगे

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.१९, अंतर्गत आरेफ कॉलनी या ठिकाणी औरंगाबाद महानगरपालिकेमार्फत NHUM योजनेतून उभारण्यात आलेल्या दवाखान्यास “रहीम अहेमद कादरी” असे नाव देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ५२१:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.११२, शिवाजीनगर येथील सेक्टर-ई व साईनगर, रेणुकानगर, भारतनगर येथे रस्त्याची जलनिस्सा:रण वाहिन्या, जलवाहिन्या टाकण्याची कामे करणे आवश्यक आहे. सदर वस्ती ही दलित बहुल वस्ती असल्यामुळे खालील कामासाठी दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत निधी प्राप्त करून घेण्यासाठी मा.जिल्हाधिकारी कार्यालयास प्रस्ताव सादर करावा.

| अ.क्र. | कामाचे नाव | रक्कम रुपये |
|---|---|---|
| १. | शिवाजीनगर सेक्टर-ई येथे जलनिस्सा:रण वाहिन्या टाकणे | २४ लाख |
| २. | शिवाजीनगर सेक्टर-ई येथे रस्ते कॉंक्रीट करणे | ६८ लाख |
| ३. | भारतनगर, रेणुकानगर येथे रस्ते कॉंक्रीट करणे | ४९ लाख |
| ४. | भारतनगर येथे जलवाहिन्या टाकणे | १० लाख |

करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.राजेंद्र हिम्मतराव जंजाळ **अनुमोदक:-**श्री.गजानन भानुदास मनगटे

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.११२, शिवाजीनगर, सेक्टर-ई व साईनगर, रेणुकानगर, भारतनगर येथे खालील कामासाठी दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत निधी प्राप्त होण्यासाठी प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी कार्यालयास पाठविण्यास मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र. | कामाचे नाव | रक्कम रुपये |
|---|---|---|
| १. | शिवाजीनगर सेक्टर-ई येथे जलनिस्सा:रण वाहिन्या टाकणे | २४ लाख |
| २. | शिवाजीनगर सेक्टर-ई येथे रस्ते कॉंक्रीट करणे | ६८ लाख |
| ३. | भारतनगर, रेणुकानगर येथे रस्ते कॉंक्रीट करणे | ४९ लाख |
| ४. | भारतनगर येथे जलवाहिन्या टाकणे | १० लाख |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ५२२:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.३८, एम.आय.डी.सी.चिकलठाणा अंतर्गत धूत हॉस्पीटल जवळील चौकात अशोक स्तंभ आहे. या परिसरात मोठ्या संख्येने गौतम बुध्दांना मानणारे नागरीक राहतात. सदरील चौक जालना रोड लगत असल्याने या रस्त्यावरून सतत देशी विदेशी पर्यटकांचे येणे-जाणे चालू राहते. तथागत गौतम बुध्द हे जगाला शांतीचा संदेश देणारे महामानव होते.

सदरील चौकाला "तथागत गौतम बुध्द" असे नाव देण्यात यावे. करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.राजु रामराव शिंदे

**अनुमोदक:-**श्री.सोहेल शकील शेख, श्री.गोकुळसिंग संपतसिंग मलके, श्री.भाऊसाहेब उत्तमराव जगताप, श्री.गजानन भानुदास मनगटे.

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.३८, एम.आय.डी.सी.चिकलठाणा अंतर्गत असलेल्या धूत हॉस्पीटल जवळील चौकाला "तथागत गौतम बुध्द" असे नाव देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ५२३:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.३३, मिसरवाडी येथे सन-२०१८-१९ या वर्षाच्या अर्थसंकल्पातील स्पील ओव्हर कामाचे व मा.स्थायी समितीने शिफारस केलेल्या खालील कामांचे लेखाशिर्ष वॉर्डातील नागरीकांच्या सुविधेसाठी वळती करण्यात यावे.

| अ.क्र. | जुने लेखाशिर्ष | |
|---|---|---|
| ११४ | वॉर्ड क्र.३३ अंतर्गत श्रीकृष्णनगर श्री.जैस्वाल यांच्या घरापासून ते श्री.अब्दुल वासीद ते श्री.जहीर मौलाना यांच्या घरापर्यंत ट्रिमीक्स सिमेंट कॉंक्रीट रस्ता तयार करणे. र.रु.१९ लक्ष ९९ हजार | Zone-05-Spill P.No.126 |
| १ | प्रभाग क्र.३३ मध्ये विविध भागात डांबरीकरण करणे. र.रु.१० लक्ष | SCR-Zone-05-P.No.18 |

या कामाऐवजी वॉर्ड क्र.३३ मिसरवाडी येथे मिलींदनगर परिसरात सिमेंट रस्ता तयार करणेसाठी र.रु.१९ लक्ष ९९ हजार व वॉर्ड क्र.३३ मिसरवाडी येथे परिसरात सिमेंट रस्ता तयार करणे र.रु.१० लक्ष अशी कामे करण्यासाठी लेखाशिर्ष वळती करण्यासाठीचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती शबनम बेगम कलीम कुरेशी **अनुमोदक:-**श्रीमती खतीजा बी छोटू कुरेशी

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.३३, मिसरवाडी येथे खालील कामांचे लेखाशिर्षक वॉर्डातील नागरीकांच्या सुविधेसाठी वळती करण्यास मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र. | जुने लेखाशिर्ष | |
|---|---|---|
| ११४ | वॉर्ड क्र.३३ अंतर्गत श्रीकृष्णनगर श्री.जैस्वाल यांच्या घरापासून ते श्री.अब्दुल वासीद ते श्री.जहीर मौलाना यांच्या घरापर्यंत ट्रिमीक्स सिमेंट कॉंक्रीट रस्ता तयार करणे. र.रु.१९ लक्ष ९९ हजार | Zone-05-Spill P.No.126 |

| | | |
|---|---|---|
| १ | प्रभाग क्र.३३ मध्ये विविध भागात डांबरीकरण करणे. र.रु.१० लक्ष | SCR-Zone-05-P.No.18 |

या कामाऐवजी वॉर्ड क्र.३३ मिसरवाडी येथे मिलींदनगर परिसरात सिमेंट रस्ता तयार करणेसाठी र.रु.१९ लक्ष ९९ हजार व वॉर्ड क्र.३३ मिसरवाडी येथे परिसरात सिमेंट रस्ता तयार करणे र.रु.१० लक्ष अशी कामे करण्यासाठी लेखाशिर्ष वळती करण्यास मंजुरी देण्यात येते. कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ५२४:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.०२, भगतसिंगनगर अंतर्गत खालील दर्शविलेल्या विकास कामाचे लेखाशिर्षक बदलण्यात यावे.

| पान क्रमांक | जुने कामाचे नाव ह्यापैकी | त्याऐवजी नवीन कामाचे नाव |
|---|---|---|
| Zone-04-SCR-P.No.-13 Sr.No.02 | वॉर्ड क्र.०२ अंतर्गत विविध ठिकाणी डांबरीकरण करणे. (र.रु.५० लक्ष) | १.वॉर्ड क्र.०२, भगतसिंगनगर अंतर्गत पिसादेवी रोड अंतर्गत विविध ठिकाणी सिमेंट कॉंक्रीटीकरण करणे. (र.रु.५० लक्ष) |

करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.बन्सी ग्यानु जाधव **अनुमोदक:-**श्री.सिताराम इसराम सुरे

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.०२, भगतसिंगनगर अंतर्गत खालील दर्शविलेल्या विकास कामाचे लेखाशिर्षक बदलण्यास मंजुरी देण्यात येते.

| पान क्रमांक | जुने कामाचे नाव ह्यापैकी | त्याऐवजी नवीन कामाचे नाव |
|---|---|---|
| Zone-04-SCR-P.No.-13 Sr.No.02 | वॉर्ड क्र.०२ अंतर्गत विविध ठिकाणी डांबरीकरण करणे. (र.रु.५० लक्ष) | १.वॉर्ड क्र.०२, भगतसिंगनगर अंतर्गत पिसादेवी रोड अंतर्गत विविध ठिकाणी सिमेंट कॉंक्रीटीकरण करणे. (र.रु.५० लक्ष) |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ५२५:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मनपा हद्दीतील औरंगाबाद शहरामध्ये पुरामुळे किंवा नैसर्गिक आपत्तीमुळे मनपा हद्दीत राहणाऱ्या नागरीकांचा मृत्यु झाल्यास त्यांच्या नातेवाईकांकडून नुकसान भरपाईची मागणी होत असते. अशा घटनांमध्ये मृत व्यक्तीच्या वारसांना आर्थिक मदत दिली जाते. अशा प्रकारच्या नैसर्गिक आपत्तीने मृत्यु ओढवल्यास आर्थिक मदत देता यावी, या करीता महानगरपालिकेतर्फे विमा काढण्यात यावा.

करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.विकास रतनलाल जैन **अनुमोदक:-**श्री.वैद्य रेणुकादास (राजु) दत्तोपंत

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मनपा हद्दीतील औरंगाबाद शहरामध्ये पुरामुळे किंवा नैसर्गिक आपत्तीमुळे मनपा हद्दीत राहणाऱ्या नागरीकांचा मृत्यु झाल्यास मृत व्यक्तीच्या वारसांना आर्थिक मदत मदत देता यावी या करीता महानगरपालिकेतर्फे विमा काढण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ५२६:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.८४, ज्ञानेश्वरी कॉलनी, आदर्श कॉलनी व छत्रपती शिवाजी महाराज सार्वजनिक क्रिडा मैदान एन-२ हे तीनही रस्ते जेथे मिळतात त्या चौकास

“श्री.महाराणा प्रताप सिंह चौक” असे नाव देण्यात यावे. अशी या वॉर्डातील नागरीकांची बऱ्याच वर्षापासून मागणी आहे.

करीता, प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्री.कमलाकर शामराव जगताप **अनुमोदक:-** श्रीमती सत्यभामा दामु अण्णा शिंदे
मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.८४, ज्ञानेश्वरी कॉलनी, आदर्श कॉलनी व छत्रपती शिवाजी महाराज सार्वजनिक क्रिडा मैदान एन-२ हे तीनही रस्ते जेथे मिळतात त्या चौकास “श्री.महाराणा प्रताप सिंह चौक” असे नाव देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ५२७:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.३४, आरतीनगर, मिसरवाडी या भागात मनपाची बालवाडीचे वर्ग सुरू आहेत. या शाळेत गोर-गरीबांची मुले शिक्षण घेत आहेत. त्यांना पुढील शिक्षणाची व्यवस्था व्हावी. तसेच या बालवाडीच्या शिक्षकांनी परिसरात केलेल्या सर्वेनुसार किमान ३५ ते ४० विद्यार्थी पहिलीच्या वर्गात शिक्षण घेऊ शकतात.

करीता, वॉर्ड क्र.३४ मधील बालवाडीच्या शिक्षणाबरोबरच इयत्ता पहिलीचा वर्ग सुरू करण्यासाठी पुढील प्रशासकीय मान्यता तात्काळ मंजुर करून पहिलीचा वर्ग सुरु करण्याकरीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती संगिता सुभाष वाघुले **अनुमोदक:-**श्री.जागीरदार मोहम्मद अय्युब गुलाम जिलानी
मा.महापौर :प्रशासनाने कार्यवाही करावी. प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.३४ मधील बालवाडीच्या शिक्षणाबरोबरच इयत्ता पहिलीचा वर्ग सुरू करण्यासाठी नियमानुसार कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ५२८:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, कु.लक्ष्मी नरेंद्र दारवंटे, राहणार न्यायनगर, दुर्गामाता कॉलनी, गारखेडा परिसर ही विद्यार्थीनी इ.१२ वी मध्ये शिकत आहे. तिला धनुष्यबाण तिरंदाजी खेळाची आवड असून आजपर्यंत अनेक संस्थांनी तीचा याबद्दल सत्कारही केलेला आहे. तसेच तिने आजपर्यंत देशपातळीवर ३१ स्पर्धांमधून एकूण ५२ पदके प्राप्त केलेली आहेत.

कु.लक्ष्मी नरेंद्र दारवंटे, या विद्यार्थीनीस आंतरराष्ट्रीय स्पर्धेमध्ये भाग घ्यावयाचा असून, तिची आर्थीक परिस्थिती योग्य नसल्यामुळे तिने आर्थीक मदतीची मागणी केलेली आहे. अशा गुणवंत खेळाडूस मनपातर्फे र.रु.५.०० लक्ष अर्थसहाय्य करणेसाठी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.वैद्य रेणुकादास (राजु) दत्तोपंत **अनुमोदक:-**श्रीमती कमल रामचंद्र नरोटे
मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, कु.लक्ष्मी नरेंद्र दारवंटे, धनुष्यबाण तिरंदाजी खेळासाठी या विद्यार्थीनीस आंतरराष्ट्रीय स्पर्धेमध्ये भाग घेण्यासाठी मनपातर्फे र.रु.५.०० लक्षचा अर्थसहाय्य करणेस मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ५२९:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.७९, न्यायनगर अंतर्गत खालील दर्शविलेल्या विकास कामांचे लेखाशिर्षक बदलण्या बाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

| **जुने कामांचे नाव ह्यापैकी** | **त्याऐवजी नविन कामांचे नाव** |
|---|---|
| वॉर्ड क्र.७९, न्यायनगर अंतर्गत चौंडेश्वरी सोसायटी येथील छोटा रोड कॉंक्रीट करणे. Spill P.No.144, Sr.no.25 (र.रु.०५.०० लक्ष) | वॉर्ड क्र.७९, न्यायनगर येथील पुंडलिकनगर गल्ली क्र.०१ येथे Side Drain करणे. (र.रु.०५.०० लक्ष) |
| वॉर्ड क्र.७९, न्यायनगर अंतर्गत विविध ठिकाणी फुटकळ दुरुस्ती करणे. Spill P.No.140, Sr.no.43 (र.रु.०५.०० लक्ष) | वॉर्ड क्र.७९, न्यायनगर अंतर्गत कल्पतरु सोसायटी येथे पावसाच्या पाण्यासाठी Side Drain तयार करणे. (र.रु.०५.०० लक्ष) |
| वॉर्ड क्र.७९, न्यायनगर अंतर्गत शैलेश हॉटेल पासून ते मा.उच्च न्यायालयाच्या भिंतीपर्यंत डांबरीकरण करणे. Spill P.No.133, Sr.no.09 (र.रु.१४.६० लक्ष) | वॉर्ड क्र.७९, न्यायनगर अंतर्गत निरंतर बाग सोसायटी येथे गेट व कमान बांधणे. (र.रु.१४.६० लक्ष). |
| वॉर्ड क्र.७९, न्यायनगर अंतर्गत भुषणनगर येथे डांबरीकरण करणे. Spill P.No.133, Sr.no.11 (र.रु.११.७१ लक्ष) | वॉर्ड क्र.७९, न्यायनगर अंतर्गत दुर्गामाता कॉलनी येथे भव्य कमान उभारणे. (र.रु.११.७१ लक्ष) |

**सुचक:-**श्री.गजानन भानुदास मनगटे **अनुमोदक:-**श्री.पवार आत्माराम माणिकराव

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.७९, न्यायनगर अंतर्गत खालील दर्शविलेल्या विकास कामांचे लेखाशिर्षक बदलण्यास मंजुरी देण्यात येते.

| **जुने कामांचे नाव ह्यापैकी** | **त्याऐवजी नविन कामांचे नाव** |
|---|---|
| वॉर्ड क्र.७९, न्यायनगर अंतर्गत चौंडेश्वरी सोसायटी येथील छोटा रोड कॉंक्रीट करणे. Spill P.No.144, Sr.no.25 (र.रु.०५.०० लक्ष) | वॉर्ड क्र.७९, न्यायनगर येथील पुंडलिकनगर गल्ली क्र.०१ येथे Side Drain करणे. (र.रु.०५.०० लक्ष) |
| वॉर्ड क्र.७९, न्यायनगर अंतर्गत विविध ठिकाणी फुटकळ दुरुस्ती करणे. Spill P.No.140, Sr.no.43 (र.रु.०५.०० लक्ष) | वॉर्ड क्र.७९, न्यायनगर अंतर्गत कल्पतरु सोसायटी येथे पावसाच्या पाण्यासाठी Side Drain तयार करणे. (र.रु.०५.०० लक्ष) |
| वॉर्ड क्र.७९, न्यायनगर अंतर्गत शैलेश हॉटेल पासून ते मा.उच्च न्यायालयाच्या भिंतीपर्यंत डांबरीकरण करणे. Spill P.No.133, Sr.no.09 (र.रु.१४.६० लक्ष) | वॉर्ड क्र.७९, न्यायनगर अंतर्गत निरंतर बाग सोसायटी येथे गेट व कमान बांधणे. (र.रु.१४.६० लक्ष). |
| वॉर्ड क्र.७९, न्यायनगर अंतर्गत भुषणनगर येथे डांबरीकरण करणे. Spill P.No.133, Sr.no.11 (र.रु.११.७१ लक्ष) | वॉर्ड क्र.७९, न्यायनगर अंतर्गत दुर्गामाता कॉलनी येथे भव्य कमान उभारणे. (र.रु.११.७१ लक्ष) |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ५३०:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.३७, चिकलठाणा येथील हनुमान चौक येथे कब्रस्ताना समोर महानगरपालिकेचे सार्वजनिक शौचालय असून त्याचा वापर अनेक वर्षापासून नागरीक करीत नाहीत. सदरील जागेवर काही व्यक्तींनी घरगुती वापर सुरु केलेला आहे.

करीता, सदरील सार्वजनिक शौचालय तोडून त्या ठिकाणी व्यापारी संकुल बांधण्यात यावे. करीता, प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती वैशाली कारभारी जाधव
**अनुमोदक:-**श्री.भाऊसाहेब उत्तमराव जगताप, श्री.सोहेल शकील शेख
मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.३७, चिकलठाणा येथील हनुमान चौक येथील कब्रस्ताना समोर महानगरपालिकेचे सार्वजनिक शौचालय तोडून त्या ठिकाणी व्यापारी संकुल बांधण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ५३१:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, अर्थसंकल्प सन २०१८-१९ मध्ये वॉर्ड क्र.२, भगतसिंगनगर अंतर्गत असलेल्या विकास कामाचे लेखाशिर्ष खालीलप्रमाणे बदलणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | अर्थसंकल्प सन-२०१८-१९ मधील लेखाशिर्ष | नवीन कामाचे लेखाशिर्ष |
|---|---|---|
| ०१. | **नवीन कॉंक्रीट रस्ते**<br>प्रभाग क्र.२ मध्ये विविध भागात कॉंक्रीटची कामे करणे. र.रु.१.२५ कोटी.<br>पान क्र. एससीआर-झोन-०४-P.no.१३ अ.क्र.२ | वॉर्ड क्र.२ भगतसिंगनगर अंतर्गत साफल्यनगर येथे मंजुर रेखांकन १८०/१ मध्ये खुल्या जागेवर सामाजिक सभागृह बांधणे. र.रु.१०.०० लक्ष. |

करीता, लेखाशिर्ष बदलाचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.बन्सी ग्यानु जाधव **अनुमोदक:-**श्री.आत्माराम माणिकराव पवार
मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.२, भगतसिंगनगर अंतर्गत खालील विकास कामाचे लेखाशिर्ष बदलण्यास मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र. | अर्थसंकल्प सन-२०१८-१९ मधील लेखाशिर्ष | नवीन कामाचे लेखाशिर्ष |
|---|---|---|
| ०१. | **नवीन कॉंक्रीट रस्ते**<br>प्रभाग क्र.२ मध्ये विविध भागात कॉंक्रीटची कामे करणे. र.रु.१.२५ कोटी.<br>पान क्र. एससीआर-झोन-०४-P.no.१३ अ.क्र.२ | वॉर्ड क्र.२ भगतसिंगनगर अंतर्गत साफल्यनगर येथे मंजुर रेखांकन १८०/१ मध्ये खुल्या जागेवर सामाजिक सभागृह बांधणे. र.रु.१०.०० लक्ष. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

## ऐनवेळीचे विषय

**विषय क्रमांक ५३२:-**

आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, औरंगाबाद पाणी पुरवठा योजनेअंतर्गत फारोळा येथे १०० व ५६ दलली प्रतीदिन क्षमतेचे दोन जलशुध्दीकरण केंद्र असून या दोन्ही जलशुध्दीकरण केंद्रात दररोज १५० दलली पाण्यावर प्रक्रिया केली जाते. जलशुध्दीकरण प्रक्रियेत प्रामुख्याने तुरटी, ब्लिचींग पावडर व क्लोरिन गॅसचा वापर विविध टप्प्यांवर केला जातो. अशुध्द पाण्यात गढुळतेचे प्रमाण जास्त असते. पाण्यातील गढुळता कमी करण्यासाठी प्रामुख्याने तुरटी ग्रेड-१ चा वापर केला जातो. जायकवाडी उद्‌भवावरून येणाऱ्या पाण्यात गढूळतेचे प्रमाण कमी असते. तथापि, सरासरी १० पीपीएम इतकी तुरटी मात्रा वर्षभर द्यावी लागते. पावसाळ्याच्या दिवसांत धरणात नवीन पाण्याची आवक वाढल्यानंतर पाण्याच्या गढूळतेत प्रचंड वाढ होते. त्यावेळेस तुरटीची मात्रा वाढवावी लागते. या सर्व बाबींचा विचार करता, फारोळा जलशुध्दीकरण केंद्राची वार्षिक मागणी ही ९१० मे टन इतकी आहे.

सदरील कामाचे अंदाजपत्रक महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळाच्या सन २०१६-१७ च्या दरसुचीतील साहित्य पुरवठ्याच्या दरानुसार तयार केले असून अंदाजपत्रकीय र.रु.७७,३५,०००/- इतकी

आहे. सदरील कामाचा खर्च पाणी पुरवठा रसायन खरेदी या लेखाशिर्षकातून प्रस्तावीत करण्यात आला आहे.

करीता फारोळा जलशुध्दीकरण केंद्राकरीता वार्षिक तुरटी ग्रेड-१ चा पुरवठा करण्याचे अंदाजपत्रक र.रु.७७,३५,०००/- चे मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**ठरावः-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, फारोळा जलशुध्दीकरण केंद्राकरीता वार्षिक तुरटी ग्रेड-१ चा पुरवठा करण्याचे र.रु.७७,३५,०००/- च्या अंदाजपत्रकास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ५३३:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेने दिनांक १९ जुन १९९९ रोजी प्रस्ताव क्र.४३/४ सर्वसाधारण सभेच्या मान्यतेनुसार शासनाकडे वर्ग ०३ व वर्ग ०४ संवर्गातील एकूण १९१२ पदे सर्वसाधारण सभेची मंजुरी घेऊन शासनाच्या मंजुरीसाठी प्रस्ताव पाठविण्यात आला होता. शासनाने प्रकरणाची पडताळणी करुन शासन निर्णय दि.१०.११.२००३ अन्वये फक्त (दोन संगणक ऑपरेटरसह) मजुर संवर्गाकरीता ११२४ पदास मान्यता दिलेली होती. परंतु आस्थापना खर्चाचे प्रमाण मर्यादेपेक्षा जास्त होत असल्याने व उर्वरित ७८८ पदनिर्मिती प्रस्ताव दुसऱ्या टप्प्यात मान्यता प्रदान करण्यात येईल असे तत्वतः शासन स्तरावर ठरविण्यात आले होते.

शासन निर्णय १०.११.२००३ अन्वये ११२४ मंजुर झालेल्या पदावर जानेवारी-२००४ मध्ये ११२४ दैनिक वेतनावरील कर्मचाऱ्यांना कायम करण्यात आले व उर्वरित २६८ दैनिक वेतनावरील कार्यरत कर्मचाऱ्यांना कायम करण्यासाठी पद निर्मितीचा फेर प्रस्ताव दिनांक १९.०८.२००४ रोजी शासनाकडे पाठविण्यात आला. त्यानंतर शासनाकडे वेळोवेळी उर्वरित २६८ दैनिक वेतनावरील कर्मचाऱ्यांना कायमस्वरुपी मान्यतेसाठी महानगरपालिका प्रशासनाने दिनांक १८.०१.२००६, २८.०८.२००८, २८.०१.२००९, ०७.११.२००९ व ११.०१.२०१४ रोजी पाठपुरावा केला आहे. त्याचप्रमाणे दैनिक वेतनावरील कर्मचाऱ्यांनी महानगरपालिका प्रशासनास व शासनास निवेदने देऊन व विनंती अर्ज करून सेवेत कायम करण्याची विनंती अनेक वेळा केलेली आहे. परंतु अद्यापही शासनाने कायम स्वरुपी प्रस्तावास मान्यता दिलेली नसल्याने दैनिक वेतनावरील कर्मचारी हे कायम नियुक्तीपासून आज पावेतो वंचित आहे. २६८ दैनिक वेतनावरील कर्मचाऱ्यांपैकी सद्यस्थितीत २०४ कर्मचारीच कार्यरत आहेत. उर्वरित ६४ कर्मचारी हे मयत अथवा सेवानिवृत्त झालेले आहेत. मनपा सेवेत असतांना कायम स्वरुपी नियुक्ती न झाल्यामुळे सदरील कर्मचाऱ्यांना कायम सेवेचे फायदे मिळालेले नाहीत. त्यामुळे त्यांच्या कुटूंबीयांवर उपासमारीची वेळ आलेली आहे.

उर्वरित २०४ कर्मचाऱ्यांपैकी बहुतांश कर्मचाऱ्यांनी उच्चतम वयोमर्यादा पार केलेली असून त्यांनी इतर ठिकाणाची संधी गमावलेली आहे. दैनिक वेतनावरील कार्यत कर्मचाऱ्यांचे वेतन तुटपुंज्या स्वरुपाचे असल्याने त्यांना मुला-मुलींच्या शिक्षणाचे, मुलींच्या लग्नाचे, आई-वडीलांच्या औषधोपचाराच्या खर्चाचे मोठे आर्थिक संकट निर्माण झालेले आहेत.

सद्यस्थितीत महानगरपालिकेच्या आस्थापनेवर विविध संवर्गात वर्ग-०३ चे ३८५ पदे रिक्त असून वर्ग-०४ विविध संवर्गातील फक्त ३४३ पदे रिक्त आहेत व सद्यस्थितीत दैनिक वेतनावर वर्ग-३ व वर्ग-४ संवर्गातील फक्त २०४ कर्मचारी कार्यरत आहेत. रिक्त पदाच्या प्रमाणात दैनिक वेतनावरील कर्मचाऱ्यांची संख्या खुपच कमी आहे. त्यामुळे दैनिक वेतनावर कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांना शासनाच्या मंजुरी शिवाय रिक्त पदावर असलेल्या कायम स्वरुपी सामावून घेता येऊ शकते. सन-२००४ नंतर वेळोवेळी सर्वसाधारण सभेने दैनिक वेतनावरील कर्मचाऱ्यांना कायम करण्यासाठी ठराव पारित कलेले असून अनेक वेळा मनपा प्रशासनास दैनिक वेतनावरील कर्मचाऱ्यांना कायम करण्यासाठी यथायोग्य कार्यवाही

करण्याच्या सुचना देण्यात आलेल्या आहेत. परंतु दैनिक वेतनावरील कर्मचाऱ्यांना कायम नियुक्ती पासून वंचित ठेवण्यात आले.

शासनाने सोलापूर महानगरपालिकेस दिनांक २९.०६.२००१ व २०.०१.२००३ रोजी मंजुरी दिलेल्या प्रत्येकी ५७२ पदांवर दैनिक वेतना वरील कर्मचारी कायम करतांना त्यांच्या रोजंदारीवर नियुक्तीच्या दिनांकापासून कायम करण्यास मंजुरी दिलेली असून सदरील कायम स्वरुपी नियुक्ती देतांना मागील थकबाकी अनुज्ञेय राहणार नसून यापुर्वीची मनपामध्ये केलेली सेवा निवृत्ती वेतन व उपदानासाठी ग्राह्य धरण्यात यावी, असे निर्देश शासनाने सोलापूर महानगरपालिकेस दिलेले आहेत.

सन-२००४ नंतर वेळोवेळी नाशिक, मालेगाव, नागपूर येथील महानगरपालिकेत कार्यरत असलेल्या दैनिक वेतनावरील कामगारांना कायम करण्यासाठी शासनाने पदनिर्मितीस मान्यता दिलेली आहे.

तसेच औरंगाबाद महानगरपालिकेच्या आस्थापनेवर सन-२००४ नंतर दैनिक वेतनावरील कर्मचाऱ्यांना महानगरपालिकेच्या नियमित स्वरुपातील रिक्त झालेल्या पदावर कायम स्वरुपी नेमणूका देण्यात आलेल्या आहेत.

उपरोक्त बाबी विचारात घेऊन महानगरपालिकेच्या आस्थापनेवर सद्यस्थितीत दैनिक वेतनावर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना कायम करण्याचा प्रस्ताव प्रस्थापित करण्यात येत आहे.

करीता, औरंगाबाद महानगरपालिकेच्या आस्थापनेवर कार्यरत असलेल्या दैनिक वेतनावरील विविध संवर्गातील वर्ग-३ व वर्ग-४ कर्मचाऱ्यांना सोबतच्या सुचीमध्ये नमुद केल्याप्रमाणे सोलापूर महापालिकेच्या दैनिक वेतनावरील कामगारांना कायम करतांना शासनाने दिलेल्या निर्देशाच्या अधिन राहून औरंगाबाद महानगरपालिकेमध्ये दैनिक वेतनावर रुजू झाल्यापासून किंवा शासन निर्णय दिनांक १०.११.२००३ अन्वये ११२४ दैनिक वेतनावरील कामगारांना कायम करण्याच्या निर्णयाच्या दिनांकापासून निवृत्ती वेतन व उपदानाचे फायदे मिळण्यासाठी तसेच सेवा ज्येष्ठतेचा लाभ मिळण्यासाठी कायमस्वरुपी आदेश देण्याच्या तारखेपर्यंत महानगरपालिकेच्या आस्थापनेवर केलेल्या कामाच्या थकबाकीच्या फरकाची रक्कम न देता शैक्षणिक अर्हता व वयाची उच्चत्तम वयोमानाची शिथीलता देऊन त्याचप्रमाणे आकृतीबंधाच्या मंजुरीच्या अधिन राहून तसेच शासनाच्या मंजुरीच्या अधिन राहून मनपा सेवेत कायम करण्याचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.विकास रतनालाल जैन, श्री.वैद्य रेणुकादास (राजु) दत्तोपंत, श्री.कचरू छगनराव घोडके, श्री.सिताराम इसराम सुरे, श्री.राजेंद्र हिम्मतराव जंजाळ

**अनुमोदक:-**श्री.विजय साईनाथ औताडे,श्री.राजु रामराव शिंदे, श्री.अफसर खान यासिन खॉ, श्री.जागीरदार मोहम्मद अय्युब गुलाम जिलानी, श्री.गाकूळसिंग संपतसिंग मलके, श्री.भगवान (बापु) देविदास घडमोडे, श्री.गजानन रामकिसन बारवाल, श्री.कैलास लक्ष्मण गायकवाड

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिकेच्या आस्थापनेवर कार्यरत असलेल्या दैनिक वेतनावरील वर्ग-३ व वर्ग-४ संवर्गातील एकूण २०४ कर्मचाऱ्यांना आकृतीबंध मंजुरीच्या अधिन राहून आणि शासनाच्या मंजुरीच्या अधिन राहून खालीलप्रमाणे नमुद केलेल्या अटीनुसार मनपा सेवेत कायम करण्यास मान्यता देण्यात येते.

१) सोलापूर महापालिकेच्या दैनिक वेतनावरील कर्मचाऱ्यांना सेवेत कायम करतांना शासनाने दिलेल्या निर्देशाच्या अधिन राहून केवळ निवृत्ती वेतन व उपदानाचा तसेच सेवा ज्येष्ठतेचा लाभ मिळण्यासाठी औरंगाबाद महानगरपालिकेमध्ये दैनिक वेतनावरील ११२४ कामगारांना कायम करण्याचा शासन निर्णय दि.१०.११.२००३ पासून औरंगाबाद मनपातील उर्वरीत २०४ दैनिक वेतनावरील रिक्त

असलेल्या पदावर तसेच शासनाकडे मंजुरीसाठी प्रलंबीत पदांवर कर्मचाऱ्यांना सेवेत कायम करण्याचा लाभ देण्यास मंजुरी देण्यात येते.

२) २०४ कर्मचाऱ्यांना सेवेत कायम करण्याचे आदेश देण्याच्या तारखेपर्यंत महानगरपालिकेच्या आस्थापनेवर केलेल्या कामाच्या थकबाकीच्या फरकाची रक्कम अनुज्ञेय राहणार नाही.

३) शैक्षणिक अर्हता व वयाची उच्चत्तम वयोमानाची मर्यादेस शिथीलता देण्यात येते.

४) आकृतीबंध मंजुरीच्या तसेच शासनाच्या मंजुरीच्या अधिन राहून महानगरपालिका सेवेत कायम करण्यास मान्यता देण्यात येते.

५) सन-२००४ नंतर उर्वरित दैनिक वेतनावरील कर्मचाऱ्यांपैकी आजपावेतो मयत अथवा वयोमानामुळे सेवा समाप्त झालेल्या कर्मचाऱ्यांना देखील दि.१०.११.२००३ पासून सेवेत कायम करण्याचा फायदा देण्यास मंजुरी देण्यात येते.

६) प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे २०४ कर्मचाऱ्यांना सेवेत कायम करतांना आरक्षणानुसार (बिंदुनामावली) पदे भरण्याची कार्यवाही नियमाप्रमाणे करण्यात यावी. तसेच सर्व कर्मचारी कायम केल्यानंतर निर्माण होणारा आरक्षणाचा अनुशेष भविष्यात रिक्त होणाऱ्या पदांवर भरून काढण्यात यावा.

यासह सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ५३४:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहरातील महत्वांच्या ऐतिहासीक स्थळांसाठी पर्यटनाच्या दृष्टीने सोई-सुविधा उपलब्ध करून देण्याच्या अनुषंगाने औरंगाबाद पर्यटन मेगा सर्किटचा प्रस्ताव महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळातर्फे केंद्र शासनाच्या पर्यटन मंत्रालयाकडे मान्यतेस्तव सादर करण्यात आलेला होता. या प्रस्तावास दिनांक ३१.०३.२०१३ च्या केंद्रीय पर्यटन मंत्रालयाच्या आदेशानुसार मंजुरी प्राप्त आहे. सदरच्या अनुषंगाने हाती घ्यावयाच्या कामासंदर्भाने दिनांक १६.०१.२०१४ रोजी संपन्न झालेल्या मा.सर्वसाधारण सभेमध्ये प्रस्ताव क्रमांक-४५५ अन्वये ठराव मंजुर झालेला आहे.

उपरोक्त दर्शविल्यानुसार औरंगाबाद पर्यटन मेगा सर्किट अंतर्गत पर्यटन स्थळांकडे जाणाऱ्या रस्त्यांचे दुभाजक व सुशोभीकरण करणे बाबतच्या कामाचे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन २०१३-१४ च्या दरसुचीनुसार र.रु.७७,६५,६९२.०० चे अंदाजपत्रक असून सदरील कामाचा खर्च हा शासनाकडून प्राप्त निधीतून होत आहे. निविदा प्रक्रिया अंती मे.अशोक कन्स्ट्रक्शन ॲण्ड जे.व्ही. यांचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा २३.२३% कमी दराच्या निविदेस दिनांक २९.१.२०१५ रोजी संपन्न झालेल्या मा.स्थायी समिती सभेच्या ठराव क्रमांक-९४ अन्वये मंजुरी प्राप्त आहे. तथापि, कमी दराच्या निविदेमुळे र.रु.२३,४९,८३७/- एवढी बचत होणार असल्याने सदरील कामाचे र.रु.१,०१,१५,५२८/- चे सुधारित अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील कामावर होणारा निव्वळ एकूण खर्च हा मंजुर अंदाजपत्रकीय रक्कमेच्या आत होणार आहे.

करीता, सुधारित अंदाजपत्रक र.रु.१,०१,१५,५२८.०० चा प्रस्ताव (र.रु.२३,४९,८३७.०० एवढ्या वाढीव रक्कमेसह) याच कामाचे कंत्राटदार मे.अशोक कन्स्ट्रक्शन ॲण्ड जे.व्ही. यांचेकडून निविदा दराने म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा २३.२३% कमी दराने करून घेणे बाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सविनय सादर.

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद पर्यटन मेगा सर्किट अंतर्गत पर्यटन स्थळांकडे जाणाऱ्या रस्त्यांचे दुभाजक व सुशोभीकरण करणे बाबतच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रु.१,०१,१५,५२८.०० च्या सुधारित अंदाजपत्रकास मान्यता देण्यात येते. र.रु.२३,४९,८३७/-एवढया

रक्कमेचे वाढीव काम याच कामाचे कंत्राटदार मे.अशोक कन्स्ट्रक्शन ॲण्ड जे.व्ही. यांचेकडून निविदा दराने म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा २३.२३% कमी दराने करून घेण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ५३५:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्र.७२, क्रांतीचौक अंतर्गत राठी टॉवर जवळील नाल्यावर बॉक्स कल्व्हर्ट/आर.सी.सी.पुल बांधणेच्या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाचे सन २०१५-१६ च्या दरसुचीनुसार र.रु.३०,६१,९३१/- चे तयार करण्यात आले होते. सदर अंदाजपत्रकास प्राप्त तांत्रिक व प्रशासकीय मान्यतेअंती सदरील कामाचा कार्यादेश कंत्राटदार मे.एस.एम.कन्स्ट्रक्शन कंपनी यांना १०.००% जास्त दराने देण्यात आलेला आहे.

संबंधीत कंत्राटदारास सदर कामाचे कार्यादेश देऊन कामास सुरुवात केली असता, बॉक्स कल्व्हर्टसाठी खोदकाम करत असतांना या ठिकाणी भुमिगत गटार योजनेची मेन सिव्हर लाईन, पाणी पुरवठा लाईन, बी.एस.एन.एल., रिलायन्स, टाटा इत्यादी दुरसंचार कंपनीचे ओ.एफ.सी.केबल खोदकामात अडथळा निर्माण करीत होते. तसेच सदर बॉक्स कल्व्हर्ट साठीच्या खोदकामात भुमिगत गटार योजनेची मेन सिव्हर लाईन बॉक्स कल्व्हर्टच्या रॉफ्ट फाऊंडेशन मधून जात असल्यामुळे या तांत्रिक दृष्ट्या बॉक्स कल्व्हर्ट बांधणे शक्य नसल्याने या ठिकाणी बॉक्स कल्व्हर्ट ऐवजी आर.सी.सी (Open Foundation) बांधणे आवश्यक होते. त्या करीता आर.सी.सी.पुलाचे बांधकामासाठी तज्ञ, वास्तुविशारदामार्फत प्रत्यक्ष जागेची स्थळ पाहणी करून पुलाचे आर.सी.सी.डिझाईन प्राप्त करून (Open Foundation) चे बांधकाम करावे लागणार असल्यामुळे व आर.सी.सी.पुल Skew मध्ये असल्याने व पुलाचा स्पॅन वाढल्याने मुळ मंजुर रक्कमेत वाढ होत असल्याने मुळ अंदाजपत्रकातील बाबींसाठी र.रु.६९,५८,५५९/- आणि अतिरिक्त बाबींसाठी र.रु.६,४६,४४५/- या नुसार सुधारित अंदाजपत्रकीय र.रु.७६,०५,००४/- आणि र.रु.६,९५,८५६/- (मुळ अंदाजपत्रकातील बाबींसाठी निविदा मंजुर दर १०% Above) असे एकूण र.रु.८३,००,८६०/- इतका खर्च अपेक्षित असून त्यास तांत्रिक व प्रशासकीय मान्यता देऊन मा.सर्वसाधारण सभेची मान्यता घेणेसाठी शिफारस करण्यात आलेली आहे.

करीता, मुळ मंजुर अंदाजपत्रकातील बाबींचे काम मंजुर निविदा दर १०.००% जास्त दराने आणि अतिरिक्त बाबींचे काम अंदाजपत्रकीय दराने सदर कामाचे मुळ कंत्राटदार मे.एस.एम.कन्स्ट्रक्शन कंपनी यांच्याकडून करून घेणेच्या मान्यतेसह उपरोक्त प्रमाणे सदरील कामाचे अतिरीक्त बाबींसह सुधारित अंदाजपत्रक र.रु.८३,००,८६०/- च्या मंजुरीचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र.७२, क्रांतीचौक अंतर्गत राठी टॉवर जवळील नाल्यावर बॉक्स कल्व्हर्ट/आर.सी.सी.पुल बांधणेच्या कामासाठी खोदकाम करत असतांना या ठिकाणी भुमिगत गटार योजनेची मेन सिव्हर लाईन, पाणी पुरवठा लाईन, बी.एस.एन.एल., रिलायन्स, टाटा इ. दुरसंचार कंपनीचे ओ.एफ.सी.केबल खोदकामात अडथळा निर्माण तसेच प्रस्तावात नमुद कारणांमुळे मुळ कामामध्ये अतिरिक्त बाबींची वाढ झाल्याने मुळ अंदाजपत्रकातील बाबींसाठी र.रु.६९,५८,५५९/- आणि अतिरिक्त बाबींसाठी र.रु.६,४६,४४५/- वाढ होत असल्याने र.रु.७६,०५,००४/- आणि र.रु.६,९५,८५६/- (मुळ अंदाजपत्रकातील बाबींसाठी निविदा मंजुर दर १०% Above) असे एकूण र.रु.८३,००,८६०/- च्या सुधारित अंदाजपत्रकास मान्यता देण्यात येते. तसेच अंदाजपत्रकातील बाबींचे काम मंजुर निविदा दर १०.००% जास्त दराने आणि अतिरिक्त बाबींचे काम अंदाजपत्रकीय दराने सदर कामाचे मुळ कंत्राटदार

मे.एस.एम.कन्स्ट्रक्शन कंपनी यांचे कडून करून घेणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ५३६ :-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.१०७ अंतर्गत सुशांत पार्क व पटवर्धन हॉस्टेल येथील रस्त्यांचे कॉंक्रीटींग करणेच्या कामाचे अंदाजपत्रक राज्य दरसुची (SSR) विभागाच्या सन २०१७-२०१८ च्या दरसुचीनुसार रक्कम रु.१,०७,२३,४००/- चे तयार करण्यात आलेले आहे. प्रस्तावित कामाचा खर्च मा.सर्वसाधारण सभेने सुचविलेली अत्यावश्यक कामे या लेखाशिर्ष मधुन करण्यात येणार असुन सदर अंदाजपत्रकास तांत्रिक व प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे.

करीता, प्रस्तावित कामाच्या रक्कम रु.१,०७,२३,४००/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.१०७ अंतर्गत असलेल्या सुशांत पार्क व पटवर्धन हॉस्टेल येथील रस्त्यांचे कॉंक्रीटींग करणेच्या कामाचे र.रु.१,०७,२३,४००/- च्या अंदाजपत्रकास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ५३७ :-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महानगरपालिका कार्यक्षेत्रातील कमल नयन बजाज हॉस्पीटल जवळील मुख्य रस्त्याचे मजबुतीकरण व क्रॉंकीटींग करणेच्या कामाचे अंदाजपत्रक राज्य दरसुची (SSR) विभागाच्या सन २०१७-२०१८ च्या दरसुचीनुसार रक्कम रु.१,२९,५४,१६९/- चे तयार करण्यात आलेले आहे. प्रस्तावित कामाचा खर्च मा.सर्वसाधारण सभेच्या सुचविलेली अत्यावश्यक कामे या लेखाशिर्ष मधुन करण्यात येणार असुन सदर अंदाजपत्रकास तांत्रिक व प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे.

करीता प्रस्तावित कामाच्या रक्कम रु.१,२९,५४,१६९/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिका कार्यक्षेत्रातील कमल नयन बजाज हॉस्पीटल जवळील मुख्य रस्त्याचे मजबुतीकरण व क्रॉंकीटींग करणेचे काम मा.सर्वसाधारण सभेने सुचविलेली अत्यावश्यक कामे या लेखाशिर्ष मधुन करण्याच्या र.रु.१,२९,५४,१६९/- च्या अंदाजपत्रकास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ५३८ :-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र. १०७ अंतर्गत आर.के.डेक्सींग कॉलनी व गिरजाशंकर कॉलनी येथील रस्त्यांचे कॉक्रीटींग करणेच्या कामाचे अंदाजपत्रक राज्य दरसुची (SSR) विभागाच्या सन २०१७-२०१८ च्या दरसुचीनुसार रक्कम रु.१,१८,७९,९०४/- चे तयार करण्यात आलेले आहे. प्रस्तावित कामाचा खर्च मा. सर्वसाधारण सभेने सुचविलेली अत्यावश्यक कामे या लेखाशिर्ष मधुन करण्यात येणार असुन सदर अंदाजपत्रक तांत्रिक व प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे.

करीता प्रस्तावित कामाच्या रक्कम रु.१,१८,७९,९०४/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.१०७ अंतर्गत असलेल्या आर.के.डेक्सींग कॉलनी व गिरजाशंकर कॉलनी येथील रस्त्यांचे कॉक्रीटींग करण्याच्या कामाचे र.रु.१,१८,७९,९०४/- च्या अंदाजपत्रकास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ५३९ :-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.१०७ अंतर्गत हमिदीया गार्डन व सहारा कॉलनी येथील रस्त्याचे कॉंक्रीटींग करणेच्या कामाचे अंदाजपत्रक राज्य दरसुची (SSR) विभागाच्या सन २०१७-२०१८ च्या दरसुचीनुसार रक्कम रु.१,९६,३६,००३/- चे तयार करण्यात आलेले आहे. प्रस्तावित कामाचा खर्च मा.सर्वसाधारण सभेने सुचविलेली अत्यावश्यक कामे या लेखाशिर्ष मधुन करण्यात येणार असुन सदर अंदाजपत्रकास तांत्रिक व प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे.

करीता प्रस्तावित कामाच्या रक्कम रु.१,९६,३६,००३/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.१०७ अंतर्गत असलेल्या हमिदीया गार्डन व सहारा कॉलनी येथील रस्त्याचे कॉक्रीटींग करण्याच्या कामाचे र.रु.१,९६,३६,००३/- च्या अंदाजपत्रकास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ५४० :-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.१०३ अंतर्गत रचनाकार कॉलनी रस्त्याचे कॉंक्रीटींग करणेच्या कामाचे अंदाजपत्रक राज्य दरसुची (SSR) सन २०१७-२०१८ नुसार रक्कम रु.५४,९८,०१२/- चे तयार करण्यात आलेले आहे. प्रस्तावित कामाकरीता अर्थसंकल्प सन २०१७-२०१८ या वित्तीय वर्षाच्या अर्थसंकल्पात भांडवली खर्च-अ -अंदाजपत्रक मा.महापौर यांनी सुचविलेली अत्यावश्यक कामे या लेखाशिर्ष अंतर्गत मा. महापौर यांचे पत्र-जा.क्र./मनपा/महापौर/४७८/२०१८, दिनांक २१/०२/२०१८ नुसार तरतुद उपलब्ध आहे. सदर अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्राप्त असुन मा.सर्वसाधारण सभे समोर प्रस्ताव मान्यतेस्तव सादर करणेबाबत शिफारस आहे.

करीता प्रस्तावित कामाच्या रक्कम रु.५४,९८,०१२/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.१०३ अंतर्गत असलेल्या रचनाकार कॉलनी रस्त्याचे कॉंक्रीटींग करणेच्या कामाचे र.रु.५४,९८,०१२/- च्या अंदाजपत्रकास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ५४१:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.१०३ अंतर्गत गोल्डी सिनेमा पाठीमागील रस्त्याचे कॉंक्रीटींग करणेच्या कामाचे अंदाजपत्रक राज्य दरसुची (SSR) सन २०१७-२०१८ नुसार रक्कम रु.५२,९८,१९७/- चे तयार करण्यात आलेले आहे. प्रस्तावित कामाकरीता अर्थसंकल्प सन २०१७-२०१८ या वित्तीय वर्षाच्या अर्थसंकल्पात भांडवली खर्च-अ-अंदाजपत्रक मा.महापौर यांनी सुचविलेली अत्यावश्यक कामे या लेखाशिर्ष अंतर्गत मा. महापौर यांचे पत्र-जा.क्र./मनपा/महापौर/४७७/२०१८, दि.२१/०२/२०१८ नुसार तरतुद उपलब्ध आहे. सदर अंदाजपत्रक प्रशासकीय मान्यता प्राप्त असुन मा. सर्वसाधारण सभे समोर प्रस्ताव मान्यतेस्तव सादर करणेबाबत शिफारस आहे.

करीता प्रस्तावित कामाच्या रक्कम रु.५२,९८,१९७/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.१०३ अंतर्गत असलेल्या गोल्डी सिनेमा पाठीमागील रस्त्याचे कॉंक्रीटींग करणेच्या कामाचे र.रु. ५२,९८,१९७/- च्या अंदाजपत्रकास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ५४२ :-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र. ०७ मयुरपार्क अंतर्गत जाधववाडी सिग्नल ते मनोज दारक यांच्या घरापर्यंत सिमेंट कॉंक्रीट रस्ता तयार करणे. या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. १,१३,९२,८००/- च्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे. सदरील कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या जिल्हा दरसुची सन-२०१७-१८ नुसार तयार करण्यात आलेले आहे. या कामाचा खर्च प्रस्तावित २०१७-१८ च्या सुधारित अर्थसंकल्पात मा. महापौर यांनी सुचविलेली अत्यावश्यक कामे या अंतर्गत करण्यात येणार आहे.

तरी सदरील कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रु.१,१३,९२,८००/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र. ०७ मयुरपार्क अंतर्गत असलेल्या जाधववाडी सिग्नल ते मनोज दारक यांच्या घरापर्यंत सिमेंट कॉंक्रीट रस्ता तयार करणेच्या कामाचे र.रु.१,१३,९२,८००/- च्या अंदाजपत्रकास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ५४३ :-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.०७ मयुरपार्क अंतर्गत वडाच्या झाडापासुन ते चुना भट्टी पर्यंत रस्त्याचे कॉंक्रीटींग करणे. या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रु.७९,७६,३००/- च्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे. सदरील कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या जिल्हा दरसुची २०१७-१८ नुसार तयार करण्यात आलेले आहे. या कामाचा खर्च प्रस्तावित २०१७-१८ च्या सुधारित अर्थसंकल्पात मा. महापौर यांनी सुचविलेली अत्यावश्यक कामे या लेखाशिर्ष अंतर्गत करण्यात येणार आहे.

तरी सदरील कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रु.७९,७६,३००/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.०७ मयुरपार्क अंतर्गत असलेल्या वडाच्या झाडापासुन ते चुनाभट्टी पर्यंत रस्त्याचे कॉंक्रीटींग करणेच्या कामाच्या र.रु.७९,७६,३००/- च्या अंदाजपत्रकास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ५४४:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.०७, मयुरपार्क अंतर्गत पिसादेवी रोड ते श्रीमती यशोदा निकम यांच्या प्लॉट पर्यंतच्या रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे, या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रु.२,१४,९०,०००/- च्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे. सदरील कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या जिल्हा दरसुची सन २०१७-१८ नुसार तयार

करण्यात आलेले आहे. या कामाचा खर्च प्रस्तावित सन २०१७-१८ च्या सुधारित अर्थसंकल्पात मा.महापौर यांनी सुचविलेली अत्यावश्यक कामे या लेखाशिर्ष अंतर्गत करण्यात येणार आहे.

तरी, सदरील कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रु.२,१४,९०,०००/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.०७, मयुरपार्क अंतर्गत असलेल्या पिसादेवी रोड ते श्रीमती यशोदा निकम यांच्या प्लॉट पर्यंतच्या रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करण्याच्या कामाचे र.रु.२,१४,९०,०००/- च्या अंदाजपत्रकास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ५४५:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.०७, मयुरपार्क अंतर्गत वडाच्या झाडापासून ते श्री.प्रकाश चव्हाण यांच्या घरापर्यंत रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे,या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रु.२,५०,७५,३५०/- च्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे. सदरील कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या जिल्हा दरसुची सन २०१७-१८ नुसार तयार करण्यात आलेले आहे. या कामाचा खर्च प्रस्तावित सन २०१७-१८ च्या सुधारित अर्थसंकल्पात मा.महापौर यांनी सुचविलेली अत्यावश्यक कामे या अंतर्गत करण्यात येणार आहे.

तरी, सदरील कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रु.२,५०,७५,३५०/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.०७, मयुरपार्क अंतर्गत असलेल्या वडाच्या झाडापासून ते श्री.प्रकाश चव्हाण यांच्या घरापर्यंत रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करण्याच्या कामाचे र.रु.२,५०,७५,३५०/- च्या अंदाजपत्रकास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ५४६:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.०८, सुरेवाडी येथील विविध ठिकाणी कॉंक्रीट रस्ते तयार करणेच्या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन २०१५-२०१६ च्या दरसुची नुसार रक्कम रु.९९,९७,०००/- चे तयार करण्यात आले आहे. सदरील काम मनपा अर्थसंकल्प सन २०१७-२०१८ मधील लेखाशिर्ष मा.महापौर यांनी सुचविलेली अत्यावश्यक कामे या लेखाशिर्षा मधून प्रस्तावीत आहे. सदरील कामास मान्यता देण्यात आलेली आहे.

करीता, अंदाजपत्रक रक्कम रु.९९,९७,०००/- चा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.०८, सुरेवाडी येथील विविध ठिकाणी कॉंक्रीट रस्ते तयार करण्याच्या कामाचे र.रु.९९,९७,०००/- च्या अंदाजपत्रकास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ५४७:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.०९ मधील झोन क्र.०४ समोरील मुख्य रस्ता सौभाग्य चौक ते भाजीमंडी पर्यंत ट्रिमिक्स कॉंक्रिटीकरण करणे बाबत, या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रु.५९,९९,१००/- च्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे. सदरील कामाचे

अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या जिल्हा दरसुची सन २०१५-२०१६ नुसार तयार करण्यात आलेले आहे. या कामाचा खर्च प्रस्तावित सन २०१७-१८ च्या अर्थसंकल्पात भांडवली खर्च-अ-अंदाजपत्रक मा.महापौर यांनी सुचविलेली अत्यावश्यक कामे या अंतर्गत करण्यात येणार आहे.

तरी, सदरील कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रु.५९,९९,१००/- चे अंदाजपत्रक मंजुरीच्या प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.०९ मधील झोन क्र.०४ समोरील मुख्य रस्ता सौभाग्य चौक ते भाजीमंडी पर्यंत ट्रिमिक्स काँक्रिटीकरण करण्याच्या कामाचे र.रु.५९,९९,१००/- च्या अंदाजपत्रकास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ५४८:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.१३ अंतर्गत पेठेनगर, भावसिंगपुरा येथील गट क्र.३२/४ भावसिंगपुरा येथील जागेस संरक्षित भिंत बांधणे. या कामासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन २०१५-२०१६ च्या दरसुचीनुसार रक्कम रु.६७,१३,२४८/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदर कामास मा.आयुक्त महोदय यांची प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे.

सदरील कामाचा खर्च मा.महापौर यांनी सुचविलेली अत्यावश्यक कामे या लेखाशिर्ष अंतर्गत उपलब्ध तरतुदीमधून करण्यात येणार आहे.

तरी, या कामाकरीता तयार करण्यात आलेले रक्कम रु.६७,१३,२४८/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.१३ अंतर्गत असलेल्या पेठेनगर, भावसिंगपुरा येथील गट क्र.३२/४ भावसिंगपुरा येथील जागेस संरक्षित भिंत बांधण्याच्या कामाचे र.रु.६७,१३,२४८/- च्या अंदाजपत्रकास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ५४९:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.६५, राज हाईट्स ते चिश्तिया चौक या रस्त्याचे डांबरीकरण करणे या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दरसुची सन २०१५-२०१६ नुसार रक्कम रुपये ९९,९८,३००/- चे तयार करण्यात आले आहे. सदर अंदाजपत्रकास आर्थिक तरतुद उपलब्ध होण्याच्या अधीन राहुन दि.१३.०३.२०१८ अन्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे.

प्रस्तावित कामाचा समावेश सन २०१८-२०१९ च्या अर्थसंकल्पात स्पिल ओव्हर मध्ये करण्यात येत आहे. करीता, सदरील कामाचे अंदाजपत्रक रक्कम रुपये ९९,९८,३००/- मंजुरीबाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.६५, राज हाईट्स ते चिश्तिया चौक या रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामाचे र.रु.९९,९८,३००/- च्या अंदाजपत्रकास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ५५०:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिका हद्दीमध्ये नव्याने समाविष्ट झालेल्या सातारा-देवळाई या भागांचा शहरातील इतर भागांप्रमाणे सर्वकष विकास होण्याच्या दृष्टीने तसेच येथील नागरीकांना मुलभूत नागरी सुविधा उपलब्ध करून देणे आवश्यक असल्याने

मा.सर्वसाधारण सभा विषय क्र.१२९९ दि.१९.०९.२०१७ च्या मंजुर ठरावानुसार सातारा-देवळाई येथील रस्त्यांच्या कामांसाठी डिफर्ड पेमेंट तत्वावर रु.२५ कोटी रक्कमेची निविदा काढणेस मंजुरी प्राप्त झालेली आहे. त्यानुसार वॉर्ड क्र.११४ व ११५ सातारा-देवळाई परिसरातील विविध रस्त्यांच्या कामाचे अंदाजपत्रके खालीलप्रमाणे तयार करण्यात आलेली असून यास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

| **अ.क्र.** | **कामाचे नाव** | **अंदाजपत्रकाची रक्कम रुपये.** |
|---|---|---|
| १. | वॉर्ड क्र.११४ देवळाई भागात अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करणे | १२,६३,३९,७७२/- |
| २. | वॉर्ड क्र.११४ अय्यप्पा मंदीर मुख्य रस्ता ते देवळाई गावापर्यंतच्या रस्त्याचे डांबरीकरण करणे. | १,९७,२२,८३९/- |
| ३. | वॉर्ड क्र.११५ मधील आमदार रोडचे डांबरीकरण करणे. | १,०१,०८,१०१/- |
| ४. | वॉर्ड क्र.११५ मध्ये सातारा भागातील अंतर्गत रस्त्यांचे डांबरीकरण करणे. | ९,३०,३४,८८६/- |
| **एकुण** | | **२४,९२,०५,५९८/-** |

उपरोक्त नमुद कामांची एकत्रित अंदाजपत्रकीय र.रु.२४,९२,०५,५९८/- असुन सदरील कामे डिफर्ड पेमेंट तत्वावर करण्याचे प्रस्तावीत आहे. तरी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेस्तव विचारार्थ सादर.

कु.सायली जमादार :दोन्ही वॉर्डासाठी समान निधी मिळावा. आमदार रोडचे डांबरीकरण करण्याऐवजी कॉंक्रीटीकरण करण्यात यावे.

मा.महापौर :प्रस्तावात दर्शविलेल्या कामाच्या अंदाजपत्रकीय रक्कमेमध्ये झालेल्या बदलास आणि प्रस्तावित क्र.३ च्या कामामध्ये आमदार रोडचे डांबरीकरण करण्याऐवजी कॉंक्रिटीकरण करण्यास तसेच या कामासाठी लागणारा वाढीव निधी देण्याच्या दुरूस्तीसह प्रस्ताव मंजुर.

**<u>ठरावः-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.११४ व ११५ सातारा-देवळाई परिसरातील खाली दर्शविल्याप्रमाणे विविध रस्त्यांची डिफर्ड पेमेंट तत्वावर करावयाच्या कामाच्या एकत्रित र.रु.२४,९९,००,०००/- च्या सुधारीत अंदाजपत्रकीय रक्कमेस तसेच क्र.३ वर नमुद केल्यानुसार आमदार रोडचे डांबरीकरण करण्याऐवजी कॉंक्रीटीकरण करणे तसेच या कामांसाठी लागणारा वाढीव निधी देण्याच्या दुरूस्तीसह प्रस्तावास मंजुरी देण्यात येते.

| **अ.क्र.** | **कामाचे नाव** | **अंदाजपत्रकाची रक्कम रुपये.** |
|---|---|---|
| १. | वॉर्ड क्र.११४ देवळाई भागात अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करणे | ८,३०,७७,१६१/- |
| २. | वॉर्ड क्र.११४ अय्यप्पा मंदीर मुख्य रस्ता ते देवळाई गावापर्यंतच्या रस्त्याचे डांबरीकरण करणे. | १,९७,२२,८३९/- |
| ३. | वॉर्ड क्र.११५ मधील आमदार रोडचे डांबरीकरण करण्याऐवजी कॉंक्रीटीकरण करणे. | ३,१५,००,०००/- |
| ४. | वॉर्ड क्र.११५ मध्ये सातारा भागातील अंतर्गत रस्त्यांचे डांबरीकरण करणे. | ११,५६,००,०००/- |
| | **एकुण** | **२४,९९,००,०००/-** |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ५५२ :-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या विविध विभागासाठी तांत्रिक कुशल कर्मचारी, संगणक चालक, वाहन चालक, सुरक्षा रक्षक, खाजगी मजुरांची आवश्यकता असल्यामुळे व महानगरपालिकेकडे पुरेसे मनुष्यबळ नसल्यामुळे ई-निविदा द्वारे निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्या निविदांमध्ये निविदा समितीने तीन एजन्सीला खालीलप्रमाणे कामे देण्यात आली होती.

१. गॅलक्सी मल्टिसर्व्हिसेस - संगणक चालक
२. महाराणा एजन्सी ॲण्ड सेक्युरिटी सप्लायर्स - तांत्रिक कुशल कर्मचारी, वाहनचालक, सुरक्षा रक्षक
३. जय बजरंग सर्व्हिसेस - खाजगी मजुर.

सदरील एजन्सीची कर्मचारी पुरवठा करण्याची मुदत दिनांक ३०.०६.२०१८ रोजी संपली आहे. निविदा प्रक्रिया सुरू करण्यात आली असून महानगरपालिकेची कामे व निकड लक्षात घेता व महानगरपालिकेकडे मनुष्यबळ नसल्यामुळे, महानगरपालिकेची प्रशासकीय कामे सुरळीत व सोईस्कर चालण्यासाठी संबंधीत तीनही एजन्सीला मागील मंजुर दरानुसार दिनांक ०१.०७.२०१८ पासून पुढील निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत मागील व पुढील येणाऱ्या खर्चासहीत मुदतवाढ देण्याचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिकेच्या विविध विभागासाठी पुरेसे मनुष्यबळ नसल्यामुळे तांत्रिक कुशल कर्मचारी, संगणक चालक, वाहन चालक, सुरक्षा रक्षक, खाजगी मजूर इ. पदासाठी आवश्यकतेनुसार मनुष्यबळ पुरविण्याचे काम करणाऱ्या एजन्सीची मुदत दिनांक ३०.०६.२०१८ रोजी संपली आहे तथापि महानगरपालिकेची प्रशासकीय कामे सुरळीत व सोईस्कर चालण्यासाठी १)गॅलक्सी मल्टिसर्व्हिसेस एजन्सी २)महाराणा एजन्सी ॲण्ड सेक्युरिटी सप्लायर्स ३)जय बजरंग सर्व्हिसेस या तीनही एजन्सीला मनुष्यबळ पुरविण्यासाठी मागील मंजुर दरानुसार दि.०१.०७.२०१८ पासून पुढील निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत मागील व पुढील येणाऱ्या खर्चासहीत मुदतवाढ देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ५५३:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.१६, भिमनगर, भावसिंगपुरा (दक्षिण) येथील सन २०१८-२०१९ मधील अर्थसंकल्पात मंजुर असलेल्या कामाचे लेखाशिर्ष खालील प्रमाणे बदलण्यात यावे.

करीता, प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

| अ क्र | मनपा अर्थसंकल्पामध्ये कामाचे नाव | अ.प.र.रु. | लेखाशिर्ष बदलल्यानंतर नवीन करावयाच्या कामाचे नाव | अ.प.र.रु. |
|---|---|---|---|---|
| १ | मिठालाल नगर येथील सर्वे नं.१/१ मधील मंजुर रेखांकनातील खुल्या जागेवर संरक्षित भिंत बांधणे व इतर विकास कामे करणे. झोन क्र.०१, स्पील पेज नं.२९, अ.क्र.११ | १५,००,०००/- | मिठालाल नगर येथे रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. | १५,००,०००/- |
| २ | भिमनगर, भावसिंगपुरा येथील स्मशान भुमी विकसीत करणे. | १०,००,०००/- | प्रभात नगर येथे रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. | १०,००,०००/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | एस.सी.आर., झोन क्र.०१, पेज क्र.०३, अ.क्र.०२ | | | |

**सुचक:-**श्रीमती मनिषा विनोद लोखंडे **अनुमोदक:-**श्री.बन्सी ग्यानु जाधव
मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.१६, भिमनगर, भावसिंगपुरा (दक्षिण) येथील खालील कामांचे लेखाशिर्ष बदलण्यास मंजुरी देण्यात येते.

| अ क्र | मनपा अर्थसंकल्पामध्ये कामाचे नाव | अ.प.र.रु. | लेखाशिर्ष बदलल्यानंतर नवीन करावयाच्या कामाचे नाव | अ.प.र.रु. |
|---|---|---|---|---|
| १ | मिठालाल नगर येथील सर्वे नं.१/१ मधील मंजुर रेखांकनातील खुल्या जागेवर संरक्षित भिंत बांधणे व इतर विकास कामे करणे. झोन क्र.०१, स्पील पेज नं.२९, अ.क्र.११ | १५,००,०००/- | मिठालाल नगर येथे रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. | १५,००,०००/- |
| २ | भिमनगर, भावसिंगपुरा येथील स्मशान भुमी विकसीत करणे.एस.सी.आर., झोन क्र.०१, पेज क्र.०३, अ.क्र.०२ | १०,००,०००/- | प्रभात नगर येथे रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. | १०,००,०००/- |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ५५४:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, अण्णाभाऊ साठे सर्वपक्षीय महासंघाच्या वतीने अशी विनंती करण्यात आलेली आहे की, हे वर्ष फुले, शाहु, आंबेडकर यांच्या जन्मशताब्दीचे औचित्य साधुन अण्णाभाऊ साठे ०१ ऑगस्ट-२०१८ रोजी त्यांची जयंती असून त्यांच्या कुटूंबातील त्यांच्या सुनबाई श्रीमती सावित्रीबाई मधुकर साठे यांना महानगरपालिका प्रशासनाकडून आर्थिक मदत रक्कम रुपये ०५ लक्षाची आर्थिक तरतुद करण्यात यावी.

करीता, प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्री.मोहन धन्नुलाल मेघावाले **अनुमोदक:-**श्री.पवार आत्माराम माणिकराव
मा.महापौर :प्रस्ताव मंजुर. नियमानुसार कार्यवाही करावी.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, अण्णाभाऊ साठे सर्वपक्षीय महासंघाच्या वतीने सादर केलेल्या विनंती नुसार हे वर्ष फुले, शाहु, आंबेडकर यांच्या जन्मशताब्दीचे औचित्य साधून त्यांच्या सुनबाई श्रीमती सावित्रीबाई मधुकर साठे यांना महानगरपालिकेकडून रक्कम रुपये ०५ लक्ष आर्थिक मदत देण्याकरीता नियमानुसार कार्यवाही करावी. त्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ५५५:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.२५, गणेश कॉलनी मध्ये आलमगीर कॉलनी या वसाहतीत औरंगाबाद महानगरपालिकेची शाळा आहे. या शाळेस माजी नगरसेवक अब्दुल जावेद रज्जाक यांचे नाव देण्यात आले.

करीता, "औरंगाबाद महानगरपालिका, अब्दुल जावेद रज्जाक प्राथमिक शाळा, आलमगीर कॉलनी, गणेश कॉलनी, औरंगाबाद" असे नाव देण्याबाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्री.सिद्दीकी नासेर तकीउद्दीन **अनुमोदक:-**श्री.एडके विकास प्रकाश

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.२५, गणेश कॉलनी मधील औरंगाबाद महानगरपालिकेच्या शाळेस “औरंगाबाद महानगरपालिका, अब्दुल जावेद रज्जाक प्राथमिक शाळा, आलमगीर कॉलनी, गणेश कॉलनी, औरंगाबाद” असे नाव देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ५५६:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, क्रिडा क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल महाराष्ट्र शासनाच्या वतीने शिवछत्रपती राज्य क्रिडा पुरस्कार देवून गौरविले जाते. क्रिडा क्षेत्रातील महाराष्ट्रातील हा सर्वोच्च बहुमान आहे. हा पुरस्कार प्राप्त करण्यासाठी खेळाडु अनेक वर्षे मैदानावर सातत्याने सराव करतात. ते त्यांच्या वैयक्तिक अभ्यासाकडे व भविष्याकडे देखील दुर्लक्ष करून महाराष्ट्र व देशाचा गौरव वाढविणेसाठी प्रयत्न करीत असतात. अशा नामांकीत खेळाडुंची दखल घेऊन सांगली व पुणे महानगरपालिकेने शिवछत्रपती पुरस्कार विजेत्या खेळाडूंना त्यांच्या शैक्षणिक पात्रतेनुसार वर्ग-ब, क, व ड मध्ये थेट नोकरी दिलेली आहे. याबाबत शासन निर्णयामध्ये स्पष्ट तरतुद आहे. याचप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिकेतही अशाचप्रकारे शहरातील प्रतिभावंत, नावलौकिक, मिळविलेल्या शिवछत्रपती पुरस्कार विजेत्या खेळाडूंना त्यांच्या शैक्षणिक पात्रतेनुसार थेट नोकरी द्यावी अशी मागणी महाराष्ट्र फेन्सींग असोसीएशनने केलेली आहे.

करीता, उपरोक्त प्रमाणे प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्री.वैद्य रेणुकादास (राजु) दत्तोपंत **अनुमोदक:-**श्री.विकास रतनलाल जैन

मा.महापौर :नियमाप्रमाणे कार्यवाही करावी. प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, क्रिडा क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल महाराष्ट्र शासनाच्या वतीने शिवछत्रपती राज्य क्रिडा पुरस्कार प्राप्त नामांकीत खेळाडुंची दखल घेऊन सांगली व पुणे महानगरपालिकेने शिवछत्रपती पुरस्कार विजेत्या खेळाडूंना त्यांच्या शैक्षणिक पात्रतेनुसार वर्ग-ब, क, व ड मध्ये थेट नोकरी दिली आहे त्याच धर्तीवर, औरंगाबाद शहरातील प्रतिभावंत, नावलौकिक मिळविलेल्या शिवछत्रपती पुरस्कार विजेत्या खेळाडूंना त्यांच्या शैक्षणिक पात्रतेनुसार थेट नोकरी देण्यासंबंधी महाराष्ट्र फेन्सींग असोसीएशनने मागणी केल्यानुसार, शासन निर्णयातील तरतुदी तपासून महापालिकेत थेट नोकरी देण्याबाबत नियमाप्रमाणे कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ५५७:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.०७, मयुरपार्क अंतर्गत असलेल्या वडाच्या झाडापासुन ते श्री.सुरे यांच्या गिरणी पर्यंतच्या रस्त्याचे काँक्रीटीकरण करणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रु.२,५४,७५,५००/- च्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे. सदरील कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या जिल्हा दरसूची सन २०१७-२०१८ नुसार तयार करण्यात आलेले आहे. या कामाचा खर्च प्रस्तावित सन २०१७-२०१८ च्या सुधारीत अर्थसंकल्पात मा.महापौर यांनी सुचविलेली अत्यावश्यक कामे या लेखाशिर्ष अंतर्गत करण्यात येणार आहे.

तरी, सदरील कामाकरीता तयार करण्यात आलेला रक्कम रु.२,५४,७५,५००/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.०७, मयुरपार्क अंतर्गत असलेल्या वडाच्या झाडापासुन ते श्री.सुरे यांच्या गिरणी पर्यंतच्या रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करण्याच्या कामाचे र.रु. २,५४,७५,५००/- च्या अंदाजपत्रकास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ५५८:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.०७, मयुरपार्क अंतर्गत असलेल्या साई हॉस्पीटल ते साई लॉन्सपर्यंत सिमेंट कॉंक्रीट रस्ता तयार करणे, या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रु.३,२७,९४,९५०/- च्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे. सदरील कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या जिल्हा दरसूची सन २०१७-२०१८ नुसार तयार करण्यात आलेले आहे. या कामाचा खर्च प्रस्तावित सन २०१७-२०१८ च्या सुधारीत अर्थसंकल्पात मा.महापौर यांनी सुचविलेली अत्यावश्यक कामे या लेखाशिर्ष अंतर्गत करण्यात येणार आहे.

तरी, सदरील कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रु.३,२७,९४,९५०/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.०७, मयुरपार्क अंतर्गत साई हॉस्पीटल ते साई लॉन्सपर्यंत सिमेंट कॉंक्रीट रस्ता तयार करण्याच्या कामाचे र.रु.३,२७,९४,९५०/- च्या अंदाजपत्रकास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ५५९ :-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.०७ मयुरपार्क अंतर्गत बारव ते मयुरपार्क बी-१ बिल्डींग पर्यंत रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे. या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रु.२,९९,६८,५५०/- च्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे. सदरील कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या जिल्हा दरसुची सन-२०१७-१८ नुसार तयार करण्यात आलेले आहे. या कामाचा खर्च प्रस्तावित २०१७-१८ च्या सुधारित अर्थसंकल्पात मा. महापौर यांनी सुचविलेली अत्यावश्यक कामे या लेखाशिर्ष अंतर्गत करण्यात येणार आहे.

तरी सदरील कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रु.२,९९,६८,५५०/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.०७ मयुरपार्क अंतर्गत असलेल्या बारव ते मयुरपार्क बी-१ बिल्डींग पर्यंत रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करण्याच्या कामाचे र.रु.२,९९,६८,५५०/- च्या अंदाजपत्रकास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ५६० :-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.०७ मयुरपार्क अंतर्गत हर्सुल टी-पॉईट ते विश्वकर्मा सेल्स् कॉर्पोरेशन पर्यंत सिमेंट कॉंक्रीट रस्ता तयार करणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रु.१,२४,८१,९००/- च्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे. सदरील कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या जिल्हा दरसुची सन-२०१७-१८ नुसार तयार करण्यात आलेले आहे. या कामाचा खर्च प्रस्तावित २०१७-१८ च्या सुधारित अर्थसंकल्पात मा. महापौर यांनी सुचविलेली अत्यावश्यक कामे या लेखाशिर्ष अंतर्गत करण्यात येणार आहे.

तरी सदरील कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रु.१,२४,८१,९००/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.०७ मयुरपार्क अंतर्गत असलेल्या हर्सुल टी-पॉईट ते विश्वकर्मा सेल्स् कॉर्पोरेशन पर्यंत सिमेंट काँक्रीट रस्ता तयार करण्याच्या कामाचे र.रु.१,२४,८१,९००/- च्या अंदाजपत्रकास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ५६१ :-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहरातील मा.उच्च न्यायालया समोरील चौकात “संत सेवालाल महाराज” यांचा पुतळा उभारण्याची तसेच सिडको बसस्टँड जवळील वसंतराव नाईक चौकात “वसंतराव नाईक” यांच्या नावाचा नामफलक लावण्याची येथील श्री.गोरख राठोड, अध्यक्ष, राष्ट्रीय बंजारा क्रांतीसेना व स्थानिक नागरीकांची अनेक दिवसांची मागणी प्रलंबीत आहे. तरी वरील प्रमाणे मा.उच्च न्यायालया समोरील चौकात “संत सेवालाल महाराज” यांचा पुतळा उभारणे तसेच सिडको बसस्टँड जवळील वसंतराव नाईक चौकात “वसंतराव नाईक” यांच्या नावाचा नामफलक लावण्याचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.प्रमोद प्रल्हाद राठोड,श्री.विकास रतनलाल जैन,श्री.वैद्य रेणुकादास (राजु) दत्तोपंत,श्री.राजेंद्र हिम्मतराव जंजाळ,श्री.राजु रामराव शिंदे

**अनुमोदक:-**श्री.विजय साईनाथ औताडे, श्रीमती मनिषा बाळासाहेब मुंढे, श्री.घडमोडे भगवान (बापु) देविदास, श्री.कचरु छगनराव घोडके, श्री.गोकुळसिंग संपतसिंग मलके.

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद शहरातील मा.उच्च न्यायालया समोरील चौकात “संत सेवालाल महाराज” यांचा पुतळा उभारण्यास तसेच सिडको बसस्टँड जवळील “वसंतराव नाईक” चौकात वसंतराव नाईक यांच्या नावाचा नामफलक लावण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ५६२ :-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.८०, एन-४, डी सेक्टर, सिडको येथील खुल्या जागेस “पंडीत दिनदयाल उपाध्याय” असे नाव देण्यात यावे. अशी या वॉर्डातील नागरीकांची बऱ्याच वर्षापासुन मागणी आहे.

करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती ॲड.माधुरी मिलींद देशमुख **अनुमोदक:-**श्री. प्रमोद प्रल्हाद राठोड

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.८०, एन-४, डी सेक्टर, सिडको येथील खुल्या जागेस “पंडीत दिनदयाल उपाध्याय” असे नाव देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ५६३ :-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.८०, एन-३,एन-४,सिडको, गुरुसाहनीनगर, पारिजातनगर प्लॉट क्र.४९०, ४९१, ४९२ जवळील खुल्या मैदानास “तुलसी उद्यान” असे नाव देण्यात यावे. अशी या वॉर्डातील नागरीकांची बऱ्याच वर्षापासून मागणी आहे.

करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती ॲड.माधुरी मिलींद देशमुख **अनुमोदक:-**श्री. प्रमोद प्रल्हाद राठोड

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.८०, एन-३, एन-४, सिडको, गुरुसाहनीनगर, पारिजातनगर प्लॉट क्र.४९०, ४९१, ४९२ जवळील खुल्या मैदानास “तुलसी उद्यान” असे नाव देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ५६४:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.७९, न्यायनगर अंतर्गत खालील दर्शविलेल्या विकास कामांचे लेखाशिर्षक बदलण्याबाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

| जुने कामांचे नाव ह्यापैकी | त्याऐवजी नवीन कामांचे नाव |
|---|---|
| वॉर्ड क्र.७९, न्यायनगर अंतर्गत भुषणनगर सोसायटी येथे ०२ कमान बांधणे Spill P.No.158 Sr.No.03 (र.रु.०६ लक्ष). | १. वॉर्ड क्र.७९, न्यायनगर अंतर्गत फॉरेस्ट कॉलनी येथील Road क्रॉसिंग पाईपचे उर्वरित काम करून लोखंडी जाळ्या/ढापे बसविणे. (र.रु.०६ लक्ष) |
| वॉर्ड क्र.७९, न्यायनगर अंतर्गत दुर्गामाता कॉलनी येथे शेड उभारणे Spill P.No.158 Sr.No.05 (र.रु.०६ लक्ष). | १. वॉर्ड क्र.७९, न्यायनगर अंतर्गत विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन दुरूस्ती करणे. (र.रु.१.५० लक्ष)<br>२. वॉर्ड क्र.७९, न्यायनगर अंतर्गत विविध ठिकाणी खडी मुरूम टाकणे. (र.रु.१.५० लक्ष). |

**सुचक:-**श्री.गजानन भानुदास मनगटे **अनुमोदक:-**श्री.सिताराम इसराम सुरे

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.७९, न्यायनगर अंतर्गत खालील दर्शविलेल्या विकास कामांचे लेखाशिर्षक मंजुरी देण्यात येते.

| जुने कामांचे नाव ह्यापैकी | त्याऐवजी नवीन कामांचे नाव |
|---|---|
| वॉर्ड क्र.७९, न्यायनगर अंतर्गत भुषणनगर सोसायटी येथे ०२ कमान बांधणे Spill P.No.158 Sr.No.03 (र.रु.०६ लक्ष). | १. वॉर्ड क्र.७९, न्यायनगर अंतर्गत फॉरेस्ट कॉलनी येथील Road क्रॉसिंग पाईपचे उर्वरित काम करून लोखंडी जाळ्या/ढापे बसविणे. (र.रु.०६ लक्ष) |
| वॉर्ड क्र.७९, न्यायनगर अंतर्गत दुर्गामाता कॉलनी येथे शेड उभारणे Spill P.No.158 Sr.No.05 (र.रु.०६ लक्ष). | १. वॉर्ड क्र.७९, न्यायनगर अंतर्गत विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन दुरूस्ती करणे. (र.रु.१.५० लक्ष)<br>२. वॉर्ड क्र.७९, न्यायनगर अंतर्गत विविध ठिकाणी खडी मुरूम टाकणे. (र.रु.१.५० लक्ष). |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ५६५:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.३७ मध्ये स्थायी समितीने शिफारस केलेली सन २०१८-१९ करीता झोन अभियंता कार्यालय-५ मधील विविध भागात डांबरीकरण करणे रु.१० लक्ष या कामाऐवजी प्रभाग क्र.३७ मध्ये विविध भागात सिमेंट कॉंक्रीटीकरण करणे रु.१० लक्ष असे करण्यात यावे.

करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती वैशाली कारभारी जाधव **अनुमोदक:-**श्री.विजय साईनाथ औताडे

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.३७ येथे डांबरीकरण करणेच्या रु.१० लक्ष या कामाऐवजी प्रभाग क्र.३७ मध्ये विविध भागात सिमेंट कॉंक्रीटीकरण करणे रु.१० लक्ष वळती करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ५६६:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की,

(१) सद्यस्थितीत औरंगाबाद शहरात दररोज सरासरी ४५० ते ५०० मेट्रीक टन घनकच-याची उत्पत्ती होते. महानगरपालिकेच्या १०८ व खाजगी २३७ ॲटोद्धारे या घनकच-याचे संकलन करण्यात येत असुन, मनपाच्या ३७ व १४ खाजगी वाहनांद्वारे घनकच-याची वाहतुक करण्यात येत आहे. घनकचरा वाहतुक करणारी महानगरपालिकेची बहुतांश वाहने १५ वर्षापेक्षा जुनी असुन, ही वाहने बंद बॉडीची नसल्यामुळे घकव्यक नियम-२०१६ चे पालन होत नाही. सद्यस्थितीत घनकचरा व्यवस्थापनाच्या कामासाठी १९५ वाहनचालक व २०१८ मजुर कार्यरत आहेत. यापैकी केवळ २६ वाहनचालक व १२९७ मजुर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील आहेत. महानगरपालिकेच्या यंत्रणे व्यतिरिक्त आवश्यक वाहने वेगवेगळया एजन्सीज कडुन किरायाने घेण्यात आली असुन, मनुष्यबळ देखील वेगवेगळया एजन्सीज कडुन कंत्राटी तत्वावर घेण्यात आलेले आहे. अनेक एजन्सीजच्या सहभागामुळे घनकचरा व्यवस्थापनाच्या कामात सुसुत्रता दिसुन येत नाही, परिणामी प्रतिवर्ष जवळपास रुपये ६५ कोटी खर्च होवुन देखील १०० टक्के घनकच-याचे डोअर स्टेप कलेक्शन करणे, वर्गीकरण करणे, घनकचरा व्यवस्थापन नियम-२०१६ चे पालन करणे शक्य होत नसल्याचे निदर्शनास येत आहे.

**घनकचरा व्यवस्थापनाच्या कामासाठी सन २०१७-१८ वर्षात खालील प्रमाणे खर्च आला आहे.**

| अ.क्र | विवरण | रक्कम |
|---|---|---|
| १ | बचतगट (वेतन) | ७८२१००००.०० |
| २ | वाहतुक खर्च | ७३५७०९४०.०० |
| ३ | इतर घनकचरा खर्च | ६०००००.०० |
| ४ | इंधन खर्च | ५८४००९०१.०० |
| ५ | वाहन देखभाल दुरुस्ती | १७२८९९६८.०० |
| ६ | सफाई कर्मचा-यांचा पगार | ४२७३५८०८८.०० |
| **एकुण खर्च** | | **६५,५४,२९,८९७.००** |

घनकचरा व्यवस्थापनाच्या कामासाठी वरील प्रमाणे मोठया प्रमाणावर खर्च होत असुन, वाहने, मशिनरी व मनुष्यबळ कार्यरत असुन देखील त्या प्रमाणात कामाची गुणवत्ता दिसुन येत नाही. तसेच मनपा कर्मचा-या मार्फत होणारे काम हे परिणामकारक नसुन कर्मचारी व यंत्रसामुग्रीच्या नियोजनाचा अभाव दिसुन आला आहे.या कामा अंतर्गत घनकचरा व्यवस्थापन नियम-२०१६ चे देखील पूर्णतः पालन होत नाही.

**घनकचरा व्यवस्थापन नियम-२०१६ :**

(२) घनकचरा व्यवस्थापन नियम २०१६ मधील प्रमुख अवलंबण्याच्या बाबी खालील प्रमाणे आहेत.

i) व ज्यांची पूर्णपणे अंमलबजावणी अनिवार्य आहे.
ii) घनकच-याचे १०० टक्के डोअरस्टेप कलेक्शन करणे.
iii) घनकचरा विघटनशील,अविघटनशील व विघातक अशा तीन प्रकारात वेगवेगळा जमा करणे.
iv) संकलीत केलेल्या वर्गीकृत घनकच-याची बंद वाहनातुन प्रक्रिया केंद्रा पर्यन्त वाहतुक करणे.
v) संकलीत केलेल्या संपूर्ण घनकच-यावर प्रक्रिया करणे.
vi) घनकचरा वेगवेगळा जमा करणे व प्रक्रिया करणे बाबत जनजागृती करणे.
vii) घनकचरा उत्पादकांकडुन उपभोक्ता शुल्क (युजर फीस) आकारणी करणे.

i) घरगुती विघातक कचरा (डोमॅस्टीक हझर्डस वेस्ट) स्वतंत्रपणे संकलीत करणे व त्यावर स्वतंत्र प्रक्रिया करणे.
ii) बागा/उदयानातुन निघणा-या पालापाचोळयावर त्याच जागी प्रक्रिया करणे.
iii) बांधकाम मटेरियल /डेब्रीजच्या संकलन व वाहतुकीसाठी स्वतंत्र यंत्रणा कार्यान्वीत करणे.
iv) रस्ते झाडाई, गटार सफाईचा मलबा बंद कंटेनर मध्ये तात्पुरता संकलीत करुन वाहतुकीसाठी स्वतंत्र यंत्रणा कार्यान्वीत करणे.
v) भाजी मार्केट, मटन मार्केट, मच्छी मार्केट येथुन निघणा-या घनकच-यावर प्रक्रिया करण्यासाठी अशा मार्केट मध्ये किंवा मार्केट जवळ प्रक्रिया केंद्र उभारणे.
vi) कचरा वेचकांना घनकचरा व्यवस्थापन नियमाचे प्रशिक्षण देणे, प्रोत्साहन देणे व सुविधा उपलब्ध करुन देणे.

**(३) प्रस्ताव :**

घनकचरा व्यवस्थापन नियम-२०१६ प्रमाणे मनपाच्या कामाच्या दर्जात सुधारणा करावयाची असल्यास त्यासाठी घनकचरा संकलन व वाहतुक कामात अनुभवी एजन्सीची मदत घेता येईल. तसे केल्यास निवासी भागातील घनकचरा दररोज एक वेळ व व्यावसायीक भागातील घनकचरा दररोज दोन वेळा संकलीत करता येईल. तसेच वर्गीकृत घनकचरा बंद वाहनातुन प्रोसेसिंग साईट पर्यन्त वाहतुक करता येईल. यासाठी घनकचरा विभागा मार्फत सुक्ष्म नियोजन करण्यात आले असुन, प्रत्येक १००० घरांच्या मागे ०१ ॲटो, ज्या ठिकाणी ॲटो जात नाही अशा ठिकाणी रिक्षा आणि मोठया प्रमाणावर घनकचरा उत्पत्ती होणा-या ठिकाणी मोठया ट्रॉलीजची संख्या खालील प्रमाणे निश्चित करण्यात आली आहे. एजन्सी मार्फत एवढी वाहने उपलब्ध करण्याचे पाचारण करण्यात आले आहे.

| अ.क्र. | वाहने व मनुष्यबळ | सद्यस्थितीत मनपाकडे असलेल्या वाहनांची संख्या | प्रस्तावित वाहनांची संख्या |
|---|---|---|---|
| १ | हॅन्डकार्ट (०१ हेल्पर सह ) | -- | १५० |
| २ | चारचाकी ॲटोटिप्पर (१ वाहन चालक व १ हेल्परसह ) | ६८ | ३०० |
| ३ | हायड्रोलिक टेम्पो (१ वाहन चालक व ४ हेल्परसह) | -- | २२ |
| ४ | कॉम्पॅक्टर्स (क्षमता १८ घ.मी.) (१ वाहनचालक व २ हेल्पर सह) | -- | ०९ |
| ५ | एस्कॅवेटर (१ वाहनचालक व १ हेल्पर सह) | -- | आवश्यकतेनुसार |
| ६ | इतर मशिनरी<br>आवश्यकतेनुसार मनुष्यबळासह | तीनचाकी ॲटोटिप्पर-४०<br>स्कीपलोडर्स –०६ वाहने व ६० बिन्स हुकलोडर्स –०६ वाहने व ४२ बिन्स | आवश्यकतेनुसार |

**(४)** या प्रकल्पासाठी एजन्सीला सर्व नवीन वाहने खरेदी करुन घनकचरा संकलन व वाहतुकीचे काम करावे लागेल. महानगरपालिकेने प्रस्तावित केलेली वाहनांची संख्या कमी करता येणार नाही. मात्र आवश्यकते नुसार वाहनांच्या संख्येत एजन्सीला वाढ करावी लागेल. सध्या घनकचरा संकलन व वाहतुकीच्या कामासाठी कार्यरत असलेली मनपाची काही वाहने एजन्सीला देण्यात येतील. एजन्सी मनपाच्या वाहनाच्या बॉडी मध्ये घकव्य नियम २०१६ च्या अनुषंगाने आवश्यकते फेरबदल करुन वापर करेल .एजन्सीला सर्व वाहनांवर जीपीएस सिस्टीम बसवावी लागेल.

**(५)** सर्व वाहनांवर पुरेसे मनुष्यबळ देण्याची जबाबदारी एजन्सीची राहील. वाहने व वाहनावरील मनुष्यबळ एकाच एजन्सीचे असल्यामुळे कामात सुसुत्रता येईल.

(६) एजन्सी खालील कामे करेल.:

i) एजन्सी निवासी भागातुन दररोज एकवेळा घरोघरी जावुन घनकचरा संकलीत करेल.
ii) एजन्सी व्यावसायीक भागातुन दररोज दोन वेळा घनकच-याचे संकलन करण्यात येईल.
iii) एजन्सी ओपन डंपिंग स्पॉट दररोज स्वच्छ करेल व असे स्पॉटस बंद करण्यासाठी उपाययोजना करेल.

iv) एजन्सी घनकच-याचे वर्गीकरण करण्यासाठी नागरीकांना प्रोत्साहन देईल व जनजागृती करेल.

v) एजन्सी प्रत्येक निवडणुक प्रभागासाठी एक सुपरवायझर, प्रत्येक झोनसाठी एक व्यवस्थापक व संपूर्ण शहरासाठी एक सिनिअर मॅनेजर नियुक्त करेल.

iv) एजन्सीच्या कामात डेब्रिज व बांधकाम मटेरियल उचलण्याच्या कामाचा समावेश नाही.

**(७)** एजन्सीला त्यांनी उचललेल्या कच-याच्या वजनाच्या प्रमाणात टिपींग फीस अदा करण्यात येईल. टिपींग फीसच्या प्रमाणात देयकाची अदाई करण्यात येणार असल्यामुळे कंत्राटदार जास्तीत जास्त घनकचरा वाहुन नेण्याचा प्रयत्न करेल. त्यामुळे शहराची स्वच्छता जास्त चांगल्या प्रकारे राखण्यास मदत होईल. घनकच-याचे वजन करण्यासाठी सर्व प्रोसिसींग साईट जवळ वजनकाटा बसविण्यात येईल.

**(8) <u>महानगरपालिकेने करावयाची कामे :</u>**

महानगरपालिकेची यंत्रणा प्रत्यक्ष काम करण्या ऐवजी एजन्सीच्या कामावर देखरेख करेल. अनुभवी एजन्सी व्यावसायीक दृष्टीकोनातुन घनकचरा व्यवस्थापनाचे काम अधिक प्रभावीपणे करेल. घनकचरा व्यवस्थापनाच्या कामावर सध्या कार्यरत असलेले महानगरपालिकेच्या मजुरांना रस्ते झाडाई,गटार सफाई इत्यादी इतर कामे देण्यात येतील. महानगरपालिकेचे जवान व स्वच्छता निरिक्षक एजन्सीच्या कामावर नियंत्रण ठेवण्यासाठी कार्यरत राहतील.

**(9) <u>आर्थिक ताळेबंद</u>** :

घनकचरा व्यवस्थापनाच्या कामासाठी महानगरपालिकेतर्फे आजच्या स्थितीला एकंदरीत अंदाजे रु 65 कोटी खर्च येत आहे. प्रस्तावित केल्या नुसार खाजगी अधिकरण मार्फत घनकचरा संकलन व वाहतुक केल्यास वार्षिक अंदाजे रु 25 ते 30 कोटी खर्च अपेक्षीत असुन, मनपाच्या सफाई मजुरांच्या वेतनापोटी पुर्वी प्रमाणेच वार्षिक रुपये 42 कोटी खर्च येणार आहे. या प्रमाणे एकुण खर्च रुपये 65 ते 70 कोटी अपेक्षीत आहे. उपभोक्ता शुल्क वसुली द्वारे वार्षिक रुपये 10 कोटी उत्पन्न अपेक्षीत आहे.

१. **(१०) <u>प्रकल्पाचे फायदे</u> :**
२. घनकचरा व्यवस्थापन नियम – २०१६ चे पालन करता येईल.
३. अनुभवी एजन्सी मार्फत व्यावसायीक दृष्टीकोनातुन घनकचरा व्यवस्थापनाचे काम केल्यामुळे या कामात मोठया प्रमाणावर सुधारणा करता येतील.
४. १०० टक्के वर्गीकृत घनकच-याचे संकलन केल्यामुळे शहरातील वातावरण नागरी आरोग्यास पोषक होण्यास मदत होईल.
५. घनकचऱ्याच्या वजनाच्या आधारे टिपींग फीस देण्यात येणार असल्याने कंत्राटदार जास्तीत जास्त कचरा उचलण्याचा प्रयत्न करेल.
६. रस्ते झाडाई, गटार सफाई इतर सफाईच्या कामासाठी मुबलक मनुष्यबळ उपलब्ध होईल.
७. सद्यस्थितीत घनकचरा व्यवस्थापनाच्या कामावर होत असलेल्या खर्चातच सदरील प्रकल्प राबविला जाणार असल्यामुळे महानगरपालिकेवर कुठलाही वेगळा आर्थिक बोजा येणार नाही.

**(11) <u>उपभोक्ता शुल्क आकारणी करणे</u>** :

अनुभवी खाजगी एजन्सीच्या नियुक्ती मुळे घनकचरा व्यवस्थापनाच्या कामाचा दर्जा सुधारणार असुन, निवासी भागातील प्रत्येक घरातुन दररोज एकवेळ व व्यावसायीक क्षेत्रातील प्रत्येक दुकानातुन दररोज दोन वेळा घनकचरा संकलीत करण्यात येणार आहे. घकव्य नियम 2016 नुसार नागरीकांकडुन उपभोक्ता शुल्क (युजर चार्जेस) आकारणी करण्यात येईल. निवासी भागातुन प्रतिदिन प्रतिघर रुपये 01/- व व्यावसायीक भागातुन प्रतिदिन प्रतिशॉप रुपये 02/- प्रमाणे नाममात्र उपभोक्ता शुल्क आकारता येईल. हॉटेल्स व इतर मोठया व्यावसायीक/खाजगी आस्थापनांकडुन निर्माण होणा-या कच-याच्या प्रमाणात प्रतिदिन रुपये 10/- ते 100/- प्रमाणे उपभोक्ता शुल्क आकारण्यात येईल. त्याद्वारे शहरातील 220000 घरे व 22500 व्यावसायीक संस्था मधुन वर्षभरात जवळपास रुपये 10 कोटी उत्पन्न अपेक्षीत आहे. तसेच उक्त प्रकल्प राबविल्यास मनपा तर्फे पुरविण्यात येणा-या सेवा व सुविधांचा स्तर उंचावेल.

(१२) राज्य शासनाच्या धोरणानुसार घनकचरा व्यवस्थापन २०१६ च्या तरतुदीचे अनुपालन न करणाऱ्या व्यक्ती/संस्थांना दंड (Spot Fine) करण्याचे शासन निर्णय क्रमांक : स्वमअ-२०१७/प्र.क्र.२५६/नवि-३४ दि.३०.१२.२०१७ अन्वये महानगरपालिकांना प्रधान केलेल्या अधिकारानुसार खालील प्रमाणे दंडनिय कार्यवाही (Spot Fine) करण्यात येईल.

| | |
|---|---|
| १. रस्ते/मार्गावर घाण करणे. | रु.१५०/- |
| २. छोटे हॉटेल्स/दुकाने/संस्था यांनी रस्त्यावर कचरा टाकणे/घाण करणे | रु.५००/- |
| ३. बल्क गारबेज जनरेटरस यांनी रस्त्यावर कचरा टाकणे/घाण करणे | रु.५०००/- |
| ४ सार्वजनिक ठिकाणी थुंकणे | रु.१००/- |
| ५ उघड्यावर लघवी/लघुशंका करणे | रु.१००/- |
| ६ उघड्यावर शौच करणे | रु.५००/- |

(१३) उपरोक्त सर्व बाबींचा सखोल विचार करता असे प्रस्तावित करण्यात येत आहे की, घनकचरा व्यवस्थापन नियम २०१६ ची पूर्णपणे अंमलबजावणी करण्यासाठी तसेच नागरीकांना देण्यात येणा-या या संबंधीच्या सेवा व सुविधांचा स्तर मध्ये सुधारणा करण्यासाठी....

(i) वरील पॅरा क्र १ ते १० मध्ये सविस्तर नमुद केल्याप्रमाणे शहरातील घनकचरा (रस्ते झाडाई, गटार सफाई व डेब्रिज वगळुन) खाजगी संस्थेमार्फत घनकचरा संकलन व वाहतुक करणेस मान्यता व्हावी.

(ii) वरील पॅरा क्र ११ मध्ये नमुद केल्या प्रमाणे शहरातील नागरीकांकडुन उपभोक्ता शुल्क वसुलीसाठी मान्यता व्हावी.

(iii) वरील पॅरा क्र १२ मध्ये नमुद केल्याप्रमाणे (Spot Fine) मान्यता व्हावी.

तरी उपरोक्त नुसार प्रस्ताव मा. सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, घनकचरा व्यवस्थापन नियम-२०१६ ची पूर्णपणे अंमलबजावणी करण्यासाठी तसेच नागरीकांना देण्यात येणाऱ्या या संबंधीच्या सेवा व सुविधांच्या स्तरामध्ये सुधारणा करण्यासाठी प्रस्तावातील नमुद पॅरा क्र १ ते १० मध्ये सविस्तर नमुद केल्याप्रमाणे शहरातील (रस्ते झाडाई, गटार सफाई व डेब्रिज वगळुन) खाजगी संस्थेमार्फत घनकचरा संकलन व वाहतुक करणेस मान्यता देण्यात येते. तसेच प्रस्तावातील पॅरा क्र ११ मध्ये नमुद केल्या प्रमाणे शहरातील नागरीकांकडुन उपभोक्ता शुल्क वसुली करण्यास तसेच पॅरा क्र १२ मध्ये नमुद केल्या प्रमाणे स्पॉट फाईन करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ५६७:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महानगरपालिका अर्थसंकल्प सन २०१८-१९ मधील वॉर्ड क्रमांक-८०, एन-३, एन-४ करीता खालील कामाचे लेखाशिर्ष बदलाचा प्रस्ताव स्थानिक रहिवासीयांच्या सुविधेसाठी बदलण्यात यावे.

| अ.क्र. | अर्थसंकल्पातील पा.क्र. | जुने कामाचे नाव | नवीन कामाचे नाव |
|---|---|---|---|
| १ | एससीआर वॉर्ड क्र-०६ पी.एन.२३ अ.क्र.०२ | प्रभाग क्रमांक-८० मध्ये विविध भागात कॉंक्रीटची कामे करणे. र.रु.२५ लक्ष | १) वॉर्ड क्र.८० अंतर्गत एन-४ भागातील विविध रस्त्यालगत पाथ-वे तयार करणे. अ.प.र.रु.९,९५,८५५/- |
| | | | २) वॉर्ड क्र.८० अंतर्गत एन-३ भागातील विविध रस्त्यालगत पाथ-वे तयार करणे. अ.प.र.रु.९,९४,६५०/- |

करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती माधुरी मिलींद देशमुख **अनुमोदक:-**श्री.प्रमोद प्रल्हाद राठोड

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्रमांक-८० अंतर्गत असलेल्या एन-३, एन-४ येथे खालील कामाचे लेखाशिर्ष बदलण्यास मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र. | अर्थसंकल्पातील पा.क्र. | जुने कामाचे नाव | नवीन कामाचे नाव |
|---|---|---|---|
| १ | एससीआर वॉर्ड क्र-०६ पी.एन.२३ अ.क्र.०२ | प्रभाग क्रमांक-८० मध्ये विविध भागात कॉंक्रीटची कामे करणे. र.रु.२५ लक्ष | १) वॉर्ड क्र.८० अंतर्गत एन-४ भागातील विविध रस्त्यालगत पाथ-वे तयार करणे. अ.प.र.रु.९,९५,८५५/- |
| | | | २) वॉर्ड क्र.८० अंतर्गत एन-३ भागातील विविध रस्त्यालगत पाथ-वे तयार करणे. अ.प.र.रु.९,९४,६५०/- |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ५६८:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.३८, एम.आय.डी.सी. चिकलठाणा या प्रभागातील कामासाठी अर्थसंकल्प तरतुद खालील दर्शविल्या प्रमाणे वळती करण्यासंबंधीचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

| अर्थसंकल्प पान. नं. व अ.क्र. | कामाचे नाव | सुधारीत कामाचे नाव |
|---|---|---|
| भांडवली कामे व जलनि:सारण एस.इ.आर. झोन क्र.०५, पान नं.२१ अनुक्रमांक ०९ | वॉर्ड क्र.३८ अंतर्गत मसनतपुर येथे जलनि:सारण वाहिनी टाकणे, र.रु.२०.०० लक्ष. | वॉर्ड क्र.३८, अशोकनगर, मसनतपुर येथे मनपा शाळेच्या परिसरात पहिल्या मजल्यावर ५ वर्ग खोल्या बांधणे-र.रु.१५ लक्ष. |
| | | वॉर्ड क्र.३८, अशोकनगर, मसनतपुर येथे मनपा शाळेसमोरील खुल्या जागेत झाडे लावणे-र.रु.०५ लक्ष. |

**सुचक:-** श्री.राजु रामराव शिंदे **अनुमोदक:-** श्री.गोकुळसिंग संपतसिंग मलके

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.३८, एम.आय.डी.सी. चिकलठाणा या प्रभागातील कामासाठी अर्थसंकल्प तरतुद खालील दर्शविल्या प्रमाणे वळती करण्यास मंजुरी देण्यात येते.

| अर्थसंकल्प पान. नं. व अ.क्र. | कामाचे नाव | सुधारीत कामाचे नाव |
|---|---|---|
| भांडवली कामे व जलनि:सारण एस.इ.आर. झोन क्र.०५, पान नं.२१ अनुक्रमांक ०९ | वॉर्ड क्र.३८ अंतर्गत मसनतपुर येथे जलनि:सारण वाहिनी टाकणे, र.रु.२०.०० लक्ष. | वॉर्ड क्र.३८, अशोकनगर, मसनतपुर येथे मनपा शाळेच्या परिसरात पहिल्या मजल्यावर ५ वर्ग खोल्या बांधणे-र.रु.१५ लक्ष. |
| | | वॉर्ड क्र.३८, अशोकनगर, मसनतपुर येथे मनपा शाळेसमोरील खुल्या जागेत झाडे लावणे-र.रु.०५ लक्ष. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ५६९:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.१०७ हा दलित बहुल वस्ती वॉर्ड असून या वॉर्डामध्ये ५० टक्के पेक्षा जास्त दलित वस्ती आहे. हा वॉर्ड दलित वस्तीचा असून बऱ्याच वर्षापासून ही वस्ती (वॉर्ड) विकास कामांपासून वंचित आहे.

करीता, खालील दिलेल्या तपशिलाप्रमाणे शासनाच्या दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत विविध विकास कामे करण्यासाठी निधी प्राप्त होण्याकरीता प्रस्ताव मंजुर करून मा.जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांच्या कार्यालयाकडे पाठविण्यासाठी प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

| अ.क्र. | विकास कामांची नावे | अंदाजीत रक्कम |
|---|---|---|
| १. | नाथनगर (वीटखेडा) स्लम भागात सिमेंट कॉंक्रीट रस्ते तयार करणे. | रु.२५.०० लक्ष |
| २. | वीटखेडा गाव (स्लम) मध्ये सिमेंट कॉंक्रीट रस्ते तयार करणे. | रु.२५.०० लक्ष |
| ३. | प्र.क्र.१०७ मध्ये विविध ठिकाणी विद्युत व्यवस्था करणे. (३ सेट व ४ सेट लावणे). | रु.२५.०० लक्ष |
| ४. | प्र.क्र.१०७ मध्ये अभिनंदन सोसायटी येथे सांस्कृतिक सभागृह बांधणे. | रु.२५.०० लक्ष |
| ५. | साई-वृंदावन कॉलनी येथे महिलांसाठी अद्ययावत व्यायामशाळा (जीम) तयार करणे. | रु.१०.०० लक्ष |
| ६. | प्र.क्र.१०७ वीटखेडा मध्ये विविध ठिकाणी LED विद्युत पथदिवे लावणे. | रु.१०.०० लक्ष |
| ७. | रेवती हाऊसिंग सोसायटी / अभिनंदन सोसायटी / नाथपुरम् भागातील उद्यानांचा विकास करणे, जॉगींग ट्रॅक तयार करणे. | रु.३०.०० लक्ष |
| | एकुण र.रु. | रु.१५०.०० लक्ष |

**सुचक:-**श्री.गजानन भानुदास मनगटे **अनुमोदक:-**श्री.मनोज आसाराम बल्लाळ

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.१०७ येथे शासनाच्या दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत विविध विकास कामे करण्यासाठी निधी प्राप्त होण्यासाठी प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांच्या कार्यालयाकडे पाठविण्यासाठी मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र. | विकास कामांची नावे | अंदाजीत रक्कम |
|---|---|---|
| १. | नाथनगर (वीटखेडा) स्लम भागात सिमेंट कॉंक्रीट रस्ते तयार करणे. | रु.२५.०० लक्ष |
| २. | वीटखेडा गाव (स्लम) मध्ये सिमेंट कॉंक्रीट रस्ते तयार करणे. | रु.२५.०० लक्ष |
| ३. | प्र.क्र.१०७ मध्ये विविध ठिकाणी विद्युत व्यवस्था करणे. (३ सेट व ४ सेट लावणे). | रु.२५.०० लक्ष |
| ४. | प्र.क्र.१०७ मध्ये अभिनंदन सोसायटी येथे सांस्कृतिक सभागृह बांधणे. | रु.२५.०० लक्ष |
| ५. | साई-वृंदावन कॉलनी येथे महिलांसाठी अद्यावत व्यायामशाळा (जीम) तयार करणे. | रु.१०.०० लक्ष |
| ६. | प्र.क्र.१०७ वीटखेडा मध्ये विविध ठिकाणी LED विद्युत पथदिवे लावणे. | रु.१०.०० लक्ष |
| ७. | रेवती हाऊसिंग सोसायटी / अभिनंदन सोसायटी / नाथपुरम भागातील उद्यानांचा विकास करणे, जॉगींग ट्रॅक तयार करणे. | रु.३०.०० लक्ष |
| | एकुण र.रु. | रु.१५०.०० लक्ष |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ५७०:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.७९, न्यायनगर हा वॉर्ड दलित बहुल वॉर्ड असून येथे ५० टक्के पेक्षा जास्त दलित वस्ती आहे. हा वॉर्ड बऱ्याच वर्षापासून विकास कामांपासून वंचीत आहे. करीता शासनाच्या दलित वस्ती सुधार योजने ह्या वॉर्डाअंतर्गत खालील विकास कामांसाठी निधी प्राप्त होणेसाठी प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांच्या कार्यालयाकडे पाठविण्यात यावा.

| अ.क्र. | विकास कामांची नावे | अंदाजीत रक्कम |
|---|---|---|
| १. | वॉर्ड क्र.७९ न्यायनगर अंतर्गत पश्चिम बाजुच्या रोडवर विद्युत व्यवस्था करणे. | रु.२५.०० लक्ष |
| २. | वॉर्ड क्र.७९ न्यायनगर अंतर्गत नरसाई शाळे समोरील मोठ्या रोडवर विद्युत व्यवस्था करणे. | रु.२५.०० लक्ष |
| ३. | वॉर्ड क्र.७९ न्यायनगर अंतर्गत मुख्य रस्त्यावर विद्युत व्यवस्था करणे. | रु.२५.०० लक्ष |
| ४. | वॉर्ड क्र.७९ न्यायनगर अंतर्गत गुरुसहानीनगर व न्यायनगर मधील रस्त्यावर विद्युत व्यवस्था करणे. | रु.२५.०० लक्ष |
| ५. | वॉर्ड क्र.७९ न्यायनगर अंतर्गत असलेल्या दुर्गामाता मंदिर येथे सामाजिक सभागृह बांधणे. | रु.२५.०० लक्ष |
| ६. | वॉर्ड क्र.७९ न्यायनगर अंतर्गत असलेल्या बौध्दविहार येथे सामाजिक सभागृह बांधणे. | रु.२५.०० लक्ष |

करीता, प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.गजानन भानुदास मनगटे **अनुमोदक:-**श्री.आत्माराम माणिकराव पवार

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.७९, न्यायनगर येथे शासनाच्या दलित वस्ती सुधार योजतेअंतर्गत खालील विकास कामांसाठी निधी प्राप्त होणेसाठी प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयाकडे पाठविण्यास मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र. | विकास कामांची नावे | अंदाजीत रक्कम |
|---|---|---|
| १. | वॉर्ड क्र.७९ न्यायनगर अंतर्गत पश्चिम बाजुच्या रोडवर विद्युत व्यवस्था करणे | रु.२५.०० लक्ष |
| २. | वॉर्ड क्र.७९ न्यायनगर अंतर्गत नरसाई शाळे समोरील मोठ्या रोडवर विद्युत व्यवस्था करणे | रु.२५.०० लक्ष |
| ३. | वॉर्ड क्र.७९ न्यायनगर अंतर्गत मुख्य रस्त्यावर विद्युत व्यवस्था करणे. | रु.२५.०० लक्ष |
| ४. | वॉर्ड क्र.७९ न्यायनगर अंतर्गत गुरुसहानीनगर व न्यायनगर मधील रस्त्यावर विद्युत व्यवस्था करणे | रु.२५.०० लक्ष |
| ५. | वॉर्ड क्र.७९ न्यायनगर अंतर्गत असलेल्या दुर्गामाता मंदिर येथे सामाजिक सभागृह बांधणे | रु.२५.०० लक्ष |
| ६. | वॉर्ड क्र.७९ न्यायनगर अंतर्गत असलेल्या बौध्दविहार येथे सामाजिक सभागृह बांधणे. | रु.२५.०० लक्ष |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ५७१:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.७९ न्यायनगर अंतर्गत खालील दर्शविलेल्या विकास कामांचे लेखाशिर्षक बदलण्यात यावे.

| जुने कामांचे नाव ह्यापैकी | त्याऐवजी नवीन कामांचे नाव |
|---|---|
| वॉर्ड क्र.७९ न्यायनगर अंतर्गत चौंडेश्वरी सोसायटी येथील जागा विकसीत करणे. SCR-Zone-06P.No.25, Sr.No.01 (र.रु.५० लक्ष) | १. वॉर्ड क्र.७९, न्यायनगर वॉर्डाच्या पश्चिमेकडील रोडवर विद्युत पोलसह फिटींग बसविणे. (र.रु.२५ लक्ष)<br>२. वॉर्ड क्र.७९, न्यायनगर अंतर्गत परिमल सोसायटी ते एन-४ पर्यंतच्या रोडवर विद्युत पोलसह फिटींग बसविणे. (र.रु.२५ लक्ष) |
| वॉर्ड क्र.७९ न्यायनगर अंतर्गत कल्पतरु सोसायटी येथील खुली जागा विकसीत करणे. SCR-Zone-06P.No.25, Sr.No.02 (र.रु.५० लक्ष) | १. वॉर्ड क्र.७९, न्यायनगर अंतर्गत पहाडे कॉर्नर ते पुंडलिकनगर रोडपर्यंतच्या विकास योजनेतील रस्त्यावर विद्युत व्यवस्था करणे. (र.रु.२५ लक्ष)<br>२. वॉर्ड क्र.७९, न्यायनगर अंतर्गत मा.उच्च न्यायालय संरक्षण भिंत ते पुंडलिकनगर रोड पर्यंतच्या रस्त्यावर पोलसह फिटींग बसविणे. (र.रु.२५ लक्ष) |
| वॉर्ड क्र.७९ न्यायनगर अंतर्गत निरंतर बाग व भुषणनगर येथील खुली जागा विकसीत करणे. SCR-Zone-06P.No.25, Sr.No.03 (र.रु.३० लक्ष) | १. वॉर्ड क्र.७९, न्यायनगर अंतर्गत भुषणनगर सोसायटी येथे पेव्हर ब्लॉक बसविणे. (र.रु.१० लक्ष)<br>२. वॉर्ड क्र.७९, न्यायनगर अंतर्गत भुषणनगर येथील खुल्या जागेवर ओपन जीम तयार करणे. (र.रु.०५ लक्ष).<br>३. वॉर्ड क्र.७९, न्यायनगर अंतर्गत निरंतर बाग सोसायटी येथे पेव्हर ब्लॉक बसविणे. (र.रु.०७ लक्ष)<br>४. वॉर्ड क्र.७९, न्यायनगर अंतर्गत निरंतर बाग येथे खेळणी बसविणे. (र.रु.०३ लक्ष)<br>५. वॉर्ड क्र.७९, न्यायनगर अंतर्गत निरंतर बाग येथे जीम तयार करणे (र.रु.०५ लक्ष) |
| वॉर्ड क्र.७९ न्यायनगर अंतर्गत बौध्दविहार येथे बैठकीसाठी छोटा हॉल तयार करणे. (र.रु.१० लक्ष) Zone-6-Spill,P.No.156, Sr.No.03 | १. वॉर्ड क्र.७९, न्यायनगर अंतर्गत गल्ली क्र.११ येथे जलवाहिनी टाकणे व लांबी वाढविणे. (र.रु.०५ लक्ष).<br>२. वॉर्ड क्र.७९, न्यायनगर अंतर्गत मुख्य रस्त्यावर स्पीड ब्रेकर टाकणे. (र.रु.०५ लक्ष) |

करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.गजानन भानुदास मनगटे **अनुमोदक:-**श्री.आत्माराम माणिकराव पवार

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.७९ न्यायनगर अंतर्गत खालील विकास कामांचे लेखाशिर्षक बदलण्यास मंजुरी देण्यात येते.

| जुने कामांचे नाव ह्यापैकी | त्याऐवजी नवीन कामांचे नाव |
|---|---|
| वॉर्ड क्र.७९ न्यायनगर अंतर्गत चौंडेश्वरी सोसायटी येथील जागा विकसीत करणे. SCR-Zone-06P.No.25, Sr.No.01 (र.रु.५० लक्ष) | १. वॉर्ड क्र.७९, न्यायनगर वॉर्डाच्या पश्चिमेकडील रोडवर विद्युत पोलसह फिटींग बसविणे. (र.रु.२५ लक्ष)<br>२. वॉर्ड क्र.७९, न्यायनगर अंतर्गत परिमल सोसायटी ते एन-४ पर्यंतच्या रोडवर विद्युत पोलसह फिटींग बसविणे. (र.रु.२५ लक्ष) |
| वॉर्ड क्र.७९ न्यायनगर अंतर्गत कल्पतरु सोसायटी येथील खुली जागा विकसीत करणे. SCR-Zone-06P.No.25, Sr.No.02 (र.रु.५० लक्ष) | १. वॉर्ड क्र.७९, न्यायनगर अंतर्गत पहाडे कॉर्नर ते पुंडलिकनगर रोडपर्यंतच्या विकास योजनेतील रस्त्यावर विद्युत व्यवस्था करणे. (र.रु.२५ लक्ष)<br>२. वॉर्ड क्र.७९, न्यायनगर अंतर्गत मा.उच्च न्यायालय संरक्षण भिंत ते पुंडलिकनगर रोड पर्यंतच्या रस्त्यावर विद्युत पोलसह फिटींग बसविणे. (र.रु.२५ लक्ष) |
| वॉर्ड क्र.७९ न्यायनगर निरंतर बाग व भुषणनगर येथील खुली जागा विकसीत करणे. SCR-Zone-06P.No.25, Sr.No.03 (र.रु.३० लक्ष) | १. वॉर्ड क्र.७९, न्यायनगर अंतर्गत भुषणनगर सोसायटी येथे पेव्हर ब्लॉक बसविणे. (र.रु.१० लक्ष)<br>२. वॉर्ड क्र.७९, न्यायनगर अंतर्गत भुषणनगर येथील खुल्या जागेवर ओपन जीम तयार करणे. (र.रु.०५ लक्ष).<br>३. वॉर्ड क्र.७९, न्यायनगर अंतर्गत निरंतर बाग सोसायटी येथे पेव्हर ब्लॉक बसविणे. (र.रु.०७ लक्ष)<br>४. वॉर्ड क्र.७९, न्यायनगर अंतर्गत निरंतर बाग येथे खेळणी बसविणे. (र.रु.०३ लक्ष)<br>५. वॉर्ड क्र.७९, न्यायनगर अंतर्गत निरंतर बाग येथे जीम तयार करणे (र.रु.०५ लक्ष) |
| वॉर्ड क्र.७९ न्यायनगर अंतर्गत बौध्दविहार येथे बैठकीसाठी छोटा हॉल तयार करणे. (र.रु.१० लक्ष) Zone-6-Spill,P.No.156, Sr.No.03 | १. वॉर्ड क्र.७९, न्यायनगर अंतर्गत गल्ली क्र.११ येथे जलवाहिनी टाकणे व लांबी वाढविणे. (र.रु.०५ लक्ष).<br>२. वॉर्ड क्र.७९, न्यायनगर अंतर्गत मुख्य रस्त्यावर स्पीड ब्रेकर टाकणे. (र.रु.०५ लक्ष) |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

या बरोबरच सभा राष्ट्रगिताने संपविण्यात येते.

स्वाक्षरित/-
नगर सचिव
महानगरपालिका औरंगाबाद

स्वाक्षरित/-
महापौर
महानगरपालिका औरंगाबाद